**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे शरद रणपीसे

**पुणे महानगरपालिकेकडून कालव्यामध्ये सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यास दुर्गंधी येत असल्याबाबत**

**(1) * १५११३ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे जिल्हयातील मुंढवा जॅकवेलमधील पाणी जुना मुळा-मुठा कालव्यातून सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, कालव्यातून सुरु करण्यात आलेल्या पाण्याला दुर्गंधी येत असून कालव्यातील पाणी विहिरी, कुपनलिकात उतरत असून फुरसुंगी, शेवाळेवाडी इ. परिसरातील पाणी दुषीत झाले असून तेथे रोगराई पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(4) तद्नुसार, तेथील नागरिकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.रणजित पाटील,श्री. देवेंद्र फडणवीस, यांच्याकरिता :** (१) होय.

(2) पुणे महानगरपालिकेकडून कालव्यामधे सोडण्यात येणा-या सांडपाण्यास दुर्गंधी येते हे अंशतः खरे आहे. तथापि या फुरसुंगी आणि शेवाळेवाडी भागातील पाण्याचे नमुने तपासले असता पाणी दूषित आढळून आले नाहीत, तसेच या भागात जलजन्य आजाराचे रुग्ण आढळून आले नाहीत.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीस लागून असलेल्या फुरसुंगी, शेवाळेवाडी इ. गावांना मुंढवा जॅकवेल कार्यान्वितत होण्यापुर्वीपासूनच टैंकर द्वारे/पाईपलाईनद्वारे शुध्द पिण्याचे पाणी पुरविण्यात येत आहे.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, पुणे जिल्ह्यातील मुंढवा जॅकवेलमध्ये ट्रीटमेंट प्लॅन बसविण्यात आले आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी असे सांगू इच्छितो की, हा प्रश्न पुणे शहरापुरता मर्यादित आहे, त्यामुळे नागपूर शहराबाबत कोणी प्रश्न उपस्थित करु नका. नागपूरचा प्रश्न विचारला तर कोणी चंद्रपूरचा प्रश्न उपस्थित करु नका. फक्त पुणे शहरापुरते या प्रश्नांच्या बाबतीत बोलण्यात यावे. त्यामुळे आपणाला जास्तीत जास्त प्रश्नावर चर्चा करता येईल.

....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15113...

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, या ट्रीटमेंट प्लॅनमधून मुंढवा जॅकवेलचे काम सुरु झाल्यानंतर पुणे शहरातील लोकांना शुध्द पाणी देण्याची हमी पुणे महानगरपालिकेची होती. या ट्रीटमेंट प्लॅनमधून शुध्द पाणी जात नाही हे खरे आहे काय ? पुणे शहरात एकूण पाच प्लॅन बसविण्यात आले आहेत ते सुरु आहेत काय ? ट्रीटमेंट प्लँटचे काम करणारा जो अधिकारी आहे त्यांना पूर्वी सस्पेंड करण्यात आले होते त्या अधिकाऱ्यांना पुन्हा त्याच खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे काय ? या प्लँटची सखोल चौकशी करुन त्या अधिकाऱ्याला सस्पेंड करण्यात येईल काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पुणे येथील खडकवासला धरणातून घेतलेले पाणी व त्यासंदर्भात झालेल्या अग्रीमेंटमधून देण्यात येणाऱ्या पाण्याच्या प्रदूषणासंदर्भातील प्रश्न विचारला आहे. हे गोष्ट सत्य आहे की, जेवढे पाणी ट्रीट करावयास पाहिजे तेवढे पाणी आपण ट्रीट करीत नाही. साधारणपणे 744 पैकी 400 एमएलडी पाणी 300 एमएलडी पाणी पुणे शहरासाठी व 100 एमएलडी पाणी पुणे शहराच्या आजूबाजूला म्हणजे पीसीएमसी, भोसरी व एमआयडीसी यांचे आहे. तसेच हद्दीबाहेरील सर्व गावांचे मिळून 400 एमएलडी अनट्रीटेड पाणी सोडले जाते. कराराचा भाग म्हणून मुंढवा येथे केटीवेअर तयार करण्यात आलेला आहे. केटीवेअर येथे जॅकवेल बांधून तेथे दहा मोटारी लावून 3.5 किलोमीटर दूर अंतरावर पाणी नेऊन जुन्या उजव्या कालव्यात ते टाकण्यात येते. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला की, हे प्रदूषित पाणी सोडल्यामुळे तेथे दुर्गंधी येते, ते पाणी पिण्यास योग्य नाही. तेथील पाण्याची दुर्गंधी येते ही गोष्ट सत्य आहे. त्या ठिकाणच्या पाण्याचे सॅम्पल घेण्यात आले आहेत. त्या ठिकाणी शेवाळवाडी, फुरसुंगी ही गावे आहेत, त्या केटीवेअरमधून पाण्याचे सॅम्पल घेतली आहेत. त्या पाण्याची बायोकेमिकल्स टेस्ट केली आहे, बीओडी व टीएच ची तपासणी केली त्यावेळी ते सॅम्पल प्रदूषणाच्या खालच्या लेव्हलचे आकडे दर्शवित आहे. पण ही गोष्ट सत्य आहे की, तेथून 744 एमएलडी पाणी सोडले जाते, त्यापैकी 400 एमएलडी पाणी म्हणजे जवळपास 40 टक्के पाणी पुणे शहरातील अनट्रीटेड म्हणजे पोल्यूटेड पाणी सोडले जाते. यासाठी पाच प्लँट

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

बसविण्यात आले आहेत ते पूर्ण क्षमतेने काम करतात किंवा नाही व करीत असतील तर त्यातील

....3...



ता.प्र.क्र.15113...

डॉ.रणजित पाटील....

काही अधिकाऱ्यांना या अगोदर सस्पेंड केलेले आहे याबाबत चौकशी करण्यात येईल काय, असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला होता. या ठिकाणी पाच सिव्हरेज ट्रीटमेंट प्लँट आहेत, याबाबत सन्माननीय सदस्यांची स्पेसिफिक तक्रार असेल तर त्याबाबत चौकशी करण्यात येईल व संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

आर्कि.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, आपण सुरुवातीला सांगितले आहे की, पुणे महानगरपालिकेच्या संदर्भातील प्रश्न विचारण्यात यावेत. या अनुषंगाने मी असा प्रश्न विचारीत आहे की, पुणे शहरातील कचऱ्याचा प्रश्न अनुत्तरीत आहे, तो सोडविलेला नाही. आमदार फंडातून रिकमंड केलेली कामे देखील होत नाहीत. पुणे महानगरपालिकेच्या वस्तुस्थितीची देखील चर्चा होणे आवश्यक आहे, सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी उपस्थित केलेला प्रश्न बरोबर असला तरी हे प्रश्न देखील आम्हाला कधी तरी मांडायला पाहिजेत.

**सभापती** : हा प्रश्न वेगळा आहे, आपण तो वेगळ्या माध्यमातून मांडावा आपणाला परवानगी देण्यात येईल.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी असे सांगितले की, ट्रीटमेंट प्लॅन्टमधून जे पाणी पुढे जाते ते पोटेबल आहे, त्यामध्ये दूषित पणा आढळून आलेला नाही. ज्या जलवाहिन्या आहेत त्या परंपरागत जुन्या असून त्या जलवाहिन्यातील पाणी प्रदूषित असून ते पाणी सर्व नागरिकांना उपलब्ध होत आहेत. या जलवाहिन्या अनेक वर्षाच्या असून त्या गंजलेल्या आहेत, त्यामुळे पुणे शहरातील जनता प्रदूषित पाणी पितात ही गोष्ट खरी आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, हे पाणी पुणे शहरातील जनतेला पिण्यासाठी देण्यात येत नाही. हे पाणी एरिगेशनसाठी कालव्यामध्ये सोडण्यात येते. हे पाणी ट्रीट करून सोडायला पाहिजे हा अग्रीमेंटचा भाग आहे.

**सभापती** : मंत्री महोदय, मी त्या भागाच्या शेजारील असल्यामुळे हे पाणी कालव्यात सोडले तरी त्या पाण्याची दुर्गंधी येते. सन्माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांना याची कल्पना असेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

इस्लामपूर, बारामती व सासवड या तालुक्यातील शेतीमध्ये ते पाणी येते व त्या ठिकाणी दुर्गंधी येते. त्यामुळे ते पाणी ट्रीटमेंट करुन सोडणे आवश्यक आहे.

...4....



ता.प्र.क्र.15113...

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात असे सांगितले की, त्यांनी त्या पाण्याच्या टेस्ट केल्या आहेत, टेस्ट केल्यानंतर ते पाणी चांगले आहे असे मंत्री महोदयांना अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. दुर्गंधी युक्त पाणी हे दूषित नाही असे आम्ही कसे समजावे. ज्या पाण्याला दुर्गंधी येते, ते पाणी दूषित नसेल तर त्याला दुर्गंधी येण्याचे काही कारण नाही. या अधिकाऱ्यांनी आजपर्यंत त्या ठिकाणी अशाच प्रकारची कामे केली आहेत. त्यांच्यावर पूर्वी निलंबनाची कारवाई करण्यात आलेली होती. पुन्हा त्या अधिकाऱ्यांना त्याच ठिकाणी नियुक्ती दिली जात आहे. त्या अधिकाऱ्यांवर कारवाई का केली जात नाही. ज्या अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयास चुकीचे उत्तर देण्यास भाग पाडले व हे पाणी दुर्गंधी युक्त आहे पण दूषित नाही असे सांगितले अशा अधिकाऱ्यांवर आज निलंबनाची कारवाई मंत्री महोदय करतील काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी बरोबर मुद्दा मांडला आहे, पाण्याला दुर्गंधी येत असेल तर या पाण्याच्या बायोलॉजिकल टेस्टमध्ये ते खरे कसे उतरले. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, या पाण्याची फेर चाचणी पुन्हा करण्यात येईल. या चाचण्या सॅम्पल सर्व्हे केलेल्या असतात. या चाचण्या एकाच तपासणीमधून होत नाहीत. याबाबत फेर चाचणी केली जाईल. यामध्ये जर काही दोष आढळून आले तर ज्या अधिकाऱ्यांनी चुकीचा रिपोर्ट दिला त्यांची देखील चौकशी करण्यात येईल.

....5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**घोषणा**

**सभापती** : मला सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यास अत्यंत आनंद होतो की, आज आपल्या सभागृहाचे कामकाज पहाण्यासाठी इस्त्राईल देशाचे मुंबईतील वाणिज्यदुत श्री.डेव्हिड अकाव्ह (Mr.David Akov,Consul General of Israel in Mumbai) व परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, इस्त्राईल मधील अन्य अधिकारी यांचे शिष्टमंडळ विशेष अभ्यागत कक्षामध्ये उपस्थित आहे. आपण सर्वजण त्यांचे टाळ्यांच्या गजरात हार्दिक स्वागत करु या.

--------

....6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15113...

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

( चर्चा पुढे सुरु....

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी हे पाणी दुर्गंधी युक्त आहे ही बाब मान्य केली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी असे सांगितले की, जे पाणी दुर्गंधी युक्त आहे ते पाणी पिण्यासाठी योग्य कसे असू शकेल. हा अतिशय साधा आणि प्राथमिक प्रश्न आहे. तुमच्या समोर दुर्गंधी युक्त पाणी आले तर तुम्ही ते पिऊ शकणार नाही. ते पाणी प्रदूषित आहे किंवा नाही हा भाग नंतरचा आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी महानगरपालिकेकडे जी सक्षम यंत्रणा असायला पाहिजे व प्रदूषण नियंत्रण मंडळाचे त्यांच्यावर देखरेख असायला पाहिजे. एकदा सॅम्पल घेऊन हा प्रश्न सुटणारा नाही. एकदा नमुना घेऊन हे काम संपत नाही. यासाठी रोजच्या रोज तपासणी करणे आवश्यक आहे. जसे मुंबई किंवा इतर शहरांमध्ये हवे मध्ये किती प्रदूषण आहे, याची मोजमापे जाहीर करण्यात येतात. त्याचप्रमाणे नागरिकांच्या सोईसाठी पाण्यामध्ये काय काय घटक आहेत आणि ते पाणी निश्चितपणे पिण्यायोग्य आहे किंवा कसे यासाठी अशा प्रकारचे सूचना फलक त्पुणे महानगरपालिकेत लावणार आहात काय ?

या नंतर श्री.सांगळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15113....

श्री.हेमंत टकले....

तसेच सदर यंत्रणेमध्ये भ्रष्ट अधिकारी असल्यास त्यांच्यावर कारवाई करुन त्यांना दूर करणार आहात का आणि पुढील काळात दुषित नसलेले, दुर्गंधी न येणारे चांगले पाणी पुरविण्याची जबाबदारी कोणी टाळत असल्यास संबंधितांवर शासन कोणती कारवाई करणार आहात ?

ॲड.रणजित पाटील : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.हेमंत टकले यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, या संदर्भात असा करार झाला होता की, खडकवासला धरणातून 11.5 टीएमसी पाणी घेऊन त्यापैकी 6.5 टीएमसी पाणी इरिगेशनसाठी प्रोसेस करुन कालव्यांमध्ये टाकू. कराराचा भाग असा होता की, ते पाणी पिण्यासाठी देणार नव्हतो. यादृष्टीने 5 एस.डब्ल्यु.टी.चे पाणी पुण्यातील मुळा आणि मुठा या दोन्ही नद्यांच्या प्रवाहामध्ये टाकून केटीवेअरपर्यंत जाते, त्या संदर्भात मी मघाशी साांगितले होते. पुणे व पुण्याच्या आजूबाजूला पीसीएमसी, भोसरी, एमआयडीसी एरिया व आजूबाजूची गावे असतील तेथील पाण्याचे टोटल जनरेशन 744 एमएलडी इतके आहे. साधारणत: बऱ्याच जास्त प्रमाणात ते पाणी तिकडे येते. परंतु 5 सिव्हरेज ट्रिटमेंट प्लँटद्वारे ते सर्व पाणी प्रोसेस होत नाही. ही बाब मान्य करावी लागेल. 300 एमएलडी प्लस 100 एमएलडी पाणी आजूबाजूचे असेल. आपण झायकासोबत एक करार केला आहे. आपण आणखी 12 सिव्हरेज ट्रिटमेंट प्लँट टाकत आहोत. म्हणून ही गोष्ट सत्य आहे की, ट्रिटेड आणि अनट्रिटेड पाणी मिक्स होत आहे, यामुळे त्या पाण्याला थोडी दुर्गंधी येते. कोणावर विश्वास न ठेवता ही गोष्ट मानावी लागेल. कॅनेलमध्ये टाकायचे पाणी पोटेबल असले तरी ते इरिगेशनकरिता देत असल्यामुळे ते दुर्गंधी मुक्त असले पाहिजे. या संदर्भात आपण झायकासमवेत करार केला आहे. फुरसुंगी गावाला पिण्याच्या पाण्याची नळ योजना सुरु करीत आहोत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शेवाळी वाडी गावात जाणाऱ्या पाण्याचे नमुने कधी घेण्यात आले ? शेवाळी वाडीत 30 वर्षांपासून टँकरने पाणी पुरवठा होत असल्याचे आपण म्हणत आहात. बापट साहेब आपण पालकमंत्री आहात. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, शेवाळी वाडी गाव टँकरमुक्त कधी करणार आहात ?

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15113....

ॲड.रणजित पाटील : सभापती महोदय, फुरसुंगी आणि शेवाळी वाडी ही दोन्ही गावे केटीवेअरच्या व्हिसीनिटीमध्ये आहे. सध्या फुरसुंगी वाडीला नळाने पाणी देत आहोत. परंतु शेवाळी वाडीला टँकरने पाणी देत आहोत. ही गोष्ट सत्य आहे. याकरिता नदी सुधार योजनेअंतर्गत ते 100 टक्के पाण्यावर करणार आहोत. फुरसुंगी आणि शेवाळी वाडी या दोन्ही गावांकरिता पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र नळ योजना प्रस्तावित आहे, ती लवकरात लवकर केली जाईल.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, पुणे शहरात नदी सुधार प्रकल्प अतिशय महत्त्वाचा आहे. मंत्री महोदयांनी या संदर्भात झायकासमवेत 800 कोटी रुपयांचा करार केल्याचे सांगितले. सदर प्रकल्पाला पर्यावरण खात्याची नुकतीच मंजुरी मिळाली आहे व या संदर्भात झायकासमवेत करार केल्याच्या सह्या झालेल्या आहेत. या प्रोजेक्टची सद्यस्थिती काय आहे ? किती वर्षांत हा प्रोजेक्ट पूर्ण होणार आहे, जेणेकरुन सिव्हरेज ट्रिटमेंट प्लँटचे पाणी 100 टक्के स्वच्छ होईल.

ॲड.रणजित पाटील : सभापती महोदय, या प्रकल्पाकरिता केंद्र शासनाकडून प्रायमरी मान्यता मिळाली असून फायनल मान्यता येणे बाकी आहे.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. माननीय पालक मंत्री सदनात उपस्थित आहेत. आपल्याला गावकऱ्यांनी निवेदन दिले आहे की, तेथे जे पाणी सोडले जाते, ते विहिरींमध्ये गेलेले आहे. यामुळे तेथील शेतकऱ्यांना विहिरींचे पाणी पिण्यासाठी वापरता येत नाही. आज तापी प्लँट सुरु असताना महानगरपालिकेचे 200 ते 300 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. तेच अधिकारी हेच काम करीत आहेत. शेतकऱ्यांनी निवेदन दिले आहे की, आम्हाला ते पाणी नको, ते सोडू नका. शेतकरी आंदोलनाकरिता उतरले आहेत. उद्या पाणी बंद केल्यास सदर प्लँटचे काय करणार आहात ? मंत्री महोदय, आपल्याला चुकीची माहिती दिली जात आहे. पुणेकर वैतागले आहेत. हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. आपण पुणेकरांना शेती व पिण्याकरिता पाणी देणार होतो. परंतु त्यांना स्वच्छ पाणी मिळत नाही, विहिरीमध्ये सदर पाण्याचे पर्क्युलेशन झाल्यामुळे सर्व विहिरी व बोअर खराब झालेल्या आहेत. अशा परिस्थितीत आपण त्या अधिकाऱ्याला पाठीशी घालणार आहात का ? या संदर्भात चौकशी करुन त्या अधिकाऱ्याला आपण आजच्या आज निलंबित करावे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15113....

ॲड.रणजित पाटील : सभापती महोदय, मी याबाबत सदनाला यापूर्वी सांगितले आहे. आपला कन्सर्न लक्षात आला आहे. सदर पाणी तेथे गेल्यानंतर ते इरिगेशनसाठी असले तरी सिफेजमुळे ते पाणी विहिरी आणि पिण्याच्या पाण्याला दुषित करीत आहे. पुण्यात असलेल्या ट्रिटमेंट प्लँटमुळे तेथे दुषित पाणी जात आहे. जलजन्य संसर्ग आजाराबाबत आपण विचारले आहे. या संदर्भात डेड एन्डवरील वॉटर सॅम्पल घेऊन त्यांची तपासणी केली जाईल. पहिल्या एन्डचे सिव्हरेज ट्रिटमेंट प्लँट असतील, तेथे सुध्दा पूर्ण चौकशी करुन त्यात जे अधिकारी असतील, ते यापूर्वी दोषी सापडले आले असतील, परंतु पुन्हा तेथे त्यांची पदस्थापना झाली असल्यास तसेच सिव्हरेज ट्रिटमेंट प्लँट पूर्ण क्षमतेने चालत नसल्यास त्याची सुध्दा चौकशी केली जाईल.

श्री.अनिल भोसले : आपण त्या अधिकाऱ्यांना निलंबित करणार आहात का ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य, आपल्याला शुध्द पाणी पाहिजे की, अधिकाऱ्यांचे निलंबन पाहिजे.

ॲड.रणजित पाटील : सभापती महोदय, 5 सिव्हरेज ट्रिटमेंट प्लँट आहेत. एखादा प्लँटमध्ये काही गडबड असल्यास किंवा स्पेसिफिकली त्याबद्दल सन्माननीय सदस्यांची काही तक्रार असल्यास मी सांगितले आहे की, त्या संबंधी चौकशी करुन कार्यवाही करु. प्लँटच्या बाहेर पडणाऱ्या पाण्याचे सॅम्पल तपासून घेऊन त्याचा रिपोर्ट सादर करु.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, एका बाजूला सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले साहेब पाण्यासंबंधी वारंवार तक्रारी करीत आहेत. दुसऱ्या बाजूला राज्याचे पर्यावरण मंत्री पर्यावरण विभागाला काही काम नाही असे वारंवार बोलतात. हा पर्यावरण विषयासंबंधी प्रश्न असल्यामुळे खास बाब म्हणून हा विषय पर्यावरण मंत्र्यांकडे सोपविण्यात येईल का ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब आहे. सन्माननीय सदस्य वारंवार सांगत आहे की, ज्या पाण्यातून दुर्गंधी येत आहे ते स्वच्छ कसे असू शकते ? मी सदनाला सांगू इच्छितो की, या संदर्भात उद्याच्या उद्या त्या पाण्याचे पुन्हा सॅम्पल घेऊन त्याची तपासणी केली जाईल. 8 दिवसांमध्ये सदर पाणी तपासून त्यात दुर्गंधी असल्याचे आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द 10 दिवसांच्या आत कारवाई केली जाईल.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15113....

**सभापती** : सदर तारांकित प्रश्नाला चांगला न्याय मिळाला आहे. पाण्याच्या दुर्गंधीपासून राजकीय सुगंध तयार झाला आहे.

---------

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

*(२)* * **१५३४४ *श्री.शरद* रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.विक्रम काळे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामहरी रुपनवरर:र** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

*(१)* बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नालेसफाई, रस्त्यावरील सिग्नल जंक्शन दुरुस्ती, डेब्रिज विल्हेवाट, भूलयंत्रे खरेदी, रस्ते दुरुस्ती, विद्यार्थ्यांसाठी टॅब खरेदी इत्यादीच्या कंत्राटांमध्ये अनेक प्रकारच्या अनियमितता झाल्या असून त्यात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

*(२)* असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

*(३)* नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत **?**

**डॉ.रणजित पाटील, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नालेसफाईच्या कंत्राटामध्ये अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे.

रस्त्यावरील सिग्नल, जंक्शन दुरुस्ती, डेब्रीज विल्हेवाटबाबतच्या कामामध्ये अनियमितता झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

भूलयंत्रे खरेदीत कंत्राटदाराने महानगरपालिकेची फसवणूक केली असल्याचे आढळून आले आहे.

तथापि, टॅब खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले नाही.

*(२)* याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

<u>नालेसफाई:-</u>

नालेसफाई प्रकरणी झालेल्या अनियमिततांबाबत उप आयुक्त (घ.क.व्य.) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मोठ्या नाल्यांच्या ३२ कंत्राटांपैकी ९ कंत्राटांची चाचणी तत्वावर चौकशी करुन त्याचा अहवाल आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सादर केला.

महानगरपालिका आयुक्तांनी सदर अहवालानुसार नालेसफाईच्या ३२ कंत्राटांची पुढील सविस्तर चौकशी करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त (प.उ.) यांना दिले होते. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त (प.उ.) यांनी सादर केलेल्या अंतरिम अहवालावर आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अन्य आदेशांसह १४ कर्मचारी/अधिकारी यांना निलंबित करण्याचे आदेश दिले. सदर १४ कर्मचारी/अधिकारी यांच्यापैकी १३ कर्मचारी/ अधिकारी यांना महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले असून एक कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने त्याला निलंबनाची कार्यवाही करता आली नाही. तसेच, संबधित सर्व १४ कर्मचाऱ्यांवर आरोपपत्र बजावण्यात येऊन त्यांच्याविरुद्ध खात्यांतर्गत सर्वकष चौकशी अधिकारी म्हणून उपायुक्त (अभियांत्रिकी) यांची नेमणूक करण्यात आली असून सदर चौकशीची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.

तसेच, ३ नालेसफाई कंत्राटदार, व्ही.टी.एस.कंत्राटदार, ३ वजनकाटा ठेकेदार यांच्याविरुद्ध आझाद मैदान पोलीस ठाणे येथे दिनांक १९.०९.२०१५ रोजी महानगरपालिकेमार्फत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दिनांक ०७.११.२०१५ रोजी सदर प्रकरण पोलिसांनी आर्थिक गुन्हे विभागाकडे वर्ग केले आहे. **.... ६**

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15344....

**डॉ.रणजित पाटील, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता...**

तद्नंतर महापालिकेमार्फत मोठ्या नाल्यांच्या ३२ कंत्राटांसंबंधित सर्व २४ नालेसफाई कंत्राटदार, २ व्हीटीएस कंत्राटदार, ८ वजनकाटा ठेकेदार यांच्याविरुद्ध आर्थिक गुन्हे विभागात महानगरपालिकेमार्फत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच, नालेसफाई कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याच्या दृष्टीने मोठ्या नाल्यांच्या ३२ कंत्राटांमधील सर्व २४ नालेसफाई कंत्राटदारांवर दिनांक १९.०१.२०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

त्याचप्रमाणे या प्रकरणातील संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचा सहभाग निश्चित करुन त्यांच्यावर खात्यांतर्गत चौकशीची कारवाई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

<u>रस्त्यावरील सिग्नल, जंक्शन दुरुस्ती, रस्ते दुरूस्ती व डेब्रिज विल्हेवाटः-</u>

रस्त्यावरील सिग्नल, जंक्शन दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती व डेब्रिजची विल्हेवाट इत्यादी कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते विभागाच्या मानंकनाप्रमाणे व महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या त्रयस्थ संस्था गुणवत्ता नियंत्रक यांच्या देखरेखीमध्ये करण्यात आलेली आहेत.

तथापि, सदर कामांमध्ये अनियमितता झाल्याबातच्या प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महापालिकेमार्फत गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीमार्फत चौकशी चालू आहे.

<u>भूलयंत्रे खरेदी</u> :-

जुलै, २०१५ च्या दरम्यान भूलयंत्रे (अनेस्थेशिया) मशीन खरेदीत कंत्राटदाराने महानगरपालिकेस फसविल्याचे निदर्शनास आले.

सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या चौकशीत, कंत्राटदार व युनिव्हर्सल ओरगॅनिक्स यांना महापालिकने कायम स्वरुपी काळ्या यादीत टाकले आहे. तसेच त्यांनी भरलेल्या कंत्राट अनामत रकमा जप्त केल्या आहेत. तसेच महापालिकेमार्फत त्यांचे व्हेंडर रजिस्ट्रेशनही बंद केले आहे.

सदर कंत्राटदारांविरुद्ध महानगरपालिकेमार्फत आग्रीपाडा पोलीस ठाण्यात दिनांक २७.१०.२०१५ रोजी एफ.आय.आर.नोंदणीकरिता तक्रारअर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने कंत्राटदाराविरुद्ध दिनांक २१.०१.२०१६ रोजी प्रथम खबरी अहवालाची नोंद केली आहे.

***(३)*** प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन माननीय मुख्यमत्र्यांनी सदनात यावसास पाहिजे होते अशी आमची अपेक्षा होती.

**सभापती** : त्यांचे खालच्या सभागृहात भाषण सुरु आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, या प्रश्नात कोणताही राजकीय अभिनिवेश नाही. मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भात नाले सफाई, सिग्नल दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती, विद्यार्थ्यांसाठी टॅब अशा अनेक गोष्टी आहेत. त्यात नाले सफाईच्या बाबतीत 14 अधिकारी / कर्मचाऱ्यांना निलंबित

...7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15344....

श्री.शरद रणपिसे....

करण्याचे आदेश दिले. त्यापैकी 13 अधिकाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले. याचा अर्थ त्यात भ्रष्टाचार झाल्याचे सिध्द झाले आहे. सभापती महोदय, या सदनात मुंबई महानगरपालिकेच्या भ्रष्टाचाराबाबत वारंवार चर्चा होत असते. सन्माननीय महापौर स्नेहलताई आंबेकर यांच्याबद्दल या सदनात चर्चा झाली. त्यांचे टक्केवारीचे संभाषण, किती टक्के पैसे, कंत्राटदार याबाबत माझ्याकडे लेखी उत्तर आहे.

यानंतर C-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15344....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. नियमाप्रमाणे जी व्यक्ती या सभागृहात उपस्थित नाही, ज्या व्यक्तीला आपण नोटीस देऊ शकत नाही त्या व्यक्तीच्या नावासह टक्केवारीचा उल्लेख माननीय सदस्यांनी केला, ते वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून वगळण्यात यावे.

**सभापती** : रेकॉर्ड तपासून घेऊन उचित कार्यवाही करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ज्या व्यक्तीचा उल्लेख करावयाचा आहे ती व्यक्ती या सभागृहाची सदस्य असेल तर नोटीस द्यावी लागते. मुंबई महापालिकेच्या महापौरांबाबत या सभागृहात अनेकदा चर्चा झाली आहे. या सदनाचे माजी सदस्य व मुंबई भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष आमदार श्री.आशिष शेलार यांनी जाहीरपणे या सभागृहात त्यांच्यावर आरोप केले होते, आजही करीत आहेत. त्यांनीच मुंबई महापालिका बरखास्त करण्याची मागणी केली होती. हा प्रश्न गंभीर आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, त्यावेळचे वक्तव्य देखील सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकले आहे, आपण तपासून पहावे. जी व्यक्ती सभागृहात उत्तर देण्यासाठी नाही त्या व्यक्तीचे नाव घेऊन बोलता येणार नाही.

**सभापती** : मी रेकॉर्ड तपासून घेऊन नियमानुसार कार्यवाही करणार आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसीजर आहे. मुंबई महापालिका अधिनियमाबाबत राज्य सरकारचे नियमन आहे. नियमन आहे म्हणूनच हा प्रश्न सभागृहात उपस्थित झाला. राज्यातील जिल्हा परिषदा, नगरपालिका आणि महापालिका यांच्याबाबत शेवटचा अधिकार हा राज्य सरकारचा आहे. त्या अनुषंगाने व्यक्तीचे नाव घेता येत नाही असे कायद्यात कुठेही नमूद केलेले नाही. आम्हाला विषयाची गांभीर्यता कळली पाहिजे. रेकॉर्ड तपासून घेण्याचा मुद्दा उपस्थित होऊ शकत नाही. या विषयाची सभागृहात चर्चा होऊ शकते, अन्यथा हा प्रश्न स्वीकृत झाला नसता. माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी या विषयावर चर्चा केली. मुंबई भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष आणि आमदार श्री.आशिष शेलार यांनी नालेसफाई आणि इतर अनेक विषयाबाबत या सभागृहात भाष्य केले होते. पत्रकार परिषद घेऊन सातत्याने त्यांनी भूमिका मांडली. त्या संदर्भात बोलण्यावर बंदी घालणे कोणत्या नियमानुसार होऊ शकते याची माहिती मिळाली पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांना बोलू द्यावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना मी सांगू इच्छितो की, मुंबई महापालिका ही स्वायत्त संस्था आहे. त्या महापालिकेवर नियमन करण्याचा महाराष्ट्र शासनाला पूर्ण अधिकार आहे. माझा एवढाच मुद्दा होता की, माननीय सदस्यांनी मुंबई महापौरांचे नाव घेऊन टक्केवारीचा उल्लेख केला ते वक्तव्य रेकॉर्डवरुन वगळण्यात यावे. दोन दिवसापूर्वी याच सभागृहात दिल्लीतील नेत्यांचा विषय उपस्थित झाला होता, ते वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात आले. शक्यतो जी व्यक्ती सभागृहात उत्तर देण्यासाठी उपस्थित नाही त्यांच्या बाबतीत कोणतेही आरोप करताना नाव घेऊ शकत नाही असा नियम आहे, कायदा आहे.

**सभापती** : कायद्यात काय आहे हे मी पाहतो. माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी प्रश्न विचारावा.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी देखील विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात गेली 20 वर्षे काम करीत आहे. मी जे काही उल्लेख करीत आहे ते माझे वक्तव्य नसून शासनाने दिलेले लेखी उत्तर आहे. आता ही सभागृहाची प्रॉपर्टी झालेली आहे. शासनाने उत्तरात म्हटले आहे की, सौ.स्नेहल आंबेकर, महापौर, मुंबई महापालिका यांच्या संदर्भात तक्रारदार श्री.संतोष धुरी, नगरसेवक, मनसे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक महासंचालकांकडे तक्रार केली. सभागृहाचे कामकाज कायद्याने चालले पाहिजे. सरकार भ्रष्टाचाराबाबत संवेदनशील आहे हे आम्ही नेहमी वृत्तपत्रात वाचतो. याबाबत हे सरकार संवेदनशील आहे की नाही? मुंबई महापालिका अधिनियम, 1888 मधील कलम 520 (अ) (ब) व (ड) मी वाचतो. त्यात "जर कर्तव्य बजावताना कसूर करीत असेल तर राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे त्यामध्ये महापालिका विसर्जित करण्याचे कारण नमूद करुन ती महापालिका विसर्जित करता येईल" असे म्हटले आहे. मी एकही शब्द कायद्याच्या बाहेरील उल्लेखिलेला नाही. मुंबई महापालिका अधिनियम,1888 मध्ये राज्य सरकारने 1998

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मध्ये दुरूस्ती केली आहे. त्या दुरूस्तीला अनुसरुन मुंबई महापालिका बरखास्त करण्याची प्रोसेस राज्य सरकार करणार आहे काय?

...3...



ता.प्र.क्र.15344....

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी नालेसफाईच्या कंत्राटामध्ये अनियमितता, भ्रष्टाचार झाला तसेच रस्त्यावरील सिग्नल, जंक्शन दुरूस्ती, डेब्रिज, विल्हेवाट कामामध्ये मुंबई महापालिका कसूर करीत असेल तर ती विसर्जित करणार का असा मुद्दा मांडला आहे. या तक्रारीतील प्रत्येक मुद्याची चौकशी चालू असून ती अजूनही अंतिम टप्प्यात आहे. तक्रारीच्या अनुषंगाने सॅम्पल घ्यावे लागतात, त्याची छाननी करावी लागते. छाननी केल्यानंतर अहवाल येतात. आतापर्यंत प्राथमिक चौकशीमधून 13 कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. एवढ्यावरच थांबलेलो नाही, तर हा गुन्हा इकॉनॉमिक ऑफेन्स विंगकडे वर्ग केला आहे. त्यामुळे कारवाई झालेली आहे. अनियमितता, भ्रष्टाचार सिध्द झाल्याने जे कर्मचारी दोषी आढळले त्यांच्याविरुध्द एफआयआर दाखल केला असून प्रकरण इकॉनॉमिक ऑफेन्स विंगकडे वर्ग केले आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, जो पक्ष पारदर्शक सरकारचे वचन देऊन सत्तेवर आला त्यांच्याकडून या प्रश्नावरील चर्चा थांबविण्याबाबत रस का घेतला जातो हा आमच्यापुढे प्रश्न निर्माण झाला आहे. रस्ते बांधण्याच्या कामात मोठा भ्रष्टाचार उघडकीस आल्याने थर्ड पार्टी ऑडिट नेमण्यात आले, त्यांच्याकडून बोगस अहवाल दिल्याचा घोटाळा समोर आला आहे. ही स्पेसिफिक केस आहे. जे ऑडिटर नेमले जातात त्यांनी वस्तुस्थितीच्या आधारे ऑडिट करावे असे अपेक्षित असते. त्यामध्ये सुध्दा घोटाळे झालेले आहेत. 30 रस्त्यांबाबतच्या ऑडिटचे अहवाल चुकीचे प्राप्त झालेले आहेत. याबाबत शासन एफआयआर दाखल करुन कोणती कारवाई करणार आहे?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी रस्त्यांबाबत झालेला भ्रष्टाचार व थर्ड पार्टी ऑडिटचा मुद्दा मांडला आहे. जरूर या संदर्भात एसजीएस आणि आयआरएस हे दोन ऑडिटर नेमले होते. आयआरएस ही संस्था भारत सरकारचा अंगिकृत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उपक्रम आहे. त्यांच्याबाबत तक्रार नसून एसजीएसबद्दल मोठया प्रमाणात तक्रारी आहेत. थर्ड पार्टी ऑडिटमध्ये घोटाळा झाला असेल तर कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. त्यांच्यावर सुध्दा कारवाई केली जाईल.

...4...



ता.प्र.क्र.15344....

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, रस्त्यावरील सिग्नल, जंक्शन दुरूस्ती, डेब्रिज विल्हेवाट कामामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. म्हणून महापालिकेतर्फे समिती गठीत करुन चौकशी सुरु आहे. माझा प्रश्न असा आहे की, 2015-16 मध्ये स्पॉट होल दुरूस्तीसाठी महापालिकेने एकूण किती रक्कम खर्च केली, त्यासाठी किती कंत्राटदार महापालिकेने नियुक्त केले होते याची माहिती पटलावर ठेवण्यात येईल काय?

नंतर डी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15344...

श्री.मुझफ्फर हुसेन...

सभापती महोदय, ही जी समिती नेमली आहे तिचा अहवाल कधी पर्यंत येणार आहे व त्यावर आपण कोणती ठोस कारवाई करणार आहात ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, रस्त्याचे काम, जंक्शन बॉक्स, डेबरीज, पॉट होल्स इ.संबंधातील दोन वर्षाचे टेंडर होते. ही कामे 400 पेक्षा जास्त होती. पहिल्या टप्प्यामध्ये आपण 34 रोडचे काम केले आहे. यासंबंधात आपण ॲडिशनल कमिशनर, वेस्टर्न सबर्ब यांच्यामार्फत चौकशी केली आहे. त्यांच्या अहवालामध्ये हे सिद्ध झाले आहे की, वरचा थर हा योग्य होता. पण खालच्या थरामध्ये अनियमितता झाली आहे. काही ठिकाणी तर खालचा थरच गायब आहे, थिकनेस कमी आहे. सन 2012-13 मध्ये 700 कोटी रूपये, 2013-14 मध्ये 650 कोटी रूपये, सन 2014-15 मध्ये 2014 कोटी रूपयांची कामे प्रस्तावित होती. यासंबंधात जी माहिती आलेली आहे त्याबाबतचा अंतिम अहवाल अजून अप्राप्त असून तो लवकरात लवकर प्राप्त करून घेण्यात येईल.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, दिनांक 27 मार्च 2015 रोजी महाराष्ट्र नव निर्माण सेनेच्या एका नगरसेवकाने महापौरांच्या अधिपत्याखालील असणाऱ्या सभागृह निधीच्या वाटपात मोठा घोटाळा झाल्याचा आरोप केला आहे. प्रचलित धोरणांचे पालन न करता कंत्राटदारांच्या संगनमताने, चुकीच्या पद्धतीने निधी वाटप केला गेला असल्याबद्दलची तक्रार त्यांनी ॲन्टी करप्शन विभागाकडे केली आहे. आज एक वर्ष झाले असले तरी यापूर्वी विचारलेल्या प्रश्नांसबंधातील कोणतीही माहिती शासनाने या सभागृहासमोर ठेवलेली नाही. मुळात या चौकशीचे काय झाले आहे, याबद्दलची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर यांनी पहिला प्रश्न विचारला आहे त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, या प्रकरणासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी या आधीच निवेदन केलेले आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, निवेदन हे पूर्वी झालेले आहे. आता याबद्दलची सद्य:स्थिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी. ..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, याबाबतची रिसेंट माहिती प्राप्त करून घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, या सदनामध्ये सरकारचे पहिले आभार मानावे लागतील की, त्यांनी पहिल्यांदा कुठे तरी स्वतः पुढे येऊन सांगितले की, यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे. वारंवार आरोप केल्यानंतर आता आपण सांगत आहात की, भ्रष्टाचार झालेला आहे. परंतु या भ्रष्टाचार प्रकरणी महापालिकेच्या माध्यमातून कंत्राटदारावर कारवाई केली जात नाही. हा सन 2015-16, 2016-17 मध्ये 52 कंत्राटदारांसाठी आपण 285 कोटी रूपयांचे नालेसफाईचे टेंडर काढलेले आहे. ज्या कंत्राटदारांना काळ्या यादीमध्ये टाकले आहे त्यांना पुन्हा कामे देऊ नका अशी आम्ही मागच्या वेळी आपल्याकडे मागणी केली होती. त्या कंत्राटदारांना पुन्हा कंत्राट मिळाले असून त्यांनी काम देखील केले आहे. किरण पावसकर यांचे कॉन्ट्रॅक्ट असेल तर कंपनीचे नाव वेगळे असते. कंपनीचे नाव बदलले की, पुन्हा त्याच व्यक्तीला कंत्राट देण्यात येते. अशा पद्धतीचे काम झाले होते. यावेळी कंत्राटदारांनी महानगरपालिकेला धडा शिकवला आहे. मिठी नदीचा गाळ काढण्यासाठी कंत्राटदाराचा भाव कमी होता आणि छोट्या नाल्याचे काम करण्यासाठी जास्त भाव होता. हा भाव किती टक्क्यांपर्यंत वाढला ? आपण उत्तरात म्हटले आहे की, 7 ते 40 टक्के बोली मिठी नदीसाठी लावण्यात आली. छोट्या नाल्यांसाठी 89 टक्क्यांपासून ते 340 टक्क्यांपर्यंत आपण जास्तीचा भाव देत आहात म्हणजे कशी लूटमार चालली आहे ते आपण पहावे. या लूटमारीमध्ये कंत्राटदारांनी आपल्याला वेठीस धरले आहे. 52 कंत्राटदारांपैकी 24 कंत्राटदारांनी आपल्याला प्रतिसाद दिलेला आहे. त्यापैकी फक्त 20 कंत्राटदार निश्चित करण्यात आले. आपणच उत्तरामध्ये देत आहात की, तद्‌नंतर महापालिकेत मोठ्या नाल्यांच्या 32 कंत्राटांपैकी 24 नालेसफाई कंत्राटदार यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. हा खेळ आपण किती दिवस चालविणार आहात ? आपल्याला आता कंत्राटदार वेठीस धरत आहेत. आपल्याला कामे हवी असतील तर आम्ही पुढे येणार नाही. 52 कंत्राटदारांपैकी 24 कंत्राटदारांनी प्रतिसाद दिला असून



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15344...

फक्त 20 कंत्राटदारांनी कंत्राट घेतले आहे. यासाठी आपल्याला वारंवार निविदा काढाव्या लागत आहेत. नालेसफाई करताना कधी कधी कचरा वर काढून ठेवला जातो, वर काढलेला कचरा वाहून नेण्यासाठी कोणीही मिळाले नाही म्हणून तो कचरा पुन्हा आत पडला अशा प्रकारची उत्तरे या सदनामध्ये मिळालेली आहेत. हे सर्व करण्यासाठी अधिकार आणि कंत्राटदार यांची एक फिक्स टोळी निर्माण झालेली आहे. तेव्हा ही टोळी आपण नामशेष करणार आहात काय ? चांगले काम करणारी माणसे भरपूर आहेत. पण त्यांना महानगरपालिकेमध्ये आतमध्ये यायला पण दिले जात नाही. हा जो ग्रुप तयार झाला आहे त्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ? तेव्हा राज्य सरकारने आपली ताकद लावून ही महानगरपालिका बरखास्त केली पाहिजे. एवढा भ्रष्टाचार यामध्ये आहे. हा एका नालेसफाईमध्ये भ्रष्टाचार नाही. आपण 37 हजार कोटी रूपयांचे अंदाजपत्रक दाखवत आहात. प्रत्येक डिपार्टमेंटमध्ये भ्रष्टाचार आहे. आम्ही कर भरतो म्हणून आपली महानगरपालिका चालली आहे. आपण पेपरमध्ये सेना-भाजप वेगवेगळे आहेत असे दाखवितात. मात्र, आम्ही दोघे भाऊ-भाऊ खाण्यासाठी एकत्र येऊ असे न करता आपण काय कारवाई करणार आहात हे ठोसपणे सांगावे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी नालेसफाईचे कंत्राट कितीचे दिले होते असा पहिला प्रश्न उपस्थित केला आहे. 32 कामांचे 197 कोटी 45 लाख 5650 कोटी रूपयांचे कंत्राट होते. त्यापैकी एका वर्षात 98 कोटी 72 लाख रूपयांचे काम झाले. 60 टक्के काम हे पावसाळ्यापूर्वी करावयाचे होते. यामध्ये अनियमितता झाली आहे हे यापूर्वीच सांगितले आहे. ज्या कंत्राटदारांना काळ्यायादीमध्ये टाकले होते त्यांनी दुसऱ्या नावाने काम घेतले असे देखील येथे सांगण्यात आले. या सर्व प्रक्रियेची चौकशी होऊन त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. यात 14 अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे, त्या कंत्राटदारांना काळायादीमध्ये टाकले आहे आणि त्यांच्यावर एफआयआर देखील दाखल करण्यात आलेला आहे. हा गुन्हा आपण इकॉनॉमिक ऑफेन्स विंगकडे देखील वर्ग करण्यात आला आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15344...

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, महानगरपलिकेतील भ्रष्टाचारासंबंधातील आकडेवारी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर व अन्य सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली आहे. माझा प्रश्न साधा व सोपा आहे. आपण आपल्या लेखी उत्तरामध्ये म्हणत आहात की, "आझाद मैदान पोलीस ठाणे येथे दिनांक 19.9.2015 रोजी महानगरपालिकेतर्फे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यात 25 लाख रूपयांपेक्षा जास्त रकमेचा अपहार असेल तर हा गुन्हा थेट आर्थिक गुन्हे शाखेकडे नोंदविला गेला पाहिजे होता. हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी गेलेला आहे. यात ज्या अधिकाऱ्याने वेळकाढूपणा काढलेला आहे त्यांच्यावर आपण कारवाई करणार आहात काय ? या भ्रष्टाचारामध्ये अंदाजित किती रक्कम गुंतलेली आहे, रस्त्यावर सिग्नल, जंक्शन दुरूस्ती संबंधातील चौकशी कधी सुरू झाली आहे व ती कधी संपणार आहे ? तसेच आपण भूलयंत्र खरेदी केलेले आहे. त्यामध्ये भ्रष्टाचार झाला असे आपण म्हटले आहे. त्या यंत्राची किंमत किती आहे, आपण कंत्राटदाराची किती अनामत रक्कम जप्त केली आहे, एफआयआर झाल्यावर पुढे कोणती कारवाई झाली आहे यासंबंधातील संपूर्ण माहिती आपण देणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, पहिला एफआयआर हा स्थानिक पोलीस ठाण्यामध्ये झाला आहे. रूपये 25 लाखाच्या वर गैरव्यवहार असलयामुळे थेट आर्थिक गुन्हे शाखेकडे एफआयआर का दाखल केला नाही असे सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांचे म्हणणे आहे. सुरूवातीला पहिली तक्रार ही स्थानिक पोलीस ठाण्यामध्येच केली जाते. प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये एक पूर्ण वेळ पोलीस निरीक्षक हा आर्थिक गुन्ह्यांसाठी, सायबर गुन्ह्यांसाठी असतो. तक्रार तपासून झाल्यानंतर मग ती आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात येते. ही तक्रार थेट आर्थिक गुन्हे शाखेकडे का गेली नाही, त्यास विलंब झाला असेल तर त्याची निश्चितपणे चौकशी केली जाईल.

**सभापती :** मंत्री महोदय प्रोसिजर फॉलो केली आहे किंवा नाही एवढे आपण बघावे.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15344....

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदयसन्माननीय सदस्यांनी विचारले की, किती रक्कम अदा करण्यात आली त्याबाबत सांगू इच्छितो की, या संदर्भातील अनियमिततेबाबतच्या चौकशीमध्ये ही बाब लक्षात आल्यानंतर एकूण 200 कोटी रुपयांपैकी केवळ 16 कोटी 2 लाख रुपये अदा केलेले आहेत. त्यांची अनामत रक्कम पूर्ण जप्त करण्यास सांगितलेले आहे. अन्य माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, देशातील निम्म्या राज्यांपेक्षा मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प जास्त आहे. या ठिकाणी जे प्रश्न विचारण्यात आले त्याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी लेखी उत्तरात आणि माननीय राज्यमंत्र्यांनी तोंडी प्रश्नांच्या उत्तरामध्ये प्रत्येक बाबतीत भ्रष्टाचार झाल्याचे कबूल केलेले आहे. मघाशी माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, डांबराचा वरचा स्थर बरोबर होता परंतु खालचा स्थर नव्हता आणि ती अनियमितता आहे. खालचा स्थरच न टाकणे याला अनियमितता म्हण असतील तर माननीय राज्यमंत्र्यांनी कोणते नवीन परिमाण शोधले हे मला माहीत नाही. मोजमापामध्ये खालच्या स्थराचे पैसे दिले गेले. ही अनियमितता होऊ शकत नाही. या सर्व प्रश्नांच्या बाबतीत भ्रष्टाचार झाल्याचे कबूल केलेले आहे. काँग्रेस पक्षाचे गटनेते सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी सांगितलेली बाब महत्वाची आहे. या प्रकरणाची चौकशी महानगरपालिका करीत आहे याची कबुली देण्यात आलेली आहे. आपण पारदर्शकतेच्या बाबतीत नेहमी बोलत आलेला आहात. आपण विरोधी पक्षात असताना वेगवेगळ्या प्रकारच्या मागण्या केलेल्या आहेत. तेव्हा माझी मागणी आहे की, अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) किंवा ईओडब्ल्यू, एसईपी आणि या क्षेत्रातील माहितगार यांची स्वतंत्र एसआयटी नेमून मुंबई महानगरापालिकेच्या भ्रष्टाचाराची, अनियमिततेबाबतची चौकशी करणार काय ? आपणास ब्रिफींग का होते ते कळत नाही ? माननीय राज्यमंत्री उत्तर देण्यास सक्षम आहेत. त्यांच्याकडे गृह विभागाचा कारभार देखील आहे. राज्य सरकारच्या प्रत्येक विभागाचे कॅगमार्फत लेखापरीक्षण केले जाते. मी ज्यावेळी राज्याचे बजेट मांडले त्यावेळी राज्याचे बजेट 32 हजार कोटी रुपयांचे होते. आज मुंबई महानगरपालिकेचे 27 हजार कोटी रुपयांचे बजेट आहे. तेव्हा मुंबई महानगरपालिकेच्या कारभाराचे कॅगमार्फत

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15344....

श्री.सुनील तटकरे....

लेखापरीक्षण करण्यात येईल काय ? भारतीय जनता पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष आमदार ॲड.आशिष शेलार यांनी मिठी नदीच्या गाळाच्या कामाबाबत सांगितले की, हे हिमनगाचे एक टोक आहे. हे माझे वक्तव्य नाही. हे त्यांनी सांगितलेले आहे. या सर्व प्रकरणांची एका बाजूला चौकशी करीत असताना दुसरीकडे 1888 च्या कायद्यातील तरतुदीनुसार मुंबई महानगरपालिका बरखास्त का करु नये अशाप्रकारची नोटीस मुंबई महानगरपालिकेस देण्यात येईल काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितलेले आहे की, या संदर्भातील चौकशी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त स्वतः करीत आहेत.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय जागेवर उभे राहून
एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

मुंबई महानगरपालिका आणि आयुक्त सक्षम आहेत. मी पुन्हा पुन्हा सांगितले आहे की, चौकशीमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे निष्पन्न झालेले आहे. यामध्ये काही बायस असते किंवा ही चौकशी व्यवस्थित होत नाही असे वाटले असते किंवा त्याबाबत काही साशंकता आहे असे वाटत असते तर मान्य केले असते. या ठिकाणी चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई देखील झालेली आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय जागेवर उभे राहून
एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

आपण 13 कर्मचाऱ्यांना निलंबित केलेले आहे. या संदर्भातील चौकशी करण्यास आयुक्त आणि महानगरपालिका सक्षम आहे. ही चौकशी अनबायस होत आहे. संबंधितांवर कारवाई देखील झालेली आहे. आपण हे प्रकरण ईओडब्ल्यूकडे वर्ग देखील केलेले आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात )

**सभापती** : मी सभागृहाचे कामकाज 5 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.44 ते 12.49 पर्यंत स्थगित झाली)



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

ता.प्र.क्र.15344....

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

**सभापती** :सन्माननीय सदस्यांची स्पेसिफीक मागणी आहे त्याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आधीच सांगितलेले आहे की, या संदर्भातील चौकशी झालेली आहे. बऱ्याच चौकशी कंटुन्य फेजमध्ये आहेत..

**सभापती** : माझी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना विनंती आहे की, त्यांनी माननीय मंत्र्यांचे उत्तर ऐकून घ्यावे, त्यानंतर आपण बोलावे. आवश्यकता वाटल्यास मी वेळ वाढवून देईन

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या प्रकरणी चौकशी झालेली नाही. महानगरपालिका काही विशिष्ट बाबींची चौकशी करीत आहे. भारतीय जनता पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष, आमदार ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले की, हे हिमनगाचे टोक सापडलेले आहे, त्यातून एवढ्या कारवाई झालेल्या आहेत. तेव्हा वरिष्ठ पातळीवर विशेष चौकशी पथक नेमून चौकशी केली जाणार आहे काय ?

यानंतर श्री.बोर्डे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15344....

श्री.सुनील तटकरे....

माननीय राज्यमंत्री महोदय, आपण विरोधी पक्षात असताना वेगवेगळ्या प्रकरणी एसआयटी चौकशीची मागणी करीत होता. त्यामुळे या प्रकरणी सुध्दा एसआयटी मार्फत चौकशी करण्यात येईल काय आणि मुंबई महानगरपालिकेचे कॅगमार्फत विशेष लेखा परीक्षण केले जाईल काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगितले की, मुंबई महानगरपालिकेत जो भ्रष्टाचार निदर्शनास आला तो हिमनगाचे एक टोक दिसते. त्यामुळेच आम्ही त्या प्रकरणी चौकशी केली. या प्रकरणी सविस्तर व सखोल चौकशी झालेली आहे. तसेच गरज वाटली तर सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे ती सुध्दा चौकशी करण्यात येईल. राज्य सरकारने जी चौकशी केली त्यामध्ये दोष सिध्द झालेले आहेत. यामध्ये काय चुका झालेल्या आहेत, काय भ्रष्टाचार झालेला आहे....

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : मी हा प्रश्न राखून ठेवत आहे. या प्रश्नावर माननीय मुख्यमंत्र्यांनी निर्णय घ्यावा, एवढेच या निमित्ताने सांगतो.

आता तारांकित प्रश्न क्रमांक-15752 चर्चेला घेण्यात येईल.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शासनाकडे पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाचे सचिव यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी मागितल्याबाबत**

***(३)*** * **१५७५२ *श्री.संदीप* बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनील तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते *:*** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाचे सचिव श्री.महेश पाठक यांनी सन २००५-२००६ मध्ये मुंबईचे जिल्हाधिकारी असताना घेतलेल्या एका निर्णयाबद्दल त्यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शासनाकडे मागितल्याची बाब दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

***(२)*** असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शासनाकडे श्री.महेश पाठक यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी कधी व किती वेळा व कोणाकडे मागितली व ती त्यांना मिळाली आहे काय,

***(३)*** असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने श्री.महेश पाठक यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी मागण्याची कारणे काय आहेत,

***(४)*** असल्यास, याबाबतचा तपास पूर्ण झाला आहे काय,

***(५)*** नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

***डॉ.रणजित पाटील,* श्री. देवेंद्र फडणवीस *यांच्याकरिता* :** (१), ***(२)*** व (३) माझगांव येथील भूकर क्र.१/१२६ आणि २/१२६ मधील मिळकतीस तत्कालीन जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी पुर्नविकासाची मंजुरी देताना अनर्जित रकमेची परिगणना योग्यप्रकारे न केल्याने शासनाच्या महसुलाची हानी झाली असल्याचे निदर्शनास आल्याने तत्कालीन जिल्हाधिकारी, मुंबई शहर व इतर ३ यांचेविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्याबाबत महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी दिनांक १४.९.२०१५ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे.

***(४)*** व (५) या प्रकरणी पुनर्विकासास परवानगी देताना वसू***ल*** केलेल्या अनर्जित उत्पन्नासंदर्भात महसूल विभागाचे अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही शासन स्तरावर विचाराधीन आहे.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी काल सांगितले की, भ्रष्टाचाराला आम्ही कुठेही थारा देणार नाही. परंतु या प्रश्नाच्या लेखी उत्तरात मान्य केले आहे की, या प्रकरणी अधिकारी दोषी आढळलेले आहेत. लेखी उत्तरात नमूद केले आहे की, तत्कालीन जिल्हाधिकारी, मुंबई शहर व इतर 3 यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, 1988 नुसार

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.क्र.15752....

श्री.संदीप बाजोरिया....

गुन्हा दाखल करण्याबाबत महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी दिनांक 14/09/2015 च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, त्या 3 अधिकाऱ्यांची नावे काय आहेत, तसेच.....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय,....

**सभापती** : मंत्री महोदय, आपण पुढील प्रश्नावर गेलेलो आहोत. त्यामुळे बाकीची चर्चा करण्यात काय अर्थ आहे ? माननीय मंत्री श्री.गिरीश बापट साहेब आपले काय म्हणणे आहे ?

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, आपण पुढे गेलो असलो तरी सन्माननीय राज्यमंत्री हे मुंबई महानगरपालिकेशी संबंधित असलेल्या प्रश्नावर उत्तर देत होते. सन्माननीय सदस्यांकडून वेगवेगळे प्रश्न विचारले जात होते. कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी प्रश्न राखून ठेवण्याची मागणी केलेली नसताना सुध्दा आपण सुमोटे हा प्रश्न राखून ठेवला आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : माझ्या माहितीनुसार सभागृहाने या बाबत मागणी केलेली होती. मी सर्व रेकॉर्ड तपासून घेतो. जर मागणी केली नसेल तर हा प्रश्न राखून ठेवला जाणार नाही. त्यामुळे आता सन्माननीय सदस्य श्री.संदीप बाजोरिया यांनी आपला प्रश्न विचारावा.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्यासह ज्या तीन अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे त्या तीन अधिकाऱ्यांची नावे काय आहेत ? वास्तविक पाहता नगर विकास विभागाने त्या जागेच्या वाटपाबाबत कोणताही निर्णय घेऊन नये असे लेखी निदेश दिलेले असताना सुध्दा संबंधित अधिकाऱ्यांनी या बाबत निर्णय घेतला. या मागील कारण त्यांनी असे सांगितले की, आम्हाला नगर विकास विभागाचे पत्र उशिरा मिळाले. तसेच मी विचारु इच्छितो की, या प्रकरणातील विकासकाचे नाव काय आहे ? संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक 14/09/2015 रोजी सादर करण्यात आलेला आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई का केली नाही, तसेच संबंधितांवर केव्हापर्यंत कारवाई करणार आहात ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.क्र.15752....

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे. या प्रकरणी जी वस्तुस्थिती मांडण्यात आलेली आहे त्या बाबत तपासणी करुन एक महिन्याच्या आत या बाबतचा निर्णय घेण्यात येईल.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, मी या प्रकरणातील तीन अधिकाऱ्यांची आणि विकासकाचे नाव काय आहे, असे विचारले होते. परंतु माननीय राज्यमंत्र्यांनी माझ्या प्रश्नाला उत्तर दिलेले नाही.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, श्री.महेश पाठक, तत्कालीन जिल्हाधिकारी मुंबई शहर, श्री.विलास पाटील, श्रीमती गोंडकर आणि श्री.साहेबराव चौधरी अशी त्या अधिकाऱ्यांची नावे आहेत.

श्री.संदीप बाजोरिया : महोदय, मी पुन्हा विचारतो की, विकासकाचे नाव काय आहे ?

**सभापती** : जर आपल्याला विकासकाचे नाव माहीत नसेल तर ते आपण पटलावर ठेवावे.

डॉ.रणजित पाटील : महोदय, विकासकाचे नाव पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी काल जाहीरपणे सांगितले की, राज्य सरकार भ्रष्टाचाराला पाठीशी घालणार नाही. दि.14 सप्टेंबर, 2015 रोजी एसीबीने शासनाला संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याबाबत पत्र पाठविले होते. त्यांनी पत्र पाठवून सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेला आहे. सहा महिने उलटून सुध्दा संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याबाबतचा निर्णय का घेतला नाही, राज्य सरकारकडून आयएएस लॉबीला पाठीशी घालण्याचे काम होत आहे काय ? महोदय, हे अतिशय गंभीर प्रकरण आहे. माझी विनंती आहे की, आपण हा प्रश्न राखून ठेवावा आणि या प्रश्नाला माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे.

**सभापती** : प्रश्न राखून ठेवला जाणार नाही हे माझे निर्देश आहेत. त्यामुळे आता आपण खाली बसावे.

आता तारांकित प्रश्न क्रमांक-14975 चर्चेला घेण्यात येईल.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पोलीस कल्याण निधी कायद्यात बदल करण्याबाबत तसेच पोलीस कर्मचाऱ्यांना प्रवास वाहतुक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

***(४)*** *** **१४९७५*अॅड.निरंजन डावखरे:*** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** पोलीस कल्याण निधी अधिनियमांतर्गत पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कल्याण संदर्भातील निधीचे वार्षिक अंदाजपत्रक पुरेसे नाही, हे खरे आहे काय,
***(२)*** असल्यास, सदर अल्प असणाऱ्या अंदाजपत्रकात वाढ करण्यात यावी, अशी मागणी राज्यातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेकडून शासनाकडे अनेक वर्षापासून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
***(३)*** असल्यास, अनेक पोलीस ठाण्यामध्ये पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना कर्तव्य बजावण्याच्या कामासाठी वाहनच उपलब्ध नसल्याचे, तसेच असलेले वाहन अनेकदा नादुरुस्त असल्याने पोलीस कर्मचाऱ्यांना वेळप्रसंगी दोन चाकी वाहनावर (Two ***Wheeler)*** प्रवास करण्याची वेळ येत असल्याच्या तक्रारीही पोलीस कर्मचाऱ्यांकडून शासनाकडे वारंवार करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
***(४)*** असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणी शासनाकडे वारंवार तक्रारी करुनही कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
***(५)*** असल्यास, याबाबत पोलीस कल्याण निधी कायद्यात बदल करण्याबाबत तसेच पोलीस कर्मचाऱ्यांना वाहने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ***?***

***प्रा.राम शिंदे, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता :*** (१) व (२) हे खरे नाही.
***(३), (४)*** व (५) सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षात निर्लेखित झालेल्या १६६६ वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास मंजूरी देण्यात आलेली असून त्या अनुषंगाने सन २०१४-२०१५ या वित्तीय वर्षात एकूण ७९६ जीप वाहने खरेदी करुन सदर वाहने विविध घटकांना वाटप करण्यात आलेली आहेत.

सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षात निर्लेखित झालेल्या ३५७ वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास मंजुरी देण्यात आलेली असून त्या अनुषंगाने सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात १३० वाहने खरेदी करुन विविध घटकांना वाटप करण्यात आलेली आहेत. अशाप्रकारे राज्यातील विविध घटकांकडे सद्य:स्थितीत एकंदरीत ४४२३ जीप वाहने उपलब्ध आहेत.

पोलीस कल्याण निधी कायद्यात बदल करण्याबाबतची कोणतीही बाब प्रस्तावित नाही.

अॅड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, पोलिसांच्या पगारातून पोलीस कल्याण निधीपोटी सातत्याने कपात केली जाते. पोलिसांच्या कॉन्ट्रीब्युशनमधून पोलीस कल्याण निधी उभा केला जातो. या वर्षासाठी 50 लाख रुपयांचा निधी जमा आहे. यातील 35 लाख रुपयांचा निधी वितरित



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14975...
ॲड.निरंजन डावखरे....

करण्यात आला आहे. मी विचारु इच्छितो की, उर्वरित 15 लाख रुपयांचा निधी लवकरात लवकर वितरित करण्यात येईल काय, तसेच पोलिसांच्या पगारातून कल्याण निधी उभा केला जात असल्यामुळे यामध्ये राज्य सरकार काही प्रमाणात मॅचिंग ग्रँट देईल काय ? तसेच या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, वाहने वगैरे घेतले जातात. महोदय, कोणाला गाड्या कॉन्ट्रीब्युट करावयाच्या असतील तर समाजामध्ये अनेक चांगले लोक आहेत. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, ही वाहने डेड स्टॉकमध्ये घेतल्यानंतर पेट्रोल, डिझेल आणि मेंटेनन्स कॉस्ट अशा प्रकारे रोटेशनचा खर्च शासन करणार काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये दुरुस्ती आहे. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात "130 वाहने खरेदी" ऐवजी "340 वाहने खरेदी" असे वाचावे. तसेच शेवटच्या परिच्छेदामध्ये 'कायद्यात बदल' ऐवजी 'नियमात बदल' असे वाचावे.

सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने सांगतो की, पोलीस, अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या पगारातून हा निधी घेतला जात नाही. अधिकारी आणि पोलीस कर्मचरी हे या कल्याण केंद्राचे कायमस्वरुपी सदस्य आहेत. वर्ग-3 मधील लिपिक आणि वर्ग-ड च्या कर्मचाऱ्यांना ऐच्छिक सभासदत्व दिले जाते. पोलीस कल्याण केंद्रासाठी अर्थसंकल्पातून दरवर्षी 50 लाख रुपयांचा निधी दिला जातो. हा निधी एकत्रित गोळा झाल्यानंतर त्यांच्या शैक्षणिक अनुदान आणि कुटुंब आरोग्य योजनेमध्ये ज्या बाबी समाविष्ट होत नाहीत आणि सभासदांना ज्या बाबींची आवश्यकता असते त्यासाठी माननीय पोलीस महासंचालकांच्या नियंत्रणाखाली हा निधी संबंधित युनिटला दिला जातो. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार हा निधी पगारातून नव्हे तर वार्षिक वर्गणीतून जमा केला जातो आणि त्यातून हा खर्च केला जातो. तसेच मोटार व्हेईकलच्या खर्चात वाढ करण्याबाबत सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे. शासन स्तरावर या बाबतचा प्रस्ताव आला आहे. शिवाय त्यांना काही अधिकचे अधिकार प्रदान करण्याची आणि खर्चासाठी जास्त तरतूद करण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. त्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येईल.

**सभापती** : या तारांकित प्रश्नावरील चर्चा संपेपर्यंत प्रश्नोत्तराचा तास वाढविण्यात येत आहे.

जी....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14975....

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, पोलीस कल्याण निधी हा पोलिसांच्या कल्याणासाठी करण्यात आला आहे आणि याच्या नियमावली डीजी ऑफिसमध्ये वेळोवेळी केल्या जातात. परंतु आज पोलीस कल्याण निधीचा ट्रस्ट आहे का ? माझ्या माहितीप्रमाणे तसा कोणताही ट्रस्ट नाही. राज्यामध्ये पोलीस कल्याण निधी नावाने हा पैसा अनेक कार्यक्रमांच्या माध्यमांतून गोळा केला जातो. हा पैसा पोलिसांच्या उत्कर्षासाठी गोळा केला जातो. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. आज ही माहिती आपल्याकडे उपलब्ध असणार नाही. राज्यामध्ये पोलीस कल्याण निधीच्या माध्यमातून किती पैसा गोळा झाला, त्याचा खर्च कोणत्या पध्दतीने झालेला आहे, पुढच्या काळात धोरणात्मक निर्णय म्हणून पोलीस, कॉन्स्टेबल, पीएसआय, पीआय या केडरच्या अनुषंगाने खर्च करणार आहोत का ? पोलीस कल्याण निधीची जबाबदारी होम, डीवायएसपीकडे असते आणि त्याचा खर्च वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे केला जातो. काही ठिकाणी त्याचा उपयोग चांगल्या पध्दतीने होतो तर काही ठिकाणी होत नाही. धोरणात्मक निर्णय असला पाहिजे. आपल्याकडे कॉन्स्टेबलची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. कल्याण निधीतून जास्तीत जास्त शेअर कॉन्स्टेबल, पीएसआय या केडरवर खर्च करणार आहोत का, अशी एक धोरणात्मक भूमिका पुढच्या काळात पोलीस कल्याण निधीबाबत शासन घेणार आहे का किंवा याचा ट्रस्ट करून यावर काही निर्बंध आणणार आहोत का ?

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. ते या विभागाचे मंत्री होती, त्यामुळे त्यांचा अनुभव मोठा आहे. पोलीस कल्याण निधीची स्थापना दिनांक 22.02.1980 ला झाली आणि त्यानंतर त्याच्या नियमातील सुधारणा दिनांक 06.06.2015 मध्ये करण्यात आली. हा निधी एकत्रितरित्या गोळा होतो. शासनाचाही 50 लाख रुपयांचा हिस्सा दरवर्षी दिलेला असतो. सदर बाबतीतील बैठका डीजी लेव्हलला दर 6 महिन्यांनी होत असतात, यामध्ये जवळपास 15 ते 16 सदस्य असतात. निश्चित स्वरुपात या संदर्भात एक बैठक देखील झालेली आहे. नियमांमध्ये काही बदल करण्याची आवश्यकता आहे का, काही अधिकार वाढविण्याची आवश्यकता आहे का ....

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14975....

**सभापती** : मंत्रिमहोदय, परत एक बैठक घ्यावी आणि विषय संपवून टाकावा.

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, आपण संगितले ....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचा अनुभव दांडगा आहे, आपण कबूल केले आहे. आता सन्माननीय सदस्यांना बोलावून तसेच माननीय उप सभापती श्री. वसंतराव डावखरे, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांना बोलावून बैठक घ्यावी आणि आता हा प्रश्नोत्तराचा तास संपू द्यावा.

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, निश्चितपणे त्यांचा अनुभव दांडगा आहे हे जरी मी कबूल केले असले तरी, त्यांना बैठक घेऊन जरी ही सुधारणा करता आली नसली तरी, त्यांचे म्हणणे लक्षात घेऊन आणि आपल्या निर्देशाप्रमाणे ही बैठक लवकर बोलावून या संदर्भात कार्यवाही केली जाईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तारांकित प्रश्नांच्या संदर्भात

**सभापती** : मला सदनाच्या निदर्शनास एक गोष्ट खेदपूर्वक लक्षात आणून द्यायची आहे की, दिनांक 10 मार्चपासून तारांकित प्रश्न सुरू केले. मी आपल्याला क्रमांकच वाचून दाखविणार आहे. 10 मार्चला 1 प्रश्न झाला, 11 मार्चला 5 प्रश्न झाले, 14 मार्चला 4 प्रश्न झाले, 15 मार्चला परत 1 प्रश्न झाला आणि आज 4 प्रश्न झाले. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती राहणार आहे. मी काही निर्देश देणार नाही. मला सहकार्य करावे. आपण कमीत कमी 10 प्रश्नांपर्यंत नेले आहे आणि आपल्या सहकार्यानेच हे नेले आहेत. आपले यापुढेही सहकार्य रहावे एवढेच माझे निवेदन आहे.

श्री. गिरीश बापट : सभापती महोदय, आपले म्हणणे बरोबर आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर उप प्रश्न किती वेळ विचारू द्यायचे, किती जणांना विचारू द्यायचे याचे एक तारतम्य सन्माननीय गट नेत्यांशी बोलून ठरवावे. कारण 8-10 सन्माननीय सदस्य उप प्रश्न विचारतात.

----

..4

<u>नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सुचनांबाबत</u>

**सभापती** : काल दिनांक 15 मार्च, 2016 रोजी सर्वश्री. संजय दत्त, मुझफ्फर हुसेन, शरद रणपिसे, वि.प.स. यांनी सायंकाळी 07.23 वाजता "राज्यात हजारो पॅथॉलॉजी लॅब बोगस पॅथॉलॉजिस्ट चालवत असल्याने निदानाचा काळाबाजार सुरू असणे, अशा लॅबवर वैद्यकीय शिक्षमंत्र्यांनी कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिलेले असणे, या संदर्भात वर्षभरात परिपत्रक काढण्यास टाळाटाळ करीत असल्याने अद्याप कोणत्ीही कारवाई न झाल्याने बोगस पॅथॉलॉजी लॅब चालविणाऱ्या डॉक्टरांची संख्या दिवसेंदिवस वाढणे, मुंबईसह आजुबाजूच्या परिसरात 700 ते 800 आणि राज्यभरात 5000 बोगस पॅथॉलॉजी लॅब असणे, या लॅबमध्ये पॅथॉलॉजिस्ट नसतानाही रूग्णांना तपासणी अहवाल देण्यात येणे, याशिवाय या केंद्रांत लिंग चाचणी करण्यात येत असल्याने महाराष्ट्रात मुलींच्या मृत्यूदरात प्रचंड वाढ होणे, त्यामुळे अशा पॅथॉलॉजी लॅबवर कारवाई होण्याबाबतीत असलेली मागणी" या विषयाबाबत म.वि.प. नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नियमांतील एखादा नियम स्थगित करणे यासंबंधाचा नियम 289 आहे. कोणत्याही सन्माननीय सदस्यांस माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्याच्या बाबतीत सूचना देता येईल. यावरून असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास व इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. वरील विषय आजच्या कामकाजपत्रिकेत समाविष्ट नसल्यामुळे मी सूचना नाकारीत आहे. परंतु विषयाचे गांभीर्य व महत्त्व पाहता सन्माननीय सदस्यांना 2 मिनिटे बोलण्याची मी परवानगी देत आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, हा विषय प्रत्येक अधिवेशनात चर्चेला येतो. राज्यभर प्रत्येक ऑथोरिटीला मॉनिटरिंग करणारी ऑथोरिटी असताना राज्यात बोगस पॅथॉलॉजी लॅब आहेत. महाराष्ट्र पॅथॉलॉजिस्ट असोसिएशनच्या हिशेबाने राज्यभरात 5000 ते 7000 बोगस लॅब आहेत. प्रत्येक शहरात, प्रत्येक गावात अशी लॅब कोण उघडतो ? टेक्निशिअनने सह्या केलेले पत्र

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय दत्त ....

असतात. ते अहवाल देतात. सर्वात गंभीर बाब अशी आहे की, या अहवालावर डॉक्टर पुढील उपचार करतात, म्हणजे पुढील उपचार फॅटल होऊ शकतात, याची कल्पना शासनाला आहे. याबाबतीत माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी स्पष्टपणे आश्वासन दिले होते की, ज्या पॅथॉलॉजी लॅबची महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी झालेली नाही अशा लॅबवर कारवाई करण्यात येईल. तसेच त्यावेळी असेही आश्वासन देण्यात आले होते की, राज्य स्तरावर 5 समित्या व अन्न व औषध प्रशासन म्हणजे एफडीए व पोलिसांची स्वतंत्र पथकेही नेमण्यात येतील. सभापती महोदय, या विषयाचे गांभीर्य सरकारला कळलेले नाही की मुद्दाम सरकार दुर्लक्ष करीत आहे हे मला कळत नाही. माननीय मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी आपल्याला निश्चितपणे विनंती करतो की, हे कामकाज बाजूला सारून या विषयावर चर्चा करण्याची संधी द्यावी. आपण तशी संधी देणार नसाल तर हा प्रश्न एका वेगळ्या आयुधाने उपस्थित करण्याची संधी मला द्यावी अशी माझी विनंती आहे. माननीय मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी आश्वासन दिले आहे. सभापती महोदय, दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी का झालेली नाही, काय अडचणी आहेत, याची दखल शासन कशी घेणार आहे याचे 2 मिनिटांत निवेदन करण्याची त्यांना आपण सूचना द्यावी.

**सभापती** : माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण म्हटल्याप्रमाणे या विषयी सविस्तर निवेदन करू सन्माननीय सदस्य सर्वश्री. भाई गिरकर, प्रकाश गजभिये यांची लक्षवेधी सूचना या विषयावर आहे. ती लक्षवेधी सूचना कालच्या गोंधळामुळे पुढे गेली आहे. सदर विषयावर जर एकदा अर्धा तास चर्चा लावली तर सविस्तर चर्चा करता येईल. अर्धा तास चर्चा नसेल तर वेगळ्या मार्गाने या विषयावर जर या सभागृहात चर्चा झाली तर बरे होईल.

**सभापती** : माझे म्हणणे आहे की, सन्माननीय सदस्यांना वेगळ्या मार्गाने परत हा विषय काढू द्यावा. हा विषय अतिशय गंभीर आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, असे असेल तर आपल्या दालनात या विषयाच्या संदर्भात बैठक घेऊ.

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : ठीक आहे.

श्री. संजय दत्त : माझी विनंती आहे. माननीय मंत्र्यांनी या संदर्भात आश्वासन दिले होते, त्याचे काय झाले, आश्वासनाची अंमलबजावणी का झाली नाही एवढे तरी सांगावे. बैठक घेऊन काय होणार आहे ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहात या विषयावर चर्चा झाली होती. केंद्रीय आरोग्य खात्याकडून यासंबंधी कर्मचारी की टेक्निशियन या विषयातील स्पष्टतेचा प्रश्न होता. आपल्या मागच्या कायद्यात त्याला केंद्र सरकारने आक्षेप घेतला होता की, यांना टेक्निशियन न म्हणता कर्मचारी म्हणावे. कर्मचारी म्हणायला डीएमएलटी संघटनेने विरोध केला होता. आता केंद्र सरकारकडून त्या विषयात स्पष्टता घेतली आहे, ज्याला डीएमएलटी संघटनेची मान्यता आहे. चुकीच्या डीएमएलटींवर कारवाई केली पाहिजे हे बरोबर आहे.

....H

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे.......

ते करीत असताना चांगल्या डीएमएलटींवर कारवाई झाली तर गोंधळ निर्माण होऊ शकतो. त्यामुळे ही बाब लक्षात घेऊन केवळ वैद्यकीय शिक्षण विभागाने या संदर्भातील मानके ठरविणे योग्य नाही. नगरविकास विभागांकडून या संदर्भातील अंमलबजावणी होत असते. त्यामुळे दोन्ही विभाग मिळून या संदर्भात आम्ही कार्यवाही करीत आहोत. गेल्या 15 वर्षात या संदर्भातील निर्णय झाला नसला तरी येत्या 15 महिन्यात आम्ही निर्णय करू.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, हा विषय यापूर्वीही मी सभागृहात मांडला होता. आता हा विषय अंतिम टप्प्यात आलेला आहे. बोगस डॉक्टरांसंदर्भात एक समिती आहे व त्या समितीने यावर कारवाई करावी, असा प्रस्ताव असलेली फाईल गेल्या वर्षभरापासून महसूल व गृह विभागाकडे पडून आहे. त्यांना असे वाटते आहे की, एक वेगळी समिती गठीत करावयाची आहे. परंतु, या संदर्भात वेगळी समिती नियुक्त करावयाची नाही तर ज्याप्रमाणे बोगस डॉक्टरांसंदर्भात तरतूद आहे तशीच बोगस पॅथॉलॉजी संदर्भात तरतूद केली तर हे होऊ शकेल. या संदर्भातील सर्व माहिती सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.रणजित पाटील यांना आहे. मी गेल्या सहा महिन्यांपासून या फाईलचा फॉलोऑप करीत आहे. महसूल विभागाकडे ही फाईल पडलेली आहे. त्यांनी या फाईलला क्लिअरन्स दिला तर लवकरात लवकर हा विषय संपेल, हे मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो.

----------

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**म.वि.प.नियम 289 अन्वयेच्या सूचनांसंबंधी**

**सभापती :** आज दिनांक 16 मार्च, 2016 रोजी श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी सकाळी 11.00 वाजता "राज्यातील पत्रकारांना पेन्शन मिळावे आणि काम करताना होणाऱ्या हल्ल्यांपासून संरक्षण मिळावे यासाठी कायदा करावा या मागण्यांसाठी राज्यातील तमाम पत्रकारांनी आज एसएमएस भडीमार आंदोलन पुकारणे, राज्यातील पत्रकारांवर वाढते हल्ले होणे, वृत्तपत्र कार्यालयांवर हल्ले होणे, सावंतवाडीच्या लोकमत पत्रकारावर महिलांकरवी हल्ला होणे आणि त्याच पत्रकारावर उलट केस करणे, पत्रकारांच्या जीवाला आणि इभ्रतीला धोका निर्माण होणे, राज्यातील अभिव्यक्ती व वृत्तपत्र स्वातंत्र्य त्यामुळे धोक्यात येणे, स्वतंत्र पत्रकारितेला कायदेशीर संरक्षण मिळण्याची आवश्यकता असणे" या विषयावर म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधीचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा असा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. परंतु, उक्त विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे. तथापि, विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मी मोजून दोन मिनिटे बोलण्याची परवानगी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना देत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, प्रसिध्दी माध्यमांना लोकशाहीचा चवथा खांब असे म्हटले जाते. वर्तमानपत्रामध्ये काम करणाऱ्या पत्रकारांवर सातत्याने हल्ले होत आहेत. त्यामुळे पत्रकार अशी मागणी करीत आहेत की, या संदर्भात कायदा झाला पाहिजे. शासनाने अनेकदा आश्वासन देऊन अद्याप कायदा झालेला नाही. कायद्याचे प्रारुप तयार झाले असले तरी ते अद्याप सभागृहापुढे आलेले नाही.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील.......

सभापती महोदय, पत्रकारांना पेन्शन लागू करावे, ही जुनी मागणी आहे. मी पत्रकार म्हणून काम करीत असताना एक मोठा मोर्चा या मागणीसाठी काढला होता. गेल्या 25 वर्षांपासून पत्रकारांना आर्थिक स्थैर्य लाभलेले नाही. राज्य सरकारने पत्रकारांना पेन्शन सुरु करण्याचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनाबाबत काय झाले ?

सभापती महोदय, या दोन्ही आश्वासनांबाबतचा खुलासा शासनाने केला पाहिजे. आज पत्रकार सनदशीर मार्गाने एसएमएस भडीमार आंदोलन करीत आहेत. माझी संसदीय कार्य मंत्री महोदयांना आपल्या माध्यमातून विनंती आहे की, लोकशाहीच्या या चवथ्या खांबाच्या व्यथा, वेदना समजून घेऊन त्यांच्या मागण्यांसंदर्भात शासनाने स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे व त्यासंदर्भातील निवेदन सभागृहात केले पाहिजे.

**सभापती :** संसदीय कार्य मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, पत्रकारांसंबंधीचा अतिशय महत्वाचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. सन 2012 मध्ये याबाबतचा प्रश्न उपस्थित करुनही अद्याप निर्णय झालेला नाही. केंद्र शासनाने या संदर्भात एक समिती नियुक्त केली होती. व्यवस्थापक आणि पत्रकार यांना ज्याप्रमाणे वेतन मिळते त्याप्रमाणे अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतचा विषय या समितीकडे होता. आपल्या राज्यातही सन्माननीय श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली होती. त्या समितीचाही निर्णय अद्याप झालेला नाही. तो अहवाल पूर्णपणे स्वीकारला गेला नाही. या सविस्तर विषयावर वेगळे पण सविस्तर निवेदन सभागृहात केले जाईल.

**सभापती :** शासनाने या विषयी निवेदन करावे, असे मी निदेश देत आहे.16-03-2016

या नंतर आज दिनांक 16 मार्च, 2016 रोजी श्री.प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी सकाळी 11.00 वाजता "दिनांक 15 मार्च, 2016 रोजी नागपूर येथील हिंगणा येथे वायू गळतीमुळे चार सफाई कामगारांचा मृत्यू होणे, राज्यात अशाच प्रकारे शेकडो कामगारांचा मृत्यू होत असणे, त्यांना सदर सफाईचे काम गटार लाईन, चेंबर तसेच विहिरीमध्ये अशा विषारी वायू असलेल्या ठिकाणी

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती.......

काम करावे लागत असल्याने त्यांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, त्याचप्रमाणे पिडीत कुटुंबास वेळेवर मदत न मिळणे तसेच मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या कुटुंब सदस्यास अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावून घेण्यात प्रशासनाकडून होत असलेली दिरंगाई" या विषयावर म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधीचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा असा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. परंतु, उक्त विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे. तथापि, विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मी मोजून दोन मिनिटे बोलण्याची परवानगी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांना देत आहे.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, राज्यात शेकडो सफाई कामगार मृत्युमुखी पडत असतात. राज्यात स्वच्छता ठेवण्याचे काम ते करीत असतात. सफाई कामगार गटारात, चेंबरमध्ये आणि गटर लाईनमध्ये स्वच्छतेसाठी उतरत असतात. गटारात गॅस तयार होत असतो व साफसफाई करीत असताना या गॅसमुळे त्यांना मृत्यू ओढवतो. अशाच प्रकारे श्री.सुनिल मेश्राम, विकी सुनिल वाल्मिकी, सुनित दिनेश चव्हाण व बाल्या नामदेव मसादे या चार सफाई कामगारांचा मृत्यू झालेला आहे व एकाची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. नागपूर महानगरपालिकेच्या कार्यकक्षेतील मानवसेवा कॉलनीत नागपूर सुधार प्रन्यासच्या गटर टँकमध्ये 9 वर्षाचा बालक गुफरान अकबरअली मरण पावला आहे. या अतिशय गंभीर स्वरूपाच्या घटना आहेत. मृत्यू पावलेल्या सफाई कामगारांच्या कुटुंबीयांना वेळेवर मदत मिळत नाही, पाल्यांना शासकीय सेवेत सामावून घेतले जात नाही. त्यामुळे मृत पावलेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना 2 लक्ष रुपयांची तातडीची मदत आणि पाल्यास शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** सन्माननीय सदस्यांच्या नियम 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने निवेदन करण्याबाबतचे निदेश शासनास देण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने आपणास सविस्तर निवेदन प्राप्त होईल.

-----------

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## सभागृहाच्या दिवसाच्या कामकाजाविषयी पीठासीन अधिकाऱ्यांची घोषणा

**सभापती :** आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील कामकाजात काही बदल करण्यात आला असून त्याची माहिती मी सभागृहाला देत आहे.

आता कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे, हे कामकाज होईल. कामकाज पत्रिकेतील नियम 93 च्या सूचना, नियम 93 अन्वये सूचनांची निवेदने, लक्षवेधी सूचना, शासकीय विधेयके, अर्धा-तास चर्चा, नियम 93 अन्वये अल्पकालीन चर्चा हे कामकाज पुढे ढकलण्यात येत आहे. राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा पूर्ण झाली तर पुरवणी मागण्यांवरील चर्चा घेण्यात येईल.

------------

...7....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** सदस्यांचा परिचय

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, श्री.अरुण काका जगताप यांचा विधान परिषद सदस्य म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

------------

...8....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** :नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला बँकिंग परवाना मंजूर होणे

**मु.शी.** :नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला बँकिंग परवाना मंजूर होणे या संबंधी सहकार मंत्र्यांचे निवेदन

श्री.चंद्रकांत पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो..

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----------

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, प्रखर दुष्काळ असलेल्या मराठवाड्यातील तीन बँकांनी अशाच पद्धतीने राज्य शासनाकडे मदतीची मागणी केली होती. (...अडथळा...) केव्हा करणार आहात ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, ज्या ठिकाणी अशा स्वरुपाची मागणी आहे त्या बँकांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी आहेत आणि त्या बँकांमध्ये अफरातफर झाल्यामुळेच त्या बँका बुडालेल्या आहेत, अशी स्थिती आहे. राज्य सरकार अशा सर्व बँकांच्या संदर्भात चौकशी करुन जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कायद्यानुसार फौजदारी कारवाई करुन (...अडथळा...) आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे. ते जे करावयाचे आहे ते करतील. काय करावयाचे ते मी सांगतो. त्यामुळे ज्या बँका बुडालेल्या आहेत, जे त्याला कारणीभूत ठरलेले आहेत आणि जे हजारो कोटी रुपये पाण्यामध्ये गेलेले आहेत त्याची चौकशी करण्याचे धोरण सरकारने स्वीकारलेले आहे. एका बाजूला ती चौकशी सुरु राहील.

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय,....

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.राजूरकर साहेब, आपल्याला निवेदनावर प्रश्नोत्तरे कशी विचारता येतील ? आपण वेगळ्या माध्यमातून हा विषय उपस्थित करावा.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, परंतु, कोणत्याही शेतकऱ्याला मदतीपासून वंचित ठेवता कामा नये. म्हणून दुसऱ्या बाजूला शासनाच्या माध्यमातून अशाही बँकांना मदत देण्याच्या संदर्भात राज्य शासन विचार करीत आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, ज्या बँकांमध्ये गैरकारभार झालेला आहे त्या संदर्भात मंत्री महोदयांनी सांगितले की, शासन चौकशी करील. शासनाने जरुर चौकशी करावी. आमचे त्याबद्दल दुमत नाही. परंतु, या चौकशीच्या मागे त्या बँकांना मदत न करण्याचे राज्य शासनाचे जे धोरण आहे ते चुकीचे आहे. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला थेट माननीय पंतप्रधानांच्या कार्यालयाकडून मदत दिली जाते. अकोला व बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला देखील मदत दिली जाते. मग मराठवाड्यातील बँकांनी असे कोणते पाप केलेले आहे की, मराठवाड्यातील एकाही बँकेला मदत करावयाची नाही ? कोणता तरी राग कशावर काढण्यात काही मतलब नाही.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, ज्या लोकांनी भ्रष्टाचार केलेला आहे त्यांच्यावर आम्ही कारवाई करु. परंतु, भ्रष्टाचार केलेल्या काही लोकांनी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केल्याबरोबर त्यांच्यावरील कारवाई माफ करण्यात आलेली आहे, याबाबत स्पष्टीकरण द्यावे. मी नांदेड येथील बँकेसंबंधी बोलत आहे.

**सभापती** : आपण उपस्थित केलेल्या प्रश्नाला ते उचित मार्गाने उत्तर देतील. आता आपण पुढील कामकाज घेऊ.

--------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.एकनाथराव खडसे (कृषी मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये गृह विभागाचा सन २०१०-२०११, २०११-२०१२ व सन २०१४-२०१५ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि सन २०१०-२०११ व सन २०१४-२०१५ या वित्तीय वर्षातील योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा सन २०१४-२०१५ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे (मराठी भाषा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये मराठी भाषा विभागाचा सन २०११-२०१२ व सन २०१४-२०१५ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ओवेशी यांच्या वक्तव्याबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला आपल्या परवानगीने पॉईंट ऑफ इन्फर्मेशन उपस्थित करावयाचा आहे. मला आपल्याकडून माहिती घ्यावयाची आहे.

**सभापती** : आपल्याला माझ्याकडून माहिती घ्यावयाची आहे का सदनाकडून माहिती घ्यावयाची आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सदनाकडून आपल्याकडे सूचना आलेली आहे काय, याबाबत माहिती घ्यावयाची आहे. कारण, परवा केंद्रीय नेत्यांनी संघ वगैरे म्हटल्यानंतर म.वि.प. नियम 289 अन्वये सूचना देण्यात आली होती. परंतु, काल ओवेशींनी मी भारत माता की जय असे म्हणणार नाही असे म्हटले. या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे काय, याबाबत मला माहिती घ्यावयाची होती.

**सभापती** : आपण कागदपत्रे सभागृहासमोर ठेवत आहोत. आता आपण पुढे जाऊ.

-------

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

(पुढे सुरु.....

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा वित्तीय वर्ष सन 2013-2014 व 2014-2015 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा वित्तीय वर्ष सन २०१४-२०१५ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**श्री.रतन टाटा यांच्या वॉचमनची केबिन तोडल्याबाबत.**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, देशाचे उद्योगपती श्री.रतन टाटा अलिबाग तालुक्यामध्ये राहतात. मागील 25-30 वर्षापासून त्यांचे वास्तव्य अलिबाग शहरामध्ये आहे. सन 1991 पासून अलिबाग येथे त्यांचा बंगला आहे. ते कोणताही बॉडीगार्ड घेत नाहीत. माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांबरोबर ते नेहमी कॉमन कॅटेमरानने अलिबागला जातात. परंतु, त्यांच्या वॉचमनची केबिन सीआरझेड अंतर्गत तोडण्यात आलेली आहे. आज तेथे सुरक्षेचा कोणताही बंदोबस्त नाही, याची जबाबदारी कोणाची आहे ? तो वॉचमन तेथे 4 x 8 च्या केबिनमध्ये राहत होता, ती केबिन तोडण्यात आलेली आहे. परंतु, नंतर संबंधितांना कळले की, हा बंगला श्री.रतन टाटा साहेबांचा आहे. महसूल विभागाने ही कारवाई केलेली आहे. म्हणून शासनाने यामध्ये लक्ष घालून या संदर्भात कडक कारवाई केली पाहिजे.

सभापती महोदय, श्री.रतन टाटा हे आपल्या देशाचे भूषण आहेत. आम्ही त्यांना वेगळ्या तऱ्हेने ट्रिट करतो. आपल्या निवृत्तीनंतर ते अलिबाग शहरात महिन्यातील 15-20 दिवस राहतात. ते सर्वसामान्य माणसांप्रमाणे शहरामध्ये फिरतात. म्हणून शासनाने झालेल्या कृत्याची दखल घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

**सभापती :** मंत्री महोदय, आवश्कता वाटल्यास त्यांना सुरक्षा देता आली तर तेही बघावे.

श्री.एकनाथराव खडसे पाटील : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

-------

..8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : म.वि.प. नियम 93 अन्वये प्राप्त झालेल्या सुचनेसंबंधिचे माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी "कल्याण तालुक्यातील काटई ते बदलापूरपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या हॉटेल, ढाबे यांच्याकडून एमआयडीसीच्या जलवाहिनीला छिद्र पडून पाणी चोरी होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी "राज्यातील 53 टोलनाक्यांमधून एस.टी. बस व स्कूल बस यांना मुक्त केले तर कंत्राटदारांना 798 कोटी रुपये शासनाकडून द्यावे लागण्याचे उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी "शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद मुलांचे वसतिगृह बांधण्यासाठी रु.2.98 कोटी इतकी रक्कम मान्य झाली असून वसतिगृहाचे अर्धवट झालेले काम पूर्ण करण्यासाठी रु.1.81 कोटींची आवश्यकता असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी "खोपोली शिळफाटा (ता.खालापूर, जि.रायगड) येथील व्यापारी असोसिएशन अध्यक्ष व बांधकाम व्यावसायिक श्री.राजेंद्र अभाणी यांच्यावर झालेला खूनी हल्ला" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..9...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

सचिव.......

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "जिल्हा परिषद हायस्कूल धानोरा, जि.गडचिरोली या शाळेतील अनेक विद्यार्थ्यांना अनेक वर्षांपासून विद्यावेतन मिळालेले नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "मुंबईतील कांदिवलीतील एका अल्पवयीन मुलीवर फुग्यातून ॲसिड हल्ला झाल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक 15.03.2016 रोजी उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संदिप बाजोरिया यांनी "भुसावळ जिल्हा जळगांव येथील तत्कालीन तहसीलदार श्रीमती वैशाली हिंगे यांनी माहे फेब्रुवारी, 2014 मध्ये 2655 रेशन कार्डवर एकत्रितरित्या नियतनाची वाढ करुन दुकानदारांना धान्य देत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..J-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव....

सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण यांनी "जोगेश्वरी (मुंबई) पश्चिम येथील समाजवाडी पटेल नगर मधील महापालिका शाळेच्या मैदानासाठी राखीव असलेल्या एका विकासकाने महापालिकेची फसवणूक करुन 19 मजली बेकायदा इमारत बांधलेली असणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारित आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या 10 बस चालकांच्या डोळ्यामध्ये रंगदोष, रातआंधळेपणा असल्याचे दिनांक 18/04/2015 रोजी निदर्शनास आल्यावर त्यांना सेवेतून कमी करण्याचा अमानवी निर्णय घेण्यात येणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारित आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी "वाशिम नगरपरिषदेअंतर्गत भुयारी गटार योजना, रस्ते योजना, प्रशासकीय इमारत इ.कामांसाठी ई-निविदा न काढताच कामे सुरु करण्यात येणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारित आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील, यांनी "दक्षिण मुंबईतील जसलोक रुग्णालयाच्या व्यवस्थापनाविरुध्द कामगारांच्या अंतर्गत युनियनने कामगार आयुक्तांकडे लेखी तक्रार दिल्याची बाब माहे फेब्रुवारी, 2016 च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस येणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारित आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "बीड जिल्ह्यातील महिला बचत गटांनी तयार केलेले साहित्य विक्री व प्रदर्शनासाठी ठेवण्याकरिता येत असलेल्या अडचणी आणि निधी उपलब्ध असतानाही केवळ प्रशासकीय दिरंगाईमुळे विक्री केंद्राच्या बांधकामास विलंब होणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारित आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव....

सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण यांनी "डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील मुलांच्या वसतिगृहाच्या बांधकामासाठी 16 कोटी रुपये निधी मिळण्याबाबत होत असलेली मागणी." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारित आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री.जयंत प्र.पाटील, संजय दत्त यांनी "कामोठे (नवी मुंबई) येथील एमजीएम मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएस तसेच नर्सिंगचे शिक्षण घेणाऱ्या 36 विद्यार्थिनींना जेवणातून विषबाधा झाल्याची घटना उघडकीस येणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारित आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त, यांनी "फिक्स डोस कॉम्बिनेशन असलेल्या तब्बल 344 औषधांवर तज्ज्ञ केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिनांक 16/03/2016 रोजी बंदी घातल्याचे निदर्शनास येणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारित आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.हरिभाऊ राठोड, यांनी "हिंगणा (नागपूर) येथील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिनांक 15/03/2016 रोजी शौचालयाच्या चेंबरमध्ये वायुगळती होऊन चार सफाई कामगारांचा मृत्यू होणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारित आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण यांनी "मौजे पायगाव व खारगांव, ता.भिवंडी, जि.ठाणे येथे मे.सनसिफ इन्व्हेस्मेंट या घटकास उद्योग संचालनालयाने प्रायव्हेट इंडस्ट्रीयल स्थापन्याकरिता परवानगी देणे, मात्र त्या ठिकाणी निवासी संकुलाचे बांधकाम करुन सर्व सामान्यांना विकणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारित आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

----------

....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**म.वि.प.नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेसंबंधी**

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माझी आपणाला विनंती अशी आहे की, दुष्काळाच्या संदर्भात दोन्ही सभागृहात दोन दिवस भरपूर चर्चा झाली, सरकारकडून उत्तर देखील देण्यात आले आहे. तरी देखील आज कामकाज पत्रिकेवर नियम 97 अन्वये दुष्काळाच्या संदर्भात अल्पकालीन चर्चा दर्शविण्यात आलेली आहे. एका रात्रीत काय फरक पडेल व सरकार नव्याने काय माहिती आपणाला देऊ शकणार आहे....(अडथळा)....चर्चा होणार नाही तर ठीक आहे, परंतु कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आली म्हणून मी हा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

--------

....4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(प्रस्ताव पुनः प्रस्तुत झाला)

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय राज्यपाल यांच्या अभिभाषणावर तीव्र नापसंती व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. काही सन्माननीय सदस्यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर काही सुधारणा प्रस्तावित केलेल्या आहेत. याबाबत मी त्याच दिवशी बोलणार होतो परंतु आपण मला त्या दिवशी थांबविले होते. सन्माननीय सदस्यांना सुधारणा मांडण्याची आपण अनुमती द्यावी अशी माझी आपणाला विनंती आहे.

सभापती महोदय, नवीन आर्थिक वर्षे सुरु होण्यापूर्वी राज्यपाल महोदयांचे होणारे अभिभाषण हे राज्य सरकारच्या पुढील वर्षाच्या दृष्टीकोनातून राज्य सरकार जनतेच्या हिताच्या दृष्टीकोनातून काय पावले उचलणार आहे याचे प्रतिबिंब म्हणून मानले जाते. घटनात्मक प्रमुख या नात्याने राज्यपाल महोदय, राज्य सरकार व मंत्रिमंडळाने तयार करुन दिलेल्या भाषणाचा मसूदा सदनाच्या संयुक्त सभागृहासमोर ठेवतात. राज्यपाल महोदयांच्या भाषणातील दुसऱ्या मुद्यामध्ये जनेतेच्या न्याय मागण्यांची पूर्तता करणे.

**उप सभापती** : राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर सन्माननीय सदस्यांना सुधारणा सूचवायच्या असतील तर त्या आताच देण्यात याव्यात.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सुधारणा दिलेल्या आहेत. आता जेवणासाठी सभागृहाची बैठक स्थगित करावी अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : एका एका सन्माननीय सदस्यांनी जेवणासाठी जावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण सांगितले की, सुधारणा मांडायच्या असतील तर त्या मांडाव्यात, सुधारणा मांडणारे सदस्य भोजनासाठी गेले असल्यामुळे ते सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे सभागृह नेते व सभागृहातील सन्माननीय सदस्यांची विनंती आहे की, सभागृहाची बैठक 2.15 पर्यंत स्थगित करावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : मंत्री महोदय, आपली संमती आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सभागृहाची बैठक अर्धा तास स्थगित करण्यास हरकत नाही. त्या कालावधीत सन्माननीय सदस्यांना जेवण करता येईल.

**उप सभापती** : आता सभागृहाची बैठक स्थगित होत असून दुपारी 2 वाजून 15 मिनिटांनी सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.37 ते 2.15 पर्यंत स्थगित झाली.)

या नंतर श्री.सांगळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मुझफ्फर हुसेन )**

**पृ.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

( चर्चा पुढे सुरु.....

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझ्या 10 सूचना आहेत.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांचा खूप अभ्यास आहे. यामुळे चांगले मार्गदर्शन होऊ शकते. आपण आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करीत आहोत. ही चर्चा दरवर्षी होत असते. विरोधकांच्या भाषणातून आपल्याला मार्गदशनपर तत्वे मिळत असतात. यामुळे भविष्यात चांगले काम करण्याच्या दृष्टीने मदत होत असते. साधारणपणे सदनात माननीय राज्यपालांचे भाषण झाल्यावर खेद व्यक्त केला जातो की, ही बाब समाविष्ट झाली नाही. ती समाविष्ट झाली असती तर बरे झाले असते. राज्य सरकारचे जे धोरणात्मक काम असते ते आपण माननीय राज्यपालांमार्फत अभिभाषणातून मांडत असतो. माझी सर्व सदस्य बंधुना विनंती आहे की, आपण आपले सर्व भाषण करावे. या सदनात मागील वर्षासह आजपर्यंत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर कधी मतदान झाले नाही व ते करु नये. याचे कारण असे आहे की, राज्यपाल यांचे पद घटनात्मक आहे. त्यांच्या मार्फत दोन्ही सभागृहे आणि राज्याचा कारभार केला जातो. आपण व्यक्त करीत असलेल्या विचारांचे स्वागत आहे. त्याबाबत आपल्याला स्वातंत्र्य आहे. परंतु आपण यासंबंधी मतदानाचा आग्रह करु नये. अन्यथा त्यातून अनेक घटनात्मक पेचप्रसंग निर्माण होतील. माझी सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांना विनंती आहे की, त्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे ऑन लेग आहेत.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे : माननीय मंत्री माझ्या सूचनेसंबंधी बोलले आहेत. मी त्यासंबंधी माझे म्हणणे मांडतो. मी भाषण करणार नाही. सभापती महोदय, संसदीय कामकाज मंत्र्यांनी आपल्याकडे प्रथा व परंपरा आहेत व त्या आपण पाळतो असे सांगितले. आपण या प्रथा व परंपरा नक्कीच पाळू. आम्ही हट्टला पेटून या सदनात एखादी गोष्ट मंजूर करुन घेणार नाही. ज्याप्रमाणे आपण खालच्या सभागृहात सहकार विधेयक आणि त्यासोबत 2-3 विधेयके मंजूर केली. ज्यावेळी सभात्याग होतो त्यावेळी सदनातील इतर कामकाज झाल्यास आमची काही हरकत नाही. परंतु तुम्ही सुध्दा प्रथा व परंपरा पाळल्या पाहिजेत. तुम्ही सुध्दा आमच्या अपरोक्ष विधानसभेत डायरेक्ट विधेयके पास करुन घेतली, ही बाब योग्य नाही, एवढी आठवण मी तुम्हाला करुन देतो. यात कर्ज मुक्ती, डाळ घोटाळा असे अनेक महत्त्वाचे मुद्दे आहेत. मी माझ्या भाषणात त्यावर सविस्तर बोलणार आहे. मी माझ्या भाषणाचा अधिकार अबाधित ठेऊन मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे परंपरा पाळतो. काल खालच्या सभागृहात आपण ही परंपरा मोडली आहे. ही बाब आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. आता माननीय श्री.सुनील तटकरे यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी अशी मी त्यांना विनंती करतो.

यानंतर L-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.गिरीश बापट यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याबद्दल आम्ही संमती दर्शवित आहोत. संसदीय परंपरा जतन करीत असताना ज्या कारणांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहून संसदीय लोकशाही निर्माण केली त्यामध्ये सत्ताधारी पक्षाइतकेच विरोधी पक्षाला सुध्दा महत्वाचे स्थान आहे. सत्ताधारी पक्षावर अंकूश ठेवण्याचे काम विरोधकांना करावे लागते. तरी सुध्दा काही चांगल्या प्रथा, परंपरा जतन करण्याच्या दृष्टीकोनातून आम्ही ही भूमिका घेत आहोत. माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी उल्लेख केला, त्या पध्दतीने विधेयके किंवा इतर बाबींसंदर्भात सरकारकडून आम्ही सौजन्याची माफक अपेक्षा व्यक्त करीत आहोत.

सभापती महोदय, सरकारला माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल गांभीर्य दिसत नाही. शिवसेना पक्षाने बहिष्कार टाकल्यासारखे दिसत असून फक्त उपस्थित राहण्यापुरता फतवा काढला म्हणून माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर सभागृहात उपस्थित दिसत आहेत. मनापासून ते उपस्थित असल्याचे त्यांच्या चेहऱ्यावरुन दिसत नाही. माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल सरकारच्या घटक पक्षातील ज्या माननीय सदस्यांनी अनुमोदन दिले ते आज या ठिकाणी उपस्थित दिसत नाहीत, कालही उपस्थित नव्हते. सकाळी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचारासंबंधी प्रश्न चर्चेला आला होता तेव्हा शिवसेना पक्षाचे सर्व मंत्री हट्टाला पेटल्यासारखे सभागृहात उपस्थित राहिले होते.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांचे पद हे घटनात्मक आहे. त्यांच्या अभिभाषणाबद्दल आभार मानणारा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाला महत्वाचा वाटत नाही यासारखी दुर्दैवाची बाब असू शकत नाही. इतकेच नव्हे तर अधिकारी गॅलरीमधील उपस्थित पाहून सरकारचा प्रशासनावर किती वचक आहे हे स्पष्ट होते. माननीय मुख्यमंत्री म्हणाले ते खरे आहे. त्याची प्रचिती वेळोवेळी येत आहे. अधिकारी आमचे ऐकत नाहीत असे माननीय मुख्यमंत्री म्हणतात त्याची प्रचिती आज या ठिकाणी दिसून येत आहे. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील प्रस्तावावर चर्चा सुरु होत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

16-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L.2

SGB/ ST/ AKN/ AKN/ AKN/ KTG/ 14:20

श्री.सुनील तटकरे.......

असताना अधिकारी गॅलरी पूर्णपणे रिकामी आहे. जी उपस्थिती दिसत आहे ती केवळ संसदीय कार्यमंत्री यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांची आहे. सरकारी अधिकाऱ्यांची या कामकाजाबाबत अनास्था दिसून येते. सभापती महोदय, हे राजकीय भाषण नाही, ही राजकीय टीका नाही. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चा सुरु होताना अधिकाऱ्यांची गॅलरी रिकामी असेल व तुम्ही माझे भाषण राजकीय मानणार असाल तर त्यापेक्षा दुसरे मोठे दु:ख असू शकत नाही. माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस 25 वर्षे विधिमंडळात सदस्य म्हणून काम करीत आहेत. आमची अपेक्षा होती की, त्यांना न्याय दिला जाईल. कोणत्या तरी राज्याचे राज्यपाल केले जाईल, त्यासाठी त्यांनी अट्टाहास करु नये. राज्यपाल म्हणून त्यांना अभिभाषण करण्याची संधी मिळावी अशा आमच्या मनापासून त्यांना शुभेच्छा आहेत. त्यासाठी त्यांची चाललेली धडपड मला या ठिकाणी व्यक्त करावयाची आहे.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणाच्या दुसऱ्या मुद्यामध्ये असे म्हटले आहे की, जनतेच्या न्याय मागण्यांची पूर्तता करणे, त्यांचे जीवनमान उंचावणे यासाठी माझे शासन कटिबध्द आहे. या प्रवर्गासाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रामध्ये जनतेच्या कल्याणासाठी अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत. आज 16 मार्च आहे. सांस्कृतिक वैचारिक दिवाळखोरी या सरकारने कशी सुरु केली त्याचे मूर्तीमंत उदाहरण आपल्यापुढे आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने डान्सबार संदर्भात निर्णय घेण्याबाबत राज्य सरकारला 15 मार्चपर्यंत मुदत दिली होती. या सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, संयुक्त समिती स्थापन केली जाईल किंवा डान्सबारला कोणतीही परवानगी दिली जाणार नाही. आज अनेक वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे. कालपासून राज्य सरकारने डान्सबारला परवाना देण्याचे काम सुरु केले आहे. राज्यपाल महोदयांनी दुसऱ्या परिच्छेदात आपले जे मनोगत व्यक्त केले त्या अनुषंगाने डान्सबारला परवानगी देणे म्हणजे सांस्कृतिक विचार असल्याचे सरकार मानणार असेल तर दुर्दैवाने महाराष्ट्रातील जनतेची यासारखी सामाजिक शोकांतिका मागील 60-65 वर्षात झालेली नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, महाराष्ट्रात 50 टक्के महिला भगिनींनी या डान्सबार संदर्भात खंबीर भूमिका घेतली. राज्याचे तत्कालीन गृहमंत्री स्व.आर.आर.पाटील यांनी या विषयाबाबत मोठया

...3...



श्री.सुनील तटकरे.........

प्रमाणात संघर्ष केला. तेवढे करुन ते थांबले नाहीत. या विषयाचे समूळ उच्चाटन केले गेले पाहिजे यासाठी ते प्रयत्नशील राहिले होते. तरुण मुलांचे जीवन या डान्सबारच्या माध्यमातून उद्ध्वस्त होत आहे, हजारो कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. या सामाजिक प्रश्नाची कणव मनात ठेवून लोकशाही आघाडी सरकारने ठामपणे डान्सबार बंदीची भूमिका घेतली होती. दुर्दैवाने या सरकारची सांस्कृतिक वैचारिक दिवाळखोरी महाराष्ट्राच्या जनतेसमोर येत आहे.

सभापती महोदय, या परिच्छेदातील दुसरा भाग या ठिकाणी मांडला आहे. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक जीवनमान उंचावण्याचे काम सरकार करीत आहे. माननीय सदस्य श्री.महादेव जानकर या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांच्यावर तुम्ही अन्याय केला आणि करीत राहणार आहात. सत्तेवर येण्यापूर्वी या सरकारने धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत भूमिका मांडली होती. राज्यामध्ये विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांना महाराष्ट्रातील जनता सामोरे जात होती. त्यावेळी भारतीय जनता पक्षाने धनगर समाजाला अभिवचन दिले. धनगर समाजाचा मोर्चा आदरणीय श्री.शरद पवार साहेबांच्या बारामतीमध्ये आणला गेला. त्यावेळी माननीय श्री.शरद पवार हे सत्तेवर नव्हते. सामाजिक प्रश्न सोडविण्याची ताकद आणि क्षमता त्यांच्यामध्ये आहे हे दाखविण्यासाठी त्या काळात तशा प्रकारचा मोर्चा आणण्यात आला. मोर्चा आणून थांबले नाहीत तर राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री त्यावेळी उपोषणाची सांगता करण्यासाठी श्री.महादेव जानकर यांच्याकडे गेले होते. त्यांनी सांगितले की, आमचे सरकार येऊ द्या, पहिल्या कॅबिनेट बैठकीमध्ये धनगर समाजाच्या आरक्षणाबाबतचा निर्णय आम्ही घेऊ. गेल्या 25-30 महिन्यात किती कॅबिनेट बैठका झाल्या याची आकडेवारी संसदीय कार्यमंत्र्यांकडे निश्चितपणे असावी. कॅबिनेट बैठकांचे शतक झाले आहे. या संदर्भात अद्याप कोणताही निर्णय घेतला गेला नाही. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात त्याचा साधा उल्लेख देखील नाही. माननीय सदस्य श्री.महादेव जानकर या अभिभाषणाला पाठिंबा देणार का? या संदर्भात त्यांच्या मनाची कसोटी घेणारा क्षण महाराष्ट्रातील धनगर समाज पहात आहे. सत्तेसाठी मी नाही ही बाब त्यांनी स्पष्ट केली आहे. परंतु अभिभाषणामध्ये याचा उल्लेख नसेल

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तर ज्याच्यासाठी तुम्ही अट्टाहास केला, ज्या कारणासाठी तुम्ही वैचारिक संघर्ष केला, प्रसंगी कॉंग्रेस पक्षावर कठोर टीका केली. धनगर समाजाला न्याय मिळाला पाहिजे यासाठी तुमची तळमळ आहे. त्या धनगर समाजाला आरक्षण मिळते की नाही याकडे आमचे लक्ष आहे.

......4.....

16-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L.4

SGB/ ST/ AKN/ AKN/ AKN/ KTG/ 14:20

श्री.सुनील तटकरे.........

सभापती महोदय, सभागृहातील विरोधी पक्षाचे माननीय सदस्य या विषयाबाबत सातत्याने बोलत आहेत. त्यावेळच्या आघाडी सरकारने हाही मुद्दा हाती घेतला होता. मराठा समाजाला आरक्षण देण्याची भूमिका घेतली. धनगर समाजाला आरक्षण देताना आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही ही भूमिका आमची होती. घटनेच्या शेडयुलमध्ये बदल केला जावा. मात्र तो अधिकार लोकसभेला आणि केंद्र सरकारला आहे, ही भूमिका आमच्या सरकारने त्यावेळी घेतली होती. मराठा समाजाला आरक्षण देण्याची भूमिका घेतली गेली. त्यावेळेला सच्चर समितीच्या अहवालामध्ये स्पष्ट बाब होती. शैक्षणिक क्षेत्रामध्ये मुस्लीम समाजावर मोठया प्रमाणावर अन्याय झाला आहे. दुर्दैवाने त्या समाजाला योग्य संधी मिळाली नाही. मुस्लीम समाजाला नोकरी आणि शिक्षण क्षेत्रात आरक्षण देण्याचा निर्णय लोकशाही आघाडी सरकारच्या माध्यमातून घेतला गेला. उच्च न्यायालयाने मराठा समाजाचे आरक्षण रद्दबातल ठरविले. मुस्लीम समाजाचे शैक्षणिक आरक्षण कायम ठेवले आणि नोकरीतील आरक्षणाबाबत निर्णय देताना स्थगिती दिलेली होती. एकीकडे सामाजिक समता सांगण्याचा प्रयत्न करीत आहात. एखादी बाब उपस्थित झाल्यानंतर मनामध्ये यातना निर्माण होतात, त्यामधून सभागृह वेठीस धरण्याचा प्रयत्न केला जातो. मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबत, मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबतचा कोणताही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये येऊ शकत नाही ही बाब दुर्दैवी आहे. माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांची फसवणूक झाली.

नंतर एम.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

तशी गत दर पाच वर्षांनी निवडणुकीच्या वेळी भूमिका बदलणाऱ्या श्री.विनायक मेंटेंची देखील झाली आहे. ते सदनाचे सन्माननीय सदस्य आहेत म्हणून मी त्यांचे नाव जाणीवपूर्वक घेत आहे. त्यांची अवस्था सहनही होत नाही आणि सांगता येत नाही अशी झालेली आहे. ते या मानसिक भावनेत गेले असल्यामुळे कदाचित त्यांना आपल्या भावना दुर्दैवाने प्रकर्षाने मांडता येत नसतील. आज माननीय सदस्य श्री.महादेवराव जानकर काय बोलणार आहेत याकडे महाराष्ट्रातील तमाम धनगर समाजाचे लक्ष लागून राहिलेले आहे. माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी मोठ्या अंत:करणारने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर सूचना न मांडण्याचे माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.गिरीश बापट यांना कबूल केले असले तरी श्री.जानकर साहेब काय बोलणार आहेत याकडे आमचे लक्ष लागलेले आहे. आज माननीय सदस्य श्री.जानकर हे सत्ताधारी बाकावर बसलेले आहेत. सत्ताधारीच्या पक्षाच्या बाजूने आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव येतो त्यामुळे त्यांची निसंदिग्ध भूमिका देखील सदनाला कळली पाहिजे. श्री.जानकर साहेब म्हणाले होते की, मला मंत्रीपद मिळाले नाही तरी चालेल, आमदारकी देखील सोडण्याची माझी तयारी आहे. प्रश्न ज्यावेळी उपस्थित झाला त्यावेळी ते सराफा व्यापाऱ्यांनी जो मोर्चा काढला होता त्याला देखील उपस्थित होते. तो मोर्चा कशासाठी होता ? मी केंद्र सरकारच्या बाबतीत टीकाटिपणी करणार नाही. अशा प्रकारचे आंदोलन आघाडी सरकारच्या काळात देखील झाले होते. त्यावेळी श्री.शरद पवार साहेबांनी मध्यस्थी केली होती आणि त्यांना न्याय मिळवून दिला होता. आज राज्यातील सराफा व्यापार 10 ते 15 दिवस पूर्णपणे बंद आहे. त्यामुळे राज्य व केंद्र सरकारचे हजारो कोटी रूपयांचे उत्पन्न बुडाले आहे. या नुकसानीमुळे या व्यवसायातील जो कुशल कारागीर आहे त्याच्या हाताचे काम देखील पूर्णपणाने बंद झालेले आहे. या सर्व गोष्टी या निमित्ताने महत्त्वाच्या ठरू शकतात. राज्य सरकारच्यावतीने माननीय मुख्यमंत्री महोदयांनी यात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता होती. कारण या राज्यात सर्वात जास्त व्हॅटच्या माध्यमातून कर मिळतो तो सराफा व्यवसायातू मिळतो. त्यामुळे या संदर्भातील गांभीर्य देखील हे शासन ओळखू शकलेले नाही. ...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे...

सभापती महोदय, अभिभाषणामध्ये अवर्षणाचा उल्लेख आहे. आम्ही सतत तीन वर्ष बोलत आलो आहोत की, राज्यात दुष्काळ आहे. आपण कितीही राणा भीमदेवीच्या थाटात सांगत असाल की, आम्ही शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर मदत केली आहे, सावकारी माफ करण्याच्या दृष्टीने निर्णय घेतला आहे. पण सावकारी कर्ज माफ करीत असताना त्याचा कोणाला फायदा झाला याचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी दुष्काळाच्या चर्चेमध्ये भाग घेत असताना सभागृहामध्ये विश्लेषण केले आहे. शेतकऱ्यांची कर्ज माफी करणार नाही कारण बँकांचे धन वाढविले जाते असे आपण म्हणाला. त्या दिवशी देखील सन्माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांना येथे उत्तर द्यावे लागले आहे. कर्जाचे पुनर्गठन करण्यासंबंधी त्यांनी घोषणा केली आहे. यात सरकारचा फोलपणा किती आहे हे मी सांगणार आहे. त्या दिवशी देखील सांगितले होते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील म्हणाले ती वस्तुस्थिती खरी आहे. मी या निमित्ताने सरकारला आवाहन देऊ इच्छितो की, शेतकरी कर्जाचे पुनर्गठन सरकार करणार होते, शेतकऱ्याला शेती कर्ज दिले पाहिजे. दिले गेले नाही तर आम्ही त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करू, असे आपण सभागृहामध्ये सांगितले. पण रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरनी एक फतवा काढला आणि त्यांनी सांगितले की, अशा प्रकारचे गुन्हे आपणाला अधिकाऱ्यांविरुद्ध दाखल करता येणार नाही. सभागृहामध्ये जाहीर केलेली घोषणा आपल्याला मागे घ्यावी लागली आहे.

श्री.अंतुले आणि माझ्यात अलीकडच्या काळात काही मतभेद झाले असतील. पण श्री.अंतुले साहेबांनी राज्यात कर्जमाफी करण्यासंबंधीचा निर्णय जाहीर केला तेव्हा त्यास रिझर्व्ह बँकेने विरोधी केला. त्यावेळी श्री.अंतुले साहेबांनी सांगितले की, राज्याच्या तिजोरीसंबंधात निर्णय घेण्याचा अधिकार माझा आहे. रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरला नाही. असे ठणकावून सांगणार मुख्यमंत्री श्री.अंतुलेच्या रूपाने महाराष्ट्राने देखील निश्चितपणे पाहिलेला आहे. कालच माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सांगितले की कर्जाचे पुनर्गठन होईल. आज अनेक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका नाबार्डने सहकार्य न केल्यामुळे, सरकारने कर्जाची थकहमी न दिल्यामुळे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

डबघाईस आलेल्या आहेत. कारणे काहीही असतील. जे दोषी असतील त्यांच्यावर आपण कारवाई करावी. त्यासंबंधी कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. शेतकऱ्यांसाठी सहकारी बँका निर्माण झाल्या. दिवंगत श्री.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राची निर्मिती होत असतानाच कृषि प्रधान औद्योगिक रचनेचा पाया घातला. श्री.वसंतराव नाईक, श्री.वसंतदादा पाटील यांनी आणि श्री.शरद पवार यांच्या द्रष्ट्या नेतृत्त्वाने या सर्व गोष्टींना खूप मोठ्या प्रमाणावर चालना दिली. गेल्या 50-60 वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये कृषि क्षेत्रात केलेली नेत्रदीपक प्रगती ही महाराष्ट्राच्या संपत्तीमध्ये वाढ ठरणारी ठरली हे कोणालाही नाकारता येणार नाही. राजकीय मतभेद असू शकतील. तत्त्वासंबंधी आपली वेगळी भूमिका असू शकते. पण या राज्यातील जो बळीराजा आहे, कष्टकरी आहे त्याने त्याच्याकडे उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीनुसार राज्याच्या साधनसंपत्तीमध्ये भर टाकण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. तो ज्यावेळी संकटात सापडतो त्यावेळी त्याला मदत करण्याची कोणत्याही प्रकारची भूमिका आपण घेतलेली नाही.

सभापती महोदय, मी माननीय सदस्य श्री.महोदव जानकर यांना विचारू इच्छितो की, येथे एलबीटीसंबंधात घोषणा झाली. त्यावेळी अभिवचन देण्यात आले होते. त्यावेळी आपण आठ हजार कोटी रुपये माफ केले. एलबीटी माफ करावा किंवा नाही याबद्दल आमची कधीही भूमिका नव्हती. थेट पणाने तरतूद करण्यात येईल असे सांगण्यात आले होते पण त्याचा कुठेही मागोवा नाही. आपण एलबीटी माफ करून किती महानगरपालिकांना आपण पर्यायी रक्कम उपलब्ध करून दिली आहे हे देखील सांगणे आवश्यक आहे. अ,ब,क,दर्जाच्या ज्या छोटा महानगरपालिका आहेत त्यांचे एलबीटीचे उत्पन्न पूर्णपणे बंद झालेले आहे. राज्य सरकारने त्यांना प्रतिपूर्ती अनुदान देणे आवश्यक होते. पण एकाही पैशाचे अनुदान राज्य सरकारतर्फे देण्यात आलेले नाही. त्यामुळे या सर्व महानगरपालिका पूर्णपणे आर्थिक संकटात आलेल्या आहेत. एलब्ीटीसाठी आपण आठ हजार कोटी रुपयांची तरतूद करू शकतो. मग महाराष्ट्रातील अडचणीत सापडलेल्या बळीराजाला बाहेर

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

काढण्यासाठी 6 ते 7 हजार कोटी रूपये लागतात त्याबाबतीत आपली अनास्था का आहे ? एकच गोष्ट आपण सातत्याने मांडत आला की, बँकांची भर त्या निमित्ताने होते. जिल्हा मध्यवर्ती बँका असतील, राष्ट्रीयकृत बँका असतील, त्यांच्या कर्ज खात्यामध्ये हे पैसे जमा होतात. आपण येथे वारंवार सांगून महाराष्ट्रातील जनतेची आणि शेतकऱ्यांची पूर्णपणे फसवणूक करीत आहात. एवढेच नव्हे तर आपण दिशाभूल करीत आहात. शेतकऱ्यांची पीक कर्ज माफी केली. कर्ज माफीच्या माध्यमातून दिले जाणारे कर्ज पीककर्जामध्ये जमा होते. त्याचा 7/12 कोरा होतो. पुढच्या वर्षी त्याला कर्ज मिळू शकते. राष्ट्रीय कृत बँकांवर शासनाचा वचक राहूच शकत नाही. मी माननीय गृह निर्माण मंत्री श्री.प्रकाश महेता यांना एक उदाहरण देतो. मी वित्त मंत्री असताना सर्वसाधारण माणसांकरिता एक लाखा पर्यंतचे कर्ज घेण्यासाठी एक योजना आणली होती. त्याचे व्याज सरकार भरणार असे जाहीर केले होते. आज त्या गरीब माणसाने त्याचे एक लाख रूपयाचे कर्ज फेडले. पण आताचे सरकार त्याचे व्याज भरू शकले नाही. आता त्याच्या घरावर बोजा चढलेला आहे. मी या निमित्ताने आपल्याला असंख्य उदाहरणे देईन. काही बाबतीत या सरकारने जरूर योजना बदलाव्यात. यंदाचे आपण अभिभाषण पाहिले तर जवळपास 70 टक्के पाने ही नवीन योजना जाहीर करण्यातच गेलेली आहेत. भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांची नावे देण्यासंबंधी आम्हाला कुठल्याही प्रकारची हरकत असण्याचे कारण नाही. जुन्या योजनांचे नाव बदलून आम्ही नवीन योजना करीत आहोत असा आभास निर्माण करण्यासाठी, देखावा निर्माण करण्यासाठी पूर्णपणाचे कौशल्य आपण पणाला लावले आहे. खोटे बोल पण रेटून बोल. एखादी योजना तयार असेल आणि तिला गोंडस नाव द्यायचे असेल तर त्या योजनेच्या स्वरूपामध्ये फक्त थोडासा बदल केला जातो. आमच्या सरकारने मनोधैर्य योजना आणली. एखादी छोट्या भगिनीवर अन्याय किंवा अत्याचार झाला तर तिचे मनोधैय वाढावे म्हणून मदत करण्याची आम्ही भूमिका घेतली होती. या वर्षीचा नियतव्यय उपलब्ध झाला नाही म्हणून या योजने अंतर्गत एकाही अभागी भगिनीला एक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

रूपयाची मदत या सरकारच्या माध्यमातून झालेली नाही. त्याबद्दलचा खेद आणि तीव्र संताप मी व्यक्त करीत आहे. भगिनींचे संरक्षण करण्यासाठी आपण पूर्णपणे अपयशी ठरला आहात. गेल्या वर्षभरातील राज्यातील वाढलेल्या घटना पूर्णपणाने दर्शवित आहेत की, हे शासन आता हतबल झालेले आहे. कन्व्हीक्शन रेट कमी झाला म्हणून त्यावर मोठ्या प्रमाणावर भाषणे करण्यात येतात. पण आज भगिनींवर अत्याचार करणाऱ्या घटनेत वाढ होत आहे. 5-6 वर्षाच्या बालिकांवर लैंगिक अत्याचार, बलात्कार केले जात आहेत, त्यावेळी कायदा व सुव्यवस्थेसंबंधी नेमके काय चालले आहे असा प्रश्न निर्माण होतो. मनोधैर्यसारखी चांगली योजना लोकशाही आघाडी सरकारच्या माध्यमातून सुरूकेली होती. त्या योजनेला आपल्याला दुसरे नाव द्यायचे असेल तर ते जरूर द्यावे. त्याला आमची हरकत नाही. पण माझ्या त्या छोट्या अभागी भगिनींना त्या योजनेपासून वंचित ठेवण्याचे पाप आपण करूनका एवढीच मला या निमित्ताने विनंती करावयाची आहे.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

संत गाडगे महाराज यांनी महाराष्ट्राला स्वच्छतेचा मंत्र दिला. श्री.आर.आर.पाटील मंत्री असताना त्यांनी संत गाडगे महाराज यांच्या नावाने "संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान" अशी योजना राबविली. आपणास हे नाव बदलावेसे का वाटले ? आपणास त्या नावाची ॲलर्जी आहे काय ? संत गाडगे महाराज यांच्याबद्दल आपल्या रोमारोमात दुस्वास भरलेला आहे की, त्यांच्या नावाने सुरु असलेली योजना बंद करण्याचे दुष्कृत असा शब्दप्रयोग मी करणार नाही, पण आपण ती योजना बंद करण्याची भूमिका घेतली. आपण आता "स्वच्छता अभियान" असे नाव दिलेले आहे. परंतु पूर्वीचे "संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान" हे नाव काढलेले आहे त्याबद्दल महाराष्ट्रातील जनता आपणास कदापि माफ करणार नाही, असा इशारा मी या निमित्ताने देऊ इच्छितो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये खूप परिच्छेद आहेत. मी फक्त दुसऱ्या परिच्छेदावर बोलत आहे. आपण सरकारमध्ये आहात आपणास नाव देण्याचा जरूर अधिकार आहे, त्याबद्दल आमची हरकत नाही. परंतु त्यासाठी जुन्या योजना बंद करायच्या आणि त्याच योजना नवीन नावाने सुरु करायच्या हे योग्य नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये फक्त नवीन योजना आणि त्याबद्दलच्या घोषणा दिलेल्या आहेत. परंतु गेल्या वर्षभरात सरकारने नेमके काय केले त्याचे सूतोवाच केलेले नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सरकारने मागील वर्षभरात केलेल्या कामगिरीचा आढावा एका परिच्छेदामध्ये असेल अशी आमची अपेक्षा होती.

सभापती महोदय, मधल्या कालावधीत भारत सरकारने भारत कार्यक्रम निर्माण अंतर्गत सुरु असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या योजना बंद केल्या. महाराष्ट्र सरकारने देखील तो कार्यक्रम बंद केला. या सरकारने मागील वर्षभरात एकही नवीन पाण्याची योजना मंजूर केली नाही. या सरकारने नवीन पाण्याच्या योजना मंजूर करु नयेत अशाप्रकारचे आदेश काढले त्याची प्रत माझ्याकडे आहे. ती प्रत पटलावर ठेवण्यास मी तयार आहे. मी जे सांगत आहे ते चुकीचे असेल तर मी सरकारची माफी मागण्यास तयार आहे. राज्यातील कोट्यवधी लोक पिण्याच्या पाण्यापासून वंचित असताना एकही नवीन पिण्याच्या पाण्याच्या योजना करण्यात येऊ नयेत, असे आपण



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

सांगितले. माननीय मुख्यमंत्री पाण्याची कोणती तरी योजना आणणार आहेत. त्याची तरतूद पुढच्या वर्षी होईल. परंतु वर्षभर रखडलेल्या पिण्याच्या पाण्याच्या योजनांचे काय ? काही योजना 80 ते 90 टक्के पूर्ण झालेल्या आहेत., त्या सर्व योजनांचा निधी थांबविलेला आहे.

सभापती महोदय, या सरकारने काही ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायतीमध्ये करण्याचा निर्णय घेतला. परंतु मी आपणास सांगू इच्छितो की, हा निर्णय मागच्या सरकारचा होता. फक्त आपल्या कालावधीत त्याची अंमलबजावणी झाली. या कार्यक्रमांतर्गत ग्रामपंचायतीच्या काही योजना मंजूर झाल्या होत्या. परंतु ती ग्रामपंचायत नगरपंचायत झाली या केवळ तांत्रिक कारणामुळे तेथील योजना बंद करण्याचा नवीन फतवा सरकारने काढला. माननीय मंत्री श्री.प्रकाश महेता आपण जिल्हा नियोजन मंडळामार्फत जी तरतूद केली ती सांगत आहात. मी आपणास सांगत आहे की, ज्या ग्रामपंचायतींचे रुपांतर नगरपंचायतीमध्ये झाले त्या ग्रामपंचायतींच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना मंजूर होत्या त्या योजना तशाच्या तशा ठेवा असा फतवा सरकारने काढला. आपण हे नाकारत आहात काय ? मी आपणास नाव सांगू का ? माझ्या मतदारसंघात नवीन म्हशाळ नगरपंचायत अस्तित्वात आली. नगरपंचायत अस्तित्वात येण्यापूर्वी माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी त्या ग्रामपंचायतीला विशेष बाब म्हणून पिण्याच्या पाण्याची योजना मंजूर होती. परंतु आता ती ग्रामपंचायत नगरपंचायत झाली म्हणून त्या योजनेचे काम आहे त्या स्थितीमध्ये ताबडतोब थांबविण्यात यावे असा फतवा काढण्यात आला. नवीन काम न करण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.गिरीश बापट साहेब, आपण तेथील माणसे मेल्यावर योजना देणार आहात काय ? आपल्या संवेदना कुठे गेल्या ? आपण विरोधी बाकावर बसताना धाडसाने बोलत होता. आज भाऊसाहेब गप्प का आहेत ? ते ज्येष्ठ असूनही त्यांना मंत्री पद मिळाले नाही म्हणून ते गप्प नाहीत तर हे सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत नाही त्याबद्दल त्यांच्या मनात तीव्र संताप खदखदत आहे, हे मला या निमित्ताने सांगायचे आहे. आपणास मी खरी वस्तुस्थिती सांगत आहे. मी या ठिकाणी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत. आज आपण राज्यातील पिण्याच्या पाण्याच्या योजना पूर्णपणे बंद केल्या आहेत. या ठिकाणी काल माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी स्वतःची पाठ थोपटून घेतली. त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेते

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

श्री.धनंजय मुंडे आणि सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी सांगितले की, यावर्षी शेतीचे पंप चालले नाहीत तर आपण 33 टक्के वीजेची देयके कशी माफ केली ? मी अगोदर सांगितल्याप्रमाणे खोटं बोल,पण रेटून बोल. कामकाज करायचे असेल तर ते रेटून करायचे. या सरकारला जनतेच्या कामाबाबत कोणत्याही प्रकारच्या संवदेना दाखवावयाच्या नाहीत.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांचे दोन प्रेस्टीजीएस कार्यक्रम आहेत. पहिला "मेक इन इंडिया" आणि दुसरा "जलयुक्त शिवार योजना" महाराष्ट्रामध्ये "मेक इन इंडियाचा" महत्वाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात काय घडले त्याबद्दल मी काही बोलत नाही. मेक इन इंडिया कार्यक्रमाद्वारे राज्यात 8 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आली असे सांगण्यात आले. त्या संदर्भात सामंजस्य करार झाले. यामुळे काही लाख तरुणांना लगेच रोजगाराची हमी मिळणार आहे असे सांगण्यात आले. आपले सरकार येऊन सव्वावर्ष झाले. याकाळात राज्यात किती नवीन उद्योग आले याची माहिती सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. उद्योग विभागामध्ये काय काय उद्योग सुरु आहेत ? आपणास त्या उद्योगाच्या बाबतीत सुद्धा बोलावे लागेल. मी काल दिल्ली-मुंबई कॉरीडोर संदर्भात लक्षवेधी सूचना दिली होती. त्यावेळी विचारण्यात आलेल्या प्रश्नांना मंत्री महोदयांना उत्तरे देता आली नाहीत म्हणून ती लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात आली. त्या संदर्भातील उत्तरदायीत्व घ्यावेच लागणार आहे. ज्यांनी उद्योगधंदे सुरु केले नाहीत त्यांना देण्यात आलेले परवाने रद्द करण्याची भूमिका घेण्यात आली. ज्यांनी उद्योगासाठी जमिनी मागितल्या त्यांना किती जमिनी मिळाल्या ? "मैत्री" नावाची एक खिडकी योजना सुरु करण्यात आली. आपण सांगितले की, एका खिडकीवर सर्व परवाने मिळणार आहेत. उद्योजकांनी किती जमिनी मागितल्या, त्या त्यांना किती कालावधीमध्ये देण्यात आल्या हे महाराष्ट्रातील जनतेला हेही कळले पाहिजे. हा महत्वाचा विषय आहे. त्यामध्ये सुद्धा काही ना काही घडले आणि मग त्या संदर्भात भूमिका घेण्यात आली हे सुद्धा या ठिकाणी स्पष्ट होणे आवश्यक आहे. "मैत्री" नावाची नवीन घोषणा करुन आम्ही काहीतरी नवीन करीत आहोत अशाप्रकारचा भास निर्माण करण्यात आला. 8 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली असे सांगण्यात आले. आम्ही सत्तेवर होतो तेव्हा आपणाकडून आम्ही शेतीचे पाणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

उद्योगाला पळविले असा आरोप करण्यात आला होता. परंतु आता राज्यात 8 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणाऱ्या उद्योगांना पाणी कोठून देणार ? सन 2019 पर्यंत 8 लाख कोटी रुपयांचे उद्योग सुरु होणार, त्यामुळे आता उपलब्ध असलेले पाणी उद्योगांना द्यावे लागणार आहे. आम्ही सत्तेवर असताना आपण आरोप करीत आलात की, शेतीचे पाणी उद्योगाला दिले, शेतकऱ्यांना पूर्णपणे देशोधडीला लावले. माननीय मुख्यमंत्र्यांची सर्वांत प्रेस्टीजीअस योजना आहे त्याबद्दल त्यांना आमचे सहकार्य आहे. पण उद्योगासाठी लागणारे पाणी कोठून आणणार ? आपण तहान लागल्यानंतर विहीर खोदणार आहात काय ? आधी कारखाने येणार त्यानंतर पाण्याची व्यवस्था होणार आहे काय ? राज्यात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली आहे. असे असताना सरकारच्या माध्यमातून चारा छावण्या बंद करण्याची भूमिका घेण्यात आली. अधिकाऱ्यांवर सर्वाधिक अवलंबून असलेले पहिले सरकार मी पाहत आहे. आम्ही देखील सरकारमध्ये काम केलेले आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून आलेला अहवाल खरा आहे असे सांगण्यात आले. त्याबद्दल आम्ही भूमिका मांडलेली आहे. मराठवाड्यातील भागात सर्व मंत्रीमहोदयांनी आणि पालक मंत्र्यांनी दौरे करणे आवश्यक आहे. ते दौर झाले असते तर उस्मानाबादमध्ये चारा छावण्यांची गरज नाही असे लिहिण्याचे धाडस जिल्हाधिकाऱ्यांना झाले नसते. संसदीय लोकशाहीमध्ये आपण सरकार आहोत. सरकारची व्याख्या काय आहे ? लोकांनी लोकांसाठी लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी ते सरकार असते.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

परंतु तुमचा आणि आमचा शेवटचा हक्क आहे. माननीय पालकमंत्री जे सांगतील त्याचीच अंमलबजावणी केली पाहिजे. दिवसेंदिवस चारा छावण्यांची संख्या वाढविण्याची गरज आहे अशी भावना शेतकरी व्यक्त करीत असताना, चारा छावण्या बंद करा असा फतवा काढला जातो. या ठिकाणी सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब उपस्थित आहेत आणि बाकी सर्व अनुपस्थित आहेत. मी विचारु इच्छितो की, तुम्ही सर्वजण या विषयी गप्प का आहात, उद्योग विभागाने काय काय उद्योग केले आहेत, सभापती महोदय, वाघाची शेळी का झाली हेच मला समजत नाही.

सभापती महोदय, सर्वांनी दुष्काळाच्या बाबतीत राज्याचा दौरा केला. काहींनी राणा भिमदेवी थाटात भाषणे केली आणि सरकारच्या विरोधात मोर्चे काढले. महोदय, सरकारमधील एक माननीय राज्यमंत्री काय म्हणाले ? महोदय, ते म्हणाले की, कोण्या वेड्याने चारा छावण्या बंद करण्याचा निर्णय घेतला. होय. राज्य सरकारमधील एक राज्यमंत्री महोदय दौऱ्यामध्ये जाहीररित्या असे बोलले आहेत. मी तर सभ्यतेचा शब्द वापरला. परंतु त्यांनी यापेक्षा खालच्या दर्जाचा शब्द वापरला होता. सभापती महोदय, या विषयाच्या बाबतीत आदेश काढणारे महसूल मंत्री होते. त्यांची त्यावर सही असणार आणि त्या निर्णयाला माननीय मुख्यमंत्र्यांची अनुमती असणार. माननीय राज्यमंत्री कोणाला वेडे म्हणाले हे राज्यातील सर्व सूज्ञ जनतेला कळलेले आहे. वास्तविक पाहता अशा वक्तव्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी धाडस दाखवून त्या राज्यमंत्र्याला हाकलून लावण्याची धमक दाखविण्याची आवश्यकता होती. तुम्हाला सरकार चालवायचे असेल तर चालवा, यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. परंतु सरकारमधीलच एका राज्यमंत्र्यांने असे वक्तव्य करणे योग्य नाही. एक राज्यमंत्री सरकारने घेतलेल्या निर्णयाची अशा शब्दात जाहीररित्या निर्भत्सना करतो यापेक्षा दुसरी शोकांतिका नाही. महोदय, वेडा हा शब्दप्रयोग खूप सुसंस्कृत आहे. परंतु यापेक्षा अश्लील शेरेबाजी माननीय राज्यमंत्र्यांनी केली होती. ती शेरेबाजी इतकी अश्लील होती की, वाहिन्यांनी ती दाखविलीच नाही. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब हे मान हलवत आहेत. माननीय राज्यमंत्र्यांच्या अश्लील शेरेबाबत ते मान हलवतात, मी जे वक्तव्य करतो त्याला मान हलवतात की या सरकारमध्ये जे चालले आहे त्याला त्यांची अनुमती आहे हे समजत नाही. सरकारमध्ये ज्यावेळी मोठ्या प्रमाणावर विसंवाद असतो त्यावेळी असे घडते. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब तुम्हाला काय बोलायचे आहे ते बोला, तुम्हाला काय करायचे आहे ते करा.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु तुम्ही अशाप्रकारे बोलून आमचा आवाज दाबू शकत नाही, हे मी या चर्चेच्या निमित्ताने सांगतो. हे बोलून तुम्ही महाराष्ट्रातील जनतेवर अन्याय, अत्याचार करणार काय ?

सभापती महोदय, राज्य सरकारला अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबतचा निर्णय घेता येऊ शकत नाही. पूर्वीच्या काळात सुध्दा शेतकरी अपघात विमा योजना होती, या संदर्भातील जी.आर. आम्ही दाखविला. स्वर्गीय गोपीनाथजी मुंडे यांच्या नावाने सुरु केलेल्या योजनेस हरकत घेण्याचे कोणाला काही कारण नाही. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे नाव योजनेला देण्याच्या बाबतीत आमची हरकत नाही. कितीही योजनांना बाळासाहेब ठाकरे यांचे नाव दिले तरी त्यांनी केलेले काम हे कधीच कमी होऊ शकत नाही. परंतु राज्यपाल महोदय हे पद घटनात्मक आहे. त्यांच्या भाषणामध्ये 'हिंदुह्रदयसम्राट शिवसेनाप्रमुख' अशा प्रकारे योजनेचे नाव नमूद केले आहे. महोदय, घटनेच्या प्रिएंबलचे काय ? घटनेच्या प्रिएंबलमध्ये नमूद केले आहे की, धर्मनिरपेक्ष विचार हा घटनेचा पाया आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी परवा ते येथे वाचून दाखविले. सभापती महोदय, राज्य सरकारने कितीही योजना केल्या आणि कितीही योजनांना बाळासाहेब ठाकरे यांचे नाव दिले तरी त्यांचे महाराष्ट्रावरील ऋण फेडले जाऊ शकत नाही एवढे त्यांचे व्यक्तिमत्त्व मोठे होते. स्वर्गीय इंदिरा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, राजीव गांधी, महात्मा गांधी यांच्या नावाने अनेक योजना सुरु केल्या होत्या. परंतु काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष किंवा समाजाच्या पुरस्कर्त्यांचे नाव महाराष्ट्रात आणि देशात कोणत्याही योजनेला दिले गेले नाही. त्यामुळे मी जो प्रश्न उपस्थित केला तो अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण हे माननीय राज्यपालांचे अभिभाषण आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी जाहिराती लावल्या. त्या माध्यमातून एस.टी. महामंडळाला किती पैसे मिळाले आणि त्याचे काय झाले हे आज ना उद्या, कधी तरी सभागृहासमोर येईल. त्यांनी त्या जाहिरातीबाबत शिवसेना पक्षाचा नेता म्हणून सांगितले. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही शिवसेना पक्षाचे नेते नाही तर मंत्री आहात. त्यामुळे आपल्याला तशा प्रकारची जाहिरात देता येणार नाही. कारण आपण घटनेला अधीन राहून शपथ घेतलेली आहे. त्यांनी शिवसेनेचे नेते आणि शिवसेनाप्रमुख व्हावे यासाठी आमच्या त्यांना

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

शुभेच्छा आहेत. परंतु सरकार म्हणून जाहिरात देत असताना तशा प्रकारचा उल्लेख करता येईल की नाही हे त्यांनी बघण्याची आश्यकता होती. त्यांना अशा प्रकारची जाहिरात करता येणार नाही असा माझा दावा आहे. आपण सरकारमध्ये याचप्रकारे काम करणार असाल तर लोकाभिमुख योजनेचे नेमके काय केले जाणार, हा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होतो.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या दृष्टिकोनातून राज्य सरकारकडून कोणतीही भूमिका घेतली जात नाही. मेक इन इंडियाच्या नावावाखाली भूमिका घेतली गेली. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे वाघासारख्या डरकाळ्या फोडणारी माणसे शेळ्यांसारखी का झाली हे समजत नाही. उद्योग विभागाच्या माध्यमातून असे काय उद्योग निर्माण झाले, कोणी काय उद्योग केले ? सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस हे जॅकेट घालतात. जॅकेटला चार खिसे असतात. कोणाला कोणत्या खिशात ठेवले हे सुध्दा कळत नाही. सभागृहात नावे घेतली तरी सांगितले जाते की, आम्हाला बोलायचे नाही, राज्यात दुष्काळच नाही. हे आम्ही त्या दिवशी बघितले. सन्माननीय सदस्य श्री.महादेवराव जानकर यांच्याबद्दल आम्हाला आदर आहे. फक्त ते वाट चुकले एवढेच मी त्यांना सांगितले आणि ते पुन्हा योग्य त्या वाटेवर येतील, याबाबत शंका नाही.. हा भाग अलहिदा राहील. राजकीय विचार वेगवेगळ्या ठिकाणी राहू शकेल.

सभापती महोदय, आगामी वर्षभरात राज्य सरकार काय करणार आहे हे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नमूद केलेले असते. माननीय श्री.बापट साहेब, आमचे सरकार असताना आम्ही पुरवणी मागण्या मांडल्या तर त्याला आपल्याकडून कडाडून विरोध केला जायचा. आताचे माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस हे त्यास विरोध करीत आले. एवढेच नव्हे तर तत्कालीन माननीय विरोधी पक्ष नेते श्री.एकनाथराव खडसे हे पुरवणी मागण्यांच्या बाबतीत टीका टिप्पणी करीत होते. परंतु नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर आपण गेल्या वर्षी पहिला अर्थसंकल्प मांडला आणि लगेच पावसाळी अधिवेशनात 20 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. वास्तविक पाहता पहिल्या वर्षी तुटीचा अर्थसंकल्प मांडला होता. तद्नंतर 20-25 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. तद्नंतर पुन्हा हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागण्या मांडल्या. महोदय, राज्य सरकारची आर्थिक उलाढाल वाढली असती तर या राज्य सरकारवर वारंवार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पुरवणी मागण्या मांडण्याची वेळ आली नसती. मी या सरकारला सांगू इच्छितो की, आपण

..4..



श्री.सुनील तटकरे....

आमच्या सरकारच्या काळात गेल्या 15 वर्षात व्हॅटच्या माध्यमातून मिळालेले उत्पन्न पहावे. आमचे सरकार असताना दरवर्षी व्हॅटच्या माध्यमातून राज्य सरकारचे उत्पन्न प्रचंड वाढत गेले. परंतु गेल्या दोन वर्षापासून व्हॅटच्या उत्पन्नामध्ये भरच पडत नाही. याचा अर्थ राज्यातील व्यापार थंडावला आहे, राज्यातील उद्योग थंडावले आहेत, इतकेच नव्हे तर राज्यात पायाभूत सुविधा सुरु आहेत की नाही, असे प्रश्न निर्माण झाले आहेत. आमच्या काळात दरवर्षी 4-5 हजार कोटी रुपयांची भर पडून राज्याच्या विकास योजनांसाठी निधी उपलब्ध होत होता. परंतु हे सरकार सत्तेवर आल्यापासून राज्याचे उत्पन्न कमी झाले आहे.

सभापती महोदय, हे सरकार सत्तेवर येण्यापूर्वी या सरकारने डांगोरा पिटला होता की, अच्छे दिन आयेंगे. परंतु अजूनपर्यंत काहीही साध्य झालेले नाही. मी आपल्याला सांगतो की, राज्य सरकारच्या कारभाराविषयी आत्मनिरीक्षण आणि आत्मपरीक्षण करण्याची वेळ कधी ना कधी करण्याची गरज पडतच असते. सभापती महोदय, गेल्या 60 वर्षात महाराष्ट्र सरकारने काय प्रगती केली हे राज्यातील जनतेने अनुभवलेले आहे. त्यामुळे यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. गेल्या दीड-दोन वर्षामध्ये राज्य सरकारचा जो कारभार सुरु आहे त्यातून निर्माण झालेली अभूतपूर्व परिस्थिती आपल्याला माहीत आहे. हे खरे आहे की, नैसर्गिक आपत्ती ही कोणाला सांगून येत नाही. निसर्गाचा कोप होऊ शकतो, यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. मुळात राज्य सरकारने नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याची प्रामाणिक भूमिका स्वीकारावयास पाहिजे होती.

सभापती महोदय, या राज्य सरकारने सावकारांचे कर्ज माफ केले. माननीय श्री.पाडुरंग फुंडकर साहेबांच्या बुलडाणा जिल्ह्यात सावकारांचा प्रश्न आहे. माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगावे की, खरोखरच सावकारांना, शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज देता येते काय ? महोदय, जे परवाने देण्यात आलेले आहेत त्यामध्ये स्पष्टपणे नमूद आहे की, खाजगी सावकारांना शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज देता येत नाही. पण या राज्य सरकारने खाजगी सावकारांनी शेतकऱ्यांना शेतीसाठी दिलेले 250 कोटी रुपये कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

कोणाच्या हिताचा होता हा खरा प्रश्न आहे. मध्यवर्ती बँकांनी दिलेले कर्ज क्रमप्राप्त होऊन त्या

..5..



श्री.सुनील तटकरे....

त्या विकास सोसायट्यांचे गट सचिव भरून घेतात आणि त्यातून त्यांना मध्यवर्ती बँक कर्ज देत असते. त्यामुळे मध्यवर्ती बँकेत कर्ज जमा होत असते. तुम्ही कर्जमाफी दिली तर ती बँकेच्या संचालकांच्या खिशात जात नाही.

पी....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

पण आपल्याला ती द्यायचीच नाही म्हणून मग आपण म्हणतो की, या बँका यांच्या ताब्यात आहेत. कर्जमुक्ती झाली, कर्जमाफी झाली तर त्या बँकांना काही ना काही तरी त्यातून मिळेल असे जे काही आपण पोकळपणाने आभास निर्माण करणारी वक्तव्ये करीत आहात ती अत्यंत चुकीची आणि दुर्दैवी आहते. महाराष्ट्राच्या इतिहासात अशा पध्दतीची घटना कधी घडलेली नव्हती. गेल्या वर्षीच्या आदल्या वर्षी, ज्यावेळी सरकार आले, त्यावेळी गारपीट आली. गेल्या वर्षी खरीपाचे पीक पूर्णपणे गेले. गेल्या वर्षीचे रब्बीचे पीकही पूर्णपणे उद्‌ध्वस्त झाले. गेल्या 15-20 दिवसांत, महिन्याभरात गारपीट झाली, त्यामध्ये वाचलेल्या थोड्याफार फळबागा होत्या, त्या सुध्दा पूर्णपणे उद्‌ध्वस्त झाल्या, त्यांना मदत करण्याच्या दृष्टीकोनातून कोणतीही पावले खंबीरपणे उचलली गेली नाहीत. तुम्ही एलबीटीचा निर्णय 1 वर्ष उशिरा घेतला असता आणि महाराष्ट्रातील 1 कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांना मदत करण्याची भूमिका घेतली असती तर काय बिघडले असते ? माननीय मंत्री श्री. गिरीश बापट साहेब, आज आपण अन्न व नागरी पुरवठा खात्याचे मंत्री आहात. होय, त्या वेळी लोकशाही आघाडीच्या सरकारने, केंद्रामध्ये असलेल्या युपीए सरकारने अन्न सुरक्षा योजना आणली आणि त्या अंतर्गत दारिद्र्य्‌रेषेखालील कार्डधारकांना 2 रूपये, 3 रूपये किलो दराने धान्य देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. तुम्ही नस्ती शोधून काढा. आमचे सरकार असताना राज्यातील एपीएल कार्डधारकांना, 1 लाख रूपये उत्पन्न असलेल्यांना, 1 कोटी 60 लाख एपीएलच्या संबंध कार्डधारकांना सुध्दा महिन्याला 100-120 कोटी रूपयांचा नियतव्यय उपलब्ध करीत अन्न सुरक्षा योजनेचा फायदा देत होतो. आपण घोषणा करता की, दुष्काळी भागातील जिल्ह्यांसाठी आम्ही अन्न सुरक्षा योजना राबविण्याचा प्रयत्न केला. सभापती महोदय, ती योजना तर होतीच, तुम्ही नवीन काय केले ? 2 रूपये, 3 रूपये किलो दराने धान्य देण्याची योजना अन्न सुरक्षा योजनेंतर्गत होतीच, तुम्ही नवीन काय केले आणि काय त्याचे ढोल वाजवून घेत आहात ? त्यातून नवीन काही सरकारने केले आहे अशातील भाग नाही. एपीएल कार्डधारकांना तुम्ही सांगत आहात त्याचा उल्लेख आज मी या निमित्ताने करू इच्छित आहे. आधार कार्ड योजना राबविली जात होती, त्यावेळी तुम्ही विरोधी करीत होता आणि आता रेशनकार्डसाठी आधार कार्डची सक्ती करीत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

आहात. करा. कुटुंबाच्या प्रमुखाकडे आधार कार्ड असेल तर रेशन घेण्यासाठी, 25-30 किलो धान्य घेण्यासाठी तो पात्र ठरत होता. तुम्ही नवीन फतवा काढला. माननीय मंत्री श्री. गिरीश बापट साहेब, तुमच्याकडून ही अपेक्षा नव्हती. तुम्ही या खात्याचे मंत्री असताना अशा पध्दतीचे आदेश काढणे म्हणजे तुम्ही लोकांच्या तोंडातील घास काढून घेत आहात असा थेट आरोप मी या निमित्ताने आपल्यावर करू इच्छित आहे. तुम्ही सांगितले त्याप्रमाणे नियतव्यय कमी झाला. आज रेशन दुकानावर धान्य उपलब्ध होत नाही आणि त्याचे कारण तुम्ही काढलेला फतवा आहे. कुटुंबात असलेल्या सर्वांकडे आधार कार्ड असल्याशिवाय धान्य देणार नाही असे तुम्ही सांगितले आहे. आपण काही तरी मुदत द्यावी. आधार कार्डसुध्दा तुम्हीच द्यायची आहेत. आपण ती आपल्याच यंत्रणेच्या मार्फत उपलब्ध करून द्यायची आहेत. आता हे जे काही आहे, ते केवळ दिखाऊपणाचे आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण आहे म्हणून मी हातात घेऊन बोलत आहे. इतर एखाद्याचा फतवा असता तर त्याबद्दल आणखी मी काही वेगळे बोललो असतो. घटनात्मक प्रमुखांचा आदर, त्यांच्याबद्दल नितांत पध्दतीची भावना ठेवणे हे लोकशाहीमध्ये आम्हाला सुध्दा तितक्याच पध्दतीने शिकविले गेले आहे, त्यामुळे त्यांच्याबद्दल कोणताही अनादर या निमित्ताने मी व्यक्त करू इच्छित नाही. दुर्दैवाने या संदर्भात जे घडत आहे, ते अत्यंत अयोग्य आहे. राज्यभरात पिण्याच्या पाण्याच्या योजना तुम्ही बंद केल्या, चारा छावण्या बंद करण्याचा निर्णय दुर्दैवाने घेतला गेला.

सभापती महोदय, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क माफ केले जावे अशी भूमिका घेतली. आम्ही संपूर्ण महाराष्ट्रातील म्हणत नाही. आम्ही सांगत आहोत की, मराठवाड्यातील 8 जिल्ह्यांतील सर्व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ केले पाहिजे, परीक्षा शुल्क माफ केले पाहिजे. मात्र तो निर्णय अजून होत नाही, झालेला नाही, करू शकत नाही. तुम्हाला करण्याची इच्छाशक्तीच नाही. आज मराठवाड्यातील दुष्काळात होरपळलेल्या लोकांच्या संदर्भात राज्य सरकारच्या माध्यमातून सांगितले जात आहे की, ते स्थलांतर होत आहेत. तुम्ही जिल्हाधिकारी सांगतात ती आकडेवारी वाचून दाखविली. जिल्हाधिकाऱ्यांनी मला अहवाल दिल्याप्रमाणे मी सांगतो की, स्थलांतर दुष्काळामुळे झालेले नाही असे परवा दिवशी सभागृहात माननीय नेत्यांनी हे सांगितले.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

मग आता चर्चा उपस्थित केली ती कशाला घेतली असेही मघाशी या ठिकाणी माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब म्हणाले. ते ज्यावेळी हा मुद्दा उपस्थित करतील त्यावेळी माहिती देतील की, मराठवाड्यातील आजची नेमकी स्थिती काय आहे ? तुम्ही मुंबईमध्ये विचारा की, स्थलांतराचे प्रमाण वाढले आहे की नाही, आपण त्याची सुध्दा माहिती या निमित्ताने घेऊ शकता. ही वस्तुस्थिती खरी आहे. एखादा जिल्हाधिकारी सांगतो आणि त्यावर सभागृहाचे माननीय नेते निवेदन करतात की, स्थलांतर दुष्काळामुळे होत नाही. हे पाप कुठे फेडणार आहात ? स्थलांतरित होणाऱ्या माणसाला कोणत्याच गोष्टीची उपलब्धता होत नाही. होय. आम्ही तुमच्याकडे मागणी केली की, महाराष्ट्रातील जुनी रोजगार हमी योजना सुरू करावी आणि मागेल त्याच्या हाताला काम द्यावे. कै. वसंतराव नाईक साहेबांचे नाव अजरामर राहिले ते एवढ्यासाठी की, सन 1972 चा दुष्काळ आला, त्यावेळी त्यांनी रोजगार हमी याजनेची सुरू केली आणि त्यातून असंख्य कामे झाली, लाखो लोकांना त्यावेळी रोजगार मिळाला. त्यावेळी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होत होती, पण धान्य नव्हते. आज पिण्याचे पाणी नाही आणि धान्यही उपलब्ध होत होते ते या मायबाप सरकारने काढून घेतले आहे आणि त्यामुळे धान्यही नाही. आई जेऊ देईना आणि बाप भीक मागू देईना अशी स्थिती त्या ठिकाणच्या लोकांची दुर्दैवाने आणली आहे. पाणीही नाही, अन्नही नाही. त्यामुळे स्थलांतर होणारच, त्यापेक्षा दुसरी काय भूमिका होऊ शकते ? यापेक्षा दुसरी कोणती गोष्ट होऊ शकत नाही. हा प्रश्न गांभीर्याने घेण्यासाठी आहे. खरोखर तुमच्या मनात जर खरोखर गांभीर्य असेल तर या संदर्भातील उत्तर आले पाहिजे. केवळ उत्तर येऊन चालणार नाही तर या संदर्भात घोषणा केली पाहिजे की, महाराष्ट्रातील संबंध दुष्काळाच्या खाईत सापडलेल्या शेतकऱ्यांचे आम्ही कर्ज माफ करण्याचा निर्णय घेत आहोत. हे तुम्ही सांगाल तर तुमची नियत साफ होती असे त्या निमित्ताने म्हणता येईल. खोटेपणाने, दांभिकपणाने लोकांच्या प्रश्नांसाठी आव आणणे, मोठयाने बोलणे, ओरडून बोलणे म्हणजे आपण जे बोलतो ते सत्य आहे असे मानण्याइतपत हे होऊ शकत नाही. सभापतीम महोदय, असे म्हटले जाते की, एकदा फसविता येते. सदा सर्वकाळ लोकांना फसविण्याचे दिवस संपले आहेत. एकदा फसविले गेले. ते सर्व होऊन गेले. दुर्दैवाने या

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

दृष्टीकोनातून आज या सगळ्याची झळ तेथे पोहचत आहे. राजकीय विषय नाही. चांगले काम होईल तर त्याचा आदर होईलच. प्रत्यक्षपणे 8 लाख कोटी रूपयांची गुंतवणूक येईल त्या दिवशी याच सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांच्या अभिनंदनाचा ठराव मी आणेन असे मी या सभागृहात आज सांगतो. प्रत्यक्षात 8 लाख कोटी रूपयांची गुंतवणूक आली पाहिजे. पाण्याची व्यवस्थाच नाही. त्यामुळे ती येऊच शकत नाही. एमआयडीसीचे भूखंड देण्याबाबतीत स्पष्टता येऊ शकत नाही. शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे आदेश केले जातात. नियम 32 (1) च्या बाबतीत राज्य सरकारकडे प्रस्ताव येतो, 1-1 वर्ष दलाल फिरतात आणि ते प्रस्ताव या ठिकाणी थांबतात, एका शेतकऱ्याच्या नावाने ते प्रस्ताव येतात यासारखी कोणती दुर्दैवाची गोष्ट असू शकते ? दुसरी कोणतीही गोष्ट असू शकत नाही याचा सुध्दा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. मी एका मुद्यावर एवढे बाललो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे सर्व सन्माननीय सदस्य मोठ्या पध्दतीने बोलू शकतील. अत्यंत गांभीर्याने या गोष्टी घेण्याची आवश्यकता आहे. घोषणा करणे आणि प्रत्यक्षात कृतीत अंमलबजावणी करणे यामध्ये खूप फरक आहे. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री म्हणजे देशातील सर्वाधिक ताकद असलेले मुख्यमंत्री म्हणून गणले जातात. माननीय मुख्यमंत्र्यांची ही हतबलता म्हणावी का की, नोकरशाही आमचे ऐकत नाही असे त्यांच्याकडून म्हटले जाते. केवळ तेवढ्यापुरते बोलून ते थांबले नाहीत. आकडेवारी सांगताना जिल्हाधिकाऱ्यांकडून आकडेवारी आली म्हणून आम्ही हे केले असे सांगण्याची दुर्दैवी वेळ तुमच्यावर येते आणि ते तुम्ही मान्य करता. म्हटले गेले की, सांगितलेल वस्तुस्थिती खरी आहे की, माननीय मंत्र्यांचे आता जे दुष्काळी दौरे झाले ते दुष्काळी दौरे नव्हते, पर्यटन होते, यापेक्षा दुसरे काहीही नव्हते. नैसर्गिक आपत्ती येते, त्यावेळी संबंधित माननीय पालकमंत्री आपल्या जिल्ह्यात ठाण मांडून बसले असते तर ती स्थिती निर्माण झाली नसती. सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत परिचारक बाजूला बसले आहेत. त्यांनी सांगावे की, आता दुधाच्या दराबाबत दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या मनात नेमकी काय भ्‍ावना आहे. ते सरकार पक्षाचे आहेत तरी त्यांनी सांगावे. सभापती महोदय, त्या प्रक्रियेत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

दोष आहे. ते नाही बोलणार, मला माहीत आहे. ते बोलूच शकत नाहीत आणि त्यांनी बोलूही नये. वस्तुस्थिती काय आहे, ती नेमकी असणे आवश्यक आहे. शेती आणि शेतीवरील पूरक व्यवसाय

..5



श्री. सुनील तटकरे ....

करणारा प्रत्येक माणूस कोणत्याही क्षेत्रात नाही. व्यापाऱ्याच्या मनामध्येही खूप आस्था असती, व्यापारामध्ये मोठ्या प्रमाणात उलाढाल असती तर राज्याच्या उत्पन्नात भरीव प्रकारची वाढ झाली असती. आम्हाला हेही समजले पाहिजे की, 15 हजार कोटी रूपयांचा अर्थसंकल्प, 40 ते 50 हजार कोटी रूपयांच्या पुरवणी मागण्या यांचा पैसे आला कोठून ? उत्पन्नात भर नाही. प्रत्येक वेळी बोलत आहात की, आम्हा सगळ्यांना कर्जाच्या खाईत टाकले, त्यामुळे आज आम्हाला सरकार कसे चालविता येणार ? पहिले 2-4 महिने लोकांना पटले. ठीक आहे. आता दीड वर्षे झाले आहेत. आता सांगून उपयोगाचे नाही. आपणही 40-45 हजार कोटी रूपयांचे कर्ज घेतले. काही नवीन नाही. आता सुध्दा हे सरकार कर्ज भरत आहे. सभापती महोदय, युती सरकारने सन 1995 ते सन 1999 दरम्यान कर्ज रोखे काढले होते, त्याचे व्याज भरण्यासाठी दरवर्षी सरकारला काही हजार कोटी रूपयांचा नियतव्यय द्यावा लागला. वस्तुस्थिती आहे. मी चुकीचे बोलत नाही. माहिती घेऊन सांगत आहे. कर्जरोखे सन 1995 ते सन 1999 च्या काळात उभारले, त्याचे व्याज देण्यासाठी सरकारला खूप मोठ्या प्रमाणात निधी द्यावा लागत आहे. आर्थिक शिस्तीचे धडे द्यायचे असतील तर त्यातून काही कल्पना घ्या. इतक्या मोठ्या घोषणा केल्या, मात्र त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी नेमकी कोणती पाऊले उचलली जात आहेत असा सवाल देखील येणे आवश्यक आहे. माहिती येऊ द्या, कळू द्या, आनंद वाटेल. 8 लाख कोटी रूपयांची गुंतवणूक असलेले सामंजस्य करार असलेले कोणते उद्योग आहेत, ते काय करणार आहेत, कोणत्या विभागात जाणार आहेत हे समजले पाहिजे.

....Q

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे........

केवळ मुंबई, पुणे, नाशिक या गोल्डन ट्रँगलमध्येच उद्योग जाणार आहेत का, राज्यातील अन्य कोणत्या भागात ते जाणार आहेत का, मागास भागात जाणार आहेत का, याची स्पष्टता महाराष्ट्रातील जनतेसमोर येणे अत्यंत आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या हिताला अजिबात बाधा न आणता फार काही भांडवलदारांसाठी केले अशातील भाग नाही. आपले खूप दौरे झाले. पण त्यामधून खूप मोठी औद्योगिक गुंतवणूक आणि लोकांना रोजगार मिळाला, अशातीलही भाग नाही.

सभापती महोदय, सरकारने नवीन योजना जरूर आणाव्यात. पण त्या नवीन असाव्यात. जुन्या योजना बंद करुन त्याच योजनांना नवीन स्वरुप देण्याचे काम करु नये. कारण, आता लोकांना त्यामधील फोलपणा कळलेला आहे. त्या दिवशी जुनीच शिवनेरी बस आणली आणि त्यावर 'शिवशाही' असे लिहिण्यात आले. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात देखील हे छापून आले होते. कोणताही शासकीय कार्यक्रम शासकीय इतमामातच झाला पाहिजे. कारण, हे कार्यक्रम शासनाचे आहेत, कोणा एका राजकीय पक्षाचे नाहीत. पण तो कार्यक्रम एका राजकीय पक्षाचा वाटला म्हणूनच बाकीची नेतेमंडळी त्या ठिकाणी गेली नाही. सरकारचा कार्यक्रम सरकारी पध्दतीनेच झाला पाहिजे. आमच्याही कालावधीत शासकीय कार्यक्रम झाले. तुम्ही ते अनेकवेळा बघितले असतील. पण पक्षाचे झेंडे कधी कार्यक्रमात लावले गेले नाहीत. कारण, तो शासनाचा कार्यक्रम असतो. शासन निवडून देत असताना ते एखाद्या पक्षाचे निवडून दिले जाईल. पण एकदा शासन निवडून आल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाच्या चाकोरीमध्येच कारभार झाला पाहिजे. राज्यकारभार करीत असताना तुमची पक्षीय भूमिका व्यासपीठावरुन मांडण्याचा जरूर तुम्हाला अधिकार आहे. पण शासकीय कार्यक्रमामध्ये पक्षाचे झेंडे लावून त्याच पध्दतीचा उद्‌घोष केला गेला तर सरकार म्हणून नेमके काय होणार आहे, याबद्दलची चिंता आज लोकांच्या मनामध्ये मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली आहे. राज्यपाल महोदयांच्या भाषणाबद्दलची नापसंती आमची हीच आहे.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांना एका ठराविक चौकटीमध्ये त्यांचे भाषण करावे लागते. कारण, मंत्रिमंडळाने तयार करुन दिलेले ते भाषण असते. त्यामुळे मी मघाशीही विचारले

...2....

श्री.सुनील तटकरे........

होते आणि माझा प्रश्न तोच आहे की, आम्ही आता घटनाच बदलतो आहोत की काय ? घटनेच्या प्रिॲम्बलमध्ये जे लिहिलेले आहे त्यावरच आम्ही घाला घालण्याचा प्रयत्न करतो आहोत की काय ? कारण, आरक्षणाच्या बाबतीत वेगवेगळ्या भूमिका, वेगवेगळ्या स्तरावर मांडल्या जात आहेत. कुणी तरी परवा अशीही भूमिका मांडली की, "ज्यांना आरक्षण मिळाले आहे, पण जे श्रीमंत आहेत, त्यांनी आरक्षण सोडावे." सन्माननीय श्री.विष्णू सवरा हे आता आदिवासी विकास मंत्री आहेत. ते आरक्षणाचा लाभ सोडतील का ? मी फक्त त्यांच्याच आरक्षणबद्दल विचारतो आहे. बारा बलुतेदारांचे, अठरापगड जातींचे आरक्षण तर सोडूनच द्या. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकरांच्या बाबत मी बोलणारच आहे. सन्माननीय मंत्री श्री.विष्णू सवरा हे आरक्षणाच्या माध्यमातूनच निर्वाचित झाले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर हे त्या पध्दतीने निर्वाचित झालेले नाहीत. त्यांना पक्षाने तिकिट दिलेले आहे. पण सन्माननीय मंत्री श्री.राजकुमार बडोलेजी मात्र आरक्षणातून निर्वाचित झाले आहेत. मूळ आरक्षणाच्या बाबतीत जी भूमिका मांडली जात आहे त्यामुळे एक प्रकारचा संदेह लोकांच्या मनात निर्माण झाला आहे. या सरकारने मराठा समाजाला आरक्षण दिले नाही, मुस्लीम समाजाला आरक्षण दिले नाही, सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकरांच्या तोंडाला पूर्णपणे पाने पुसली, त्यांना आरक्षण दिले नाही. त्यामुळे घटनेने दिलेल्या आरक्षणात काही बदल होणार आहे का, याबाबतची शंका सबंध महाराष्ट्रातील जनतेच्या मनात निर्माण झाली आहे. हे आरक्षण घटनेने दिलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना त्यावेळी ते अभिप्रेत होते.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी आता असे सांगितले की, "कुणी तरी व्यक्ती असे बोलले की, श्रीमंत झालेल्यांना आरक्षण नको आणि त्यामुळे लोकांच्या मनामध्ये संदेह निर्माण झाला आहे." पण जेव्हा असे बोलले गेले तेव्हा केंद्र सरकारने लोकसभेत केंद्र शासनाची भूमिका स्पष्टपणाने सांगितलेली आहे. त्यामुळे या नोंदीबाबत आपण विचार करावा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...3....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, शंकेला वाव कोठे निर्माण झाला ? आदिवासी विकास आणि सामाजिक न्याय विभागामार्फत मागासवर्गीय आणि आदिवासी मुलांसाठी शिक्षणाच्या अनेक योजना आहेत. आजच वर्तमानपत्रात एक बातमी आली आहे. ज्यावेळी नाशिक जिल्ह्यातील मुले थंडीने कुडकुडत होती त्यावेळी त्यांच्या अंगावर स्वेटर नव्हते. सन्माननीय राज्यमंत्री श्री.दिलीप कांबळे काहीही बोलोत, त्यांना बोलण्याचा अधिकार आहे, तेही आरक्षणातूनच आज येथे आले आहेत, ते आज मंत्री आहेत. मी त्यांनाही विचारतो की, ते आता आरक्षणाचा लाभ सोडण्यास तयार आहेत का ? सन्माननीय मंत्री श्री.प्रकाश महेता यांनी खुलासा केला. आपला खुलासा मला मान्य आहे. सरकारची भूमिका आपण या ठिकाणी स्पष्ट केली त्याबद्दल आपले आभार. पण लोकांच्या मनामध्ये अशी साशंकता निर्माण झाली आहे की, "आम्हाला घटनेच्या माध्यमातून मिळालेले आरक्षण आता राहणार आहे किंवा नाही, आमचे अस्तित्व राहणार आहे किंवा नाही." राज्यातील कल्याणकारी योजना बंद झाल्या आहेत. नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणावर थंडी असताना आदिवासी विकास मंत्री महोदय सांगतात की, "थंडी नाही." त्यावेळी टी.व्ही.वरील वेगवेगळ्या वाहिन्यांवर दाखविले जात होते की, लहान लहान बालके थंडीमध्ये कशी कुडकुडत होती. ही वस्तुस्थिती आहे आणि हा विषय त्याच्याशीच निगडीत आहे.

सभापती महोदय, मी राज्यपालांच्या अभिभाषणातील फक्त दोन पच्छिेदांवरच बोललो आहे. कारण, पुढे वाचण्यासारखेच काही नाही. भाषण वाचून काही तरी बोलावे, सरकार काही तरी करीत आहे, अशी उमेद त्या माध्यमातून निर्माण व्हावी, अशा प्रकारचा कोणताही उल्लेख अभिभाषणात नसल्यामुळे पुढे वाचण्याची इच्छाच नाही. त्यामुळे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक एवढ्यापुरतेच मी बोललो आहे. शिक्षणाच्या बाबतीत तुम्हाला काहीच करावयाचे नाही. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक या विषयांवरच मी बोललो आहे. या चारही आघाड्यांवर हे सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्यामुळे पुढील वर्षभरात या सरकारकडून काही घडेल असे वाटत नाही.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात सुरुवातीलाच असे सांगितले गेले आहे की, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांमध्ये जनतेच्या

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.........

कल्याणार्थ अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत आणि लगेच दुसऱ्या दिवशी डान्स बार सुरु झाले. या ठिकाणी सांस्कृतिक विषय मांडला जातो आणि दुसऱ्या दिवशी डान्स बार सुरु होतात आणि आपण सर्वजण मोठमोठ्याने बाके वाजवता. पुढे रायगड महोत्सवाला लक्षणीय प्रतिसाद मिळाल्याचे म्हटले जाते. मी टिकाटिप्पणी करणार नाही. मी योग्य वेळी त्यामधील फोलपणा, वस्तुस्थिती काय आहे, हे सांगणार आहे. रायगडमध्ये कायमस्वरुपी शिवसृष्टी निर्माण केली जाईल, असे मी सांगितले होते. रायगड महोत्सव भरविला जाईल, असे मी म्हणालो नव्हतो. कारण, चार दिवसांच्या महोत्सवाने काही होणार नाही. राज्यपाल महोदयांच्या भाषणाची आपण ही अशी सुरुवात केली आहे ? (अडथळा........) मी त्याच रायगडच्या मातीत जन्माला आलो असल्यामुळे त्यामधील फोलपणा मला माहीत आहे. त्याच सह्याद्रीच्या कुशीत, त्याच रायगडच्या पायथ्याशी आम्ही वावरलो आहोत. सन्माननीय श्री.प्रकाश महेता साहेब आपण रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री आहात. तुम्ही कायम रायगडवासी रहा, अशी माझी आपल्याला विनंतीच आहे. पुढील पाच वर्षे आपण आमचे पालकमंत्री रहा. (अडथळा......) हे कितीही बोलले तरी आपणच पालकमंत्री रहा, अशी माझी मागणी आहे. सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांचीही तशी इच्छा आहे. आम्हाला पुढील पाच वर्षे आपणच पालकमंत्री म्हणून लाभावेत, अशी आमची इच्छा आहे. मी जन्मोजन्मी म्हणणार नाही. कारण, पाच वर्षानंतर सत्ता परिवर्तन होणारच आहे. (अडथळा......) आपण मनापासून बोलता का ? येथे त्या दिवशी भाषण केले आणि तेथे साताऱ्यामध्ये जाऊन वेगळे भाषण केले. तुम्ही दुष्काळासाठी दौरे करता आणि त्या दुष्काळाच्या बाबतीत बोलण्याचे धाडस या सभागृहात दाखवीत नाही. म्हणूनच मी म्हणालो की, कुठले उद्योग, कुठे झाले आणि त्यामुळे नेमके काय झाले तेच काही कळत नाही. वाघासारखे बोलण्याचा आव आणणारी माणसे कुठल्या कुठे जाऊन बंदिस्त झाली. सत्तेचा महिमा किती अगाध आहे, याचे उदाहरण या निमित्ताने पहावयास मिळत आहे. म्हणूनच राज्यपाल महोदयांच्या या अभिभाषणाबद्दल मी तीव्र नापसंती व्यक्त करतो आहे आणि सरकारच्या कामकाजात अधिकाधिक पारदर्शकता यावी, प्रभावी काम व्हावे, ही भूमिका मांडतो आहे.

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे........

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून या सरकारला विचारु इच्छितो की, बदलीच्या कायद्यात आपण काही बदल केला आहे का ? ज्यावेळी आमच्या सरकारने बदलीचा कायदा केला त्यावेळी दर 3 वर्षांनी बदल्या होत होत्या. आता 3 वर्षे कोणताच अधिकारी एका जागी रहात नाही. आता दर दीड-दोन वर्षानंतर बदल्या होत आहेत. कुठल्याच अधिकाऱ्याला तो 3 वर्षे एका जागी राहील, असे वाटत नाही. सगळ्याच विभागात हे होत आहे. (अडथळा.....) आम्ही त्यावेळी आपल्याला विनंती करीत होतो. पण आपण आम्हाला असे सांगत होता की, तसे करता येत नाही. आपल्याला सांगून सांगून आम्ही दमलो. पण तुम्ही त्यावेळी ऐकतच नव्हता. त्यावेळी आपणच सांगितले की, कायदा असा आहे आणि आता तुम्ही असे सांगत आहात की, ही वस्तुस्थिती खरी आहे.

सभापती महोदय, अधिकारी एका जागी 3 वर्षे राहील आणि त्याला काम करण्यासाठी ठराविक कालावधी मिळेल, या उद्देशाने हा कायदा केला गेला होता. परंतु, तसे होताना दिसत नाही. माहितीच्या अधिकारात देखील माहिती मिळत नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सुध्दा माहिती मिळत नाही. मग माहितीच्या अधिकारात सामान्य माणसाला माहिती कशी मिळेल ? असे वेगवेगळे प्रश्न लोकांच्या मनामध्ये दीड वर्षाच्याच कालावधीत निर्माण झाले आहेत. म्हणून राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबद्दल मी तीव्र शब्दात नापसंती व्यक्त करतो. गेल्या वर्षभरामध्ये सरकारने लोकांच्या दृष्टीकोनातून पावले उचलली नाहीत, शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या दृष्टीकोनातून भूमिका घेतली नाही, शेतकऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या दृष्टीकोनातून भूमिका घेतली नाही, याबद्दलची नापसंती या ठिकाणी व्यक्त करुन मी माझे विचार थांबवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

------------

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभाताई फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा अतिशय गंभीर विषय आहे. सन 2015-2016 मध्ये 3235 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली, सन 2004-2005 मध्ये 4147 शेतकऱ्यांनी, सन 2006-2007 मध्ये 4238 शेतकऱ्यांनी आणि सन 2007-2008 मध्ये 4453 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली होती. मागील काळापेक्षा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमी झाले आहे. खरे तर, एकाही शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागू नये. कारण, शेतकऱ्याची आत्महत्या हा दु:खाचा विषय आहे.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.........

महाराष्ट्र राज्याची आर्थिक स्थिती उन्नत झाली, महाराष्ट्र राज्य आर्थिक दृष्ट्या सबळ झाले तर आपल्याला शेतकऱ्यांनाही आर्थिक दृष्ट्या सक्षम करता येईल.

सभापती महोदय, खऱ्या अर्थाने उद्योग हा देशाच्या व राज्याच्या प्रगतीचा एक भाग असतो. मी राज्याच्या आर्थिक पाहणीचे पुस्तक उघडून बघितले. त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे उद्योगांचा वृद्धीदर सन 2012-13 मध्ये 9.2 टक्के, सन 2013-14 मध्ये 4.5 टक्के होता आणि सन 2014-15 मध्ये तो 4 टक्क्यांवर आला. राज्यातील उद्योगांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी झाले. त्यामुळे राज्यात आर्थिक कोंडी निर्माण झाली. मागील 15 वर्षापासून मिहान प्रकल्प रखडलेला होता. आम्ही कित्येक वेळा तत्कालीन शासनाकडे शिष्ट मंडळ घेऊन गेलो आणि मिहान प्रकल्पाविषयी बोलणी केली. परंतु, मिहान प्रकल्प सुरुच होऊ शकला नाही. आज मिहान प्रकल्प सुरु होण्याच्या मार्गावर आहे. मी एमआयडीसीच्या संदर्भात सांगू इच्छिते की, मराठवाडा किंवा विदर्भातील कोणत्याही एमआयडीसीमध्ये उद्योग सुरु नाहीत. सर्व उद्योग पश्चिम महाराष्ट्र, मुंबई, पुणे आणि कोकणामध्ये आहेत. कोकणातील उद्योग कोकण विभागातीलच आहेत. परंतु, मुंबई, पुणे आणि पश्चिम महाराष्ट्राचा विचार केला तर सर्व उद्योग त्या भागात आहेत. मराठवाडा आणि विदर्भात उद्योगासाठी एमआयडीसीच्या जागा घेऊन ठेवल्या, परंतु मागील 25 वर्षात तेथे एकही उद्योग उभा राहिला नाही. अशा पद्धतीने मराठवाडा आणि पश्चिम विदर्भाची आर्थिक कोंडी झाली. त्यामुळे खऱ्या अर्थाने सर्व बाबतीत शेतकरी अडचणीत आलेला आहे. बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढली. आयटीआय झालेली मुले देखील नोकरीसाठी धडपडत होती. अजून किती मुले बेरोजगार आहेत, असा प्रश्न मी विधान सभेत उपस्थित केला होता. त्यावेळी 17 लाख असे उत्तर देण्यात आले होते. ही चांगली गोष्ट नव्हती. ज्या ठिकाणी उद्योग उभे राहतात त्या ठिकाणी आर्थिक कोंडी होत नाही. शहरात ज्या एमआयडीसी सुरु झाल्या त्या बंद झाल्या होत्या, त्यांचे उद्योग बंद होण्यास सुरुवात झाली होती आणि सरकार पूर्णपणे आर्थिक कोंडीमध्ये सापडले होते. म्हणून खऱ्या अर्थाने आर्थिक सुविधा निर्माण करावयाच्या असतील तर मोठ्या प्रमाणावर उद्योग उभे करणे आवश्यक आहेत. मी सांगू इच्छिते की, आपण "मेक इन महाराष्ट्र", "मेक इन जिल्हा" अशा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.........

पद्धतीने उद्योग उभे करणार आहोत. म्हणून मला माननीय राज्यपालांचे आभार मानने आवश्यक आहेत. कारण, जगात आर्थिक कोंडी निर्माण झाली त्या प्रमाणे महाराष्ट्र राज्यात देखील आर्थिक कोंडी निर्माण झाली आणि ही आर्थिक कोंडी कमी करावी म्हणून उद्योगाला विशेष महत्व देण्याचे प्रयत्न होत आहेत.

सभापती महोदय, एखादा उद्योग सुरु करावयाचा असेल तर त्यासाठी 44 परवाने लागत होते. परवानगी घेण्यासाठी एका खिडकीवरुन दुसऱ्या खिडकीवर आणि त्या खिडकीवरुन आणखी तिसऱ्या खिडकीवर जावे लागत होते आणि एका परवान्यासाठी तीन-चार महिने लागत होते. यामुळे उद्योगपती थकून जात होते आणि शेवटी महाराष्ट्रात उद्योग सुरु न करता बाहेरच्या राज्यात उद्योग सुरु करण्याची प्रवृत्ती निर्माण झाली होती. वाढते विजेचे दर, जमिनीचा प्रश्न, उद्योगासाठी लागणाऱ्या 44 परवान्यांचा प्रश्न यामुळे राज्यात उद्योग येत नव्हते. खऱ्या अर्थाने उद्योजकांसाठी एक प्रेमाचा हात, सहकार्याचा हात पुढे करुन त्यांनी आमच्या भागात उद्योग उभे करावेत, यासाठी शासनाने मैत्री हे एक खिडकी व्यासपीठ प्रस्तावित केले आहे. बऱ्याच वर्षापासून एक खिडकी योजना उद्योजकांसाठी आवश्यक होती. एक खिडकी योजनेच्या माध्यमातून एकाच ठिकाणावरुन सर्व परवाने मिळत असतील तर ते आम्हाला सोईचे होईल, अशी उद्योजकांची मागणी होती. महाराष्ट्र शासनाने एक खिडकी योजना लागू केलेली आहे, याबद्दल मी माननीय राज्यपालांचे आभार मानते. उद्योगाचे क्षेत्र वाढले तर महाराष्ट्र राज्याचा मोठ्या प्रमाणावर आर्थिक विकास होईल, असे म्हणावयास हरकत नाही. एक खिडकी योजना असेल, राज्यात मोठे उद्योग आणावयाचे असतील आणि मग ते उद्योग 8 कोटीचे आहेत का 8 लाख कोटी रुपये किंमतीचे आहेत हा प्रश्न नाही. आता राज्यात उद्योग येण्यास सुरुवात झालेली आहे. उद्योजकांना सुविधा मिळून त्यांची उद्योग उभा करण्याची क्षमता निर्माण झाली तर राज्यात मोठ्या प्रमाणावर उद्योग येतील. मी कोणत्याही शेतकऱ्याला म्हटले की, तुझ्या शेतात खजुराचे झाड लाव तर तो माझ्याकडे संशयाने बघेल. माझ्या शेतात खजुराचे झाड उगवलेच नाही तर माझे वर्षभराचे नुकसान होईल. त्यापेक्षा मी जे पीक घेतो तेच बरोबर आहे, ही स्पर्धा असते. आपल्याला स्पर्धेत दाखविले जाते की,

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.........

अमूक ठिकाणी चांगला उद्योग सुरु झालेला आहे तर आपल्याकडे 10 उद्योग यायला सुरुवात होतील, अशा प्रकारे हे स्पर्धेचे युग आहे. राज्यात उद्योग उभे राहत असतील तर राज्याचा निश्चितपणे विकास होईल, असे माझे मत आहे.

सभापती महोदय, मला या सभागृहात अनेक वर्षे झालेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांना देखील या सभागृहात बरीच वर्षे झालेली आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रात उभे राहावे, हा विषय आपण कित्येक वर्षापासून सभागृहात मांडत आहोत ? मला पूर्वीच्या सरकारच्या हेतूबद्दल संशय नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रात व्हावे, असे त्यांच्याही मनात होते. परंतु, त्यासाठी अडचणी देखील तेवढ्याच होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रातील उभे करण्याकरिता आता प्रत्यक्षात सर्व परवानग्या मिळालेल्या आहेत. त्याच बरोबर, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची यापूर्वीच नियुक्ती करुन सन 2029 पर्यंत या स्मारकाचे काम पूर्ण करण्याचे शासनाने निश्चित केलेले आहे. शासनाने कामे निश्चित केलेली आहेत. मग संशय कशाचा आहे ? त्यासाठी परवानग्या मिळालेल्या आहेत, स्मारक उभे करण्याचे ठरलेले आहे, तरीही संशय ? आपण जर संशयाच्या चक्रव्युहामध्ये सापडलो तर आपण त्यातून कधीच बाहेर पडू शकत नाही.छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रात व्हावे ही जनतेच्या मनातील प्रबळ इच्छा होती आणि ती इच्छा पूर्ण होत आहे. लोकांच्या मनातील मोठी इच्छा पूर्ण होत असल्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे आभार मानते.

सभापती महोदय, मला आठवते की, मी विधान सभेचे सदस्य असताना त्या सभागृहात एक विषय उपस्थित झाला होता. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांना देखील तो विषय आठवत असेल. महात्मा गांधीजींच्या झोपडीला उधळी लागली होती. आता महात्मा गांधीजींच्या विचारांनाही त्या काळात लागली असेल, मी असे म्हणत नाही, त्यांच्या झोपडीला उधळी लागली होती. ती उधळी काढण्याकरिता मोठ्या प्रमाणावर टस निर्माण झाली होती. मग त्या माध्यमातून ती उधळी काढण्याचा प्रयत्न झाला होता. महात्मा गांधीजींनी आयुष्यभर मोठ्या प्रमाणात जोरकस

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.........

विचार मांडून दारुबंदी करवली. त्यासाठी त्यांनी महिलांची मिटींग घेतली. त्याच महात्मा गांधीजींच्या झोपडीच्या मागे मोठ्या प्रमाणावर दारु विकली जात होती, हा त्या काळातील अतिशय गंभीर विषय होता. आता आपण त्यांची 150 वी जयंती साजरी करीत आहोत. म्हणून शासनाने तेथील विकासाच्या योजना असतील, तेथील छोटे उद्योग असतील, गृह उद्योग असतील, महात्मा गांधीजींच्या विचारांची जी दिशा होती त्या दिशेप्रमाणे विकास करण्याचा प्रयत्न करण्याचे ठरविले आहे. महात्मा गांधीजींच्या कुटीला एक नवीन स्वरुप द्यावे, नूतनीकरण करावे आणि त्यांची स्मृती आणि स्मारक शासनाने कायम ठेवण्याचे ठरविले आहे, याबद्दल मी माननीय राज्यपालांचे आभार मानते. वर्ध्याचा विकास, सेवाग्रामचा विकास, महात्मा गांधीतींच्या विचारांचा विकास आणि खऱ्या अर्थाने अहिंसेचा विकास व्हावा. लोक म्हणतात की, महात्मा गांधीजींच्या झोपडीमागे ओपन पद्धतीने ड्रमने दारु विकली जाते. तेथे दारु विकली जाऊ नये आणि खऱ्या अर्थाने महात्मा गांधीजींच्या विचारांची जोपासना व्हावी, अशा पद्धतीची भूमिका सुद्धा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते.

सभापती महोदय, कर्नाटक-सीमा प्रश्न कित्येक वर्षापासून आहे. आपण सभागृहात अनेक वेळा त्यासाठी एकमताने ठराव पास केले. आपण सर्वांची मिळून एक कमिटी देखील नियुक्त केली. परंतु, आपण हा प्रश्न मोठ्या प्रमाणात सोडवू शकलो नव्हतो.शेवटी आपण या संदर्भात सर्वोच्च न्यायालयामध्ये केस दाखल केली आणि दिनांक 12 सप्टेंबर, 2014 रोजी न्यायालयीन प्रकरणाची सुनावणी झाली. हा प्रश्न सोडविण्याकरिता जम्मू आणि काश्मीर उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश श्री.मनमोहन सरीन यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. कर्नाटक राज्यातील वादग्रस्त सीमा भागातील मराठी भाषिक हा अतिशय संवेदनशील विषय आहे. मराठी माणूस महाराष्ट्र राज्याला जोडला गेला पाहिजे. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे कर्नाटक राज्यातील भाषा लादली जाऊ नये, अशा प्रकारची भूमिका सभागृहाने पूर्वी देखील घेतली होती. त्या दृष्टीकोनातून मराठी भाषिक जनतेच्या समस्या प्रभावीपणे सोडविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम आणि सहकार मंत्री यांची समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. यापूर्वी असे कधीही घडलेले नाही. खऱ्या अर्थाने

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.........

त्या काळात सीमा प्रश्न सोडविण्याकरिता ज्या पद्धतीने मोठ्या प्रमाणावर प्रयत्न व्हावयास पाहिजे होते ते झाले नाहीत. पंरतु, आता ते प्रयत्न होत आहेत म्हणून मी माननीय राज्यपालांचे आभार मानते.

...S-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.....

मागील चार वर्षापासून अवर्षणाचा सामना किंवा अवर्षण, अतिअवर्षण, दुष्काळ हा प्रश्न निर्माण झालेला आहे....(अडथळा).....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सीमा वादाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्यामुळे सन्माननीय सदस्यांना अखंड महाराष्ट्र किंवा संयुक्त महाराष्ट्र राहावा व विदर्भ वेगळा होऊ नये असे म्हणायचे आहे काय ?

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी कर्नाटक-महाराष्ट्र सीमा वादाविषयी बोलत आहे, विदर्भाबाबत बोललेली नाही. त्यामुळे कृपा करुन माझ्या भाषणात कोणीही अडथळा निर्माण करु नये. माझ्या भाषणाचा ओघ थांबवून अडथळा आणण्याचा प्रयत्न सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी कृपा करुन करु नये. तुमच्या कोणत्याही प्रयत्नाला यश येणार नाही.

सभापती महोदय, निसर्ग कोणाच्याही हातात नसल्यामुळे गेल्या चार वर्षापासून निसर्ग कोपत आहे, निसर्गाचा कोप आपण थांबवू शकत नाही. गेल्या चार वर्षापासून मराठवाडा व विदर्भाला अवर्षणाचा फटका बसलेला आहे. 1972 मध्ये अशाच प्रकारे अवर्षणाचा फटका बसला होता. त्यावेळी पाऊस कमी झाला होता तसाच प्रकार आता देखील झालेला आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची कमतरता व चारा टंचाई अशा सर्व बाबींचे प्रश्न निर्माण झाले आहेत. परंतु महाराष्ट्र शासनाला केंद्र शासनाकडून यावर्षी 3049 कोटी रुपयांचे पॅकेज मिळाले आहे. आतापर्यंत मिळालेल्या पॅकेजपेक्षा हे पॅकेज सर्वात जास्त रकमेचे आहे. यापैकी 2536 कोटी रुपये वितरीत करण्यात आले आहेत. हा पैसा शेतकऱ्यांच्या बँक खात्यात सरळ जमा होत असल्यामुळे ती रक्कम शेतकऱ्यांना डायरेक्ट मिळत आहे. मला माहिती आहे की, शेतकऱ्यांचे नुकसान कोणीही भरुन काढू शकणार नाही. कितीही मदत करतो म्हटले तरी शेतकऱ्यांना आपण आवश्यक तेवढी मदत करु शकत नाही. कर्जमाफी केली तरी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आधार मिळेल अशातला भाग नाही. शेतकऱ्यांना अवर्षण व दुष्काळी परिस्थितीतून आणि आत्महत्येच्या मार्गातून बाहेर काढावयाचे असेल तर त्यांच्यासाठी सिंचनाच्या सोई व चांगल्या प्रतीचे बी-बियाणे फुकट व रासायनिक खताचा पुरवठा केला तर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या आपण कमी करु शकतो. शेती उत्पादनावरील खर्च कमी होत नाही, उत्पन्नात चांगली वाढ मिळत नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांना



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.....

वाचविण्यासाठी सर्व प्रयत्न करावे लागणार आहेत. राज्यपालांच्या अभिभाषणात चांगल्या प्रतीचे व फुकट बियाणे देणे, कर्जाला मुंजुरी देणे, या बाबींचा उल्लेख आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करुन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी व त्यांच्यात जगण्याची उमेद निर्माण करण्याकरिता जलसंधारणाची कामे करण्याचे महाराष्ट्र सरकारने ठरविले आहे. जलसंधारणांच्या कामांना गती मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्यात जलसंधारण महामंडळाकरिता 2025 पर्यंत कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. प्रत्येकाला प्रश्न पडतो की, धरणात पाणी कोठून आणावे. विदर्भात अनेक नद्या वाहत आहेत, कित्येक वर्षापासून नद्यावर धरण बांधा असे आम्ही म्हणत आहोत. अनेक वर्षापासून बॅरेज बांधण्याची मागणी करण्यात येत आहे. विदर्भात मोठ्या प्रमाणात नद्या वाहत आहेत, तरी देखील त्या भागात शासन कोणतेही धरण किंवा बॅरेज बांधू शकले नाही. नदीच्या काठावर राहत असलेला शेतकरी आत्महत्या करीत असेल तर ही मोठी दुर्दैवाची बाब आहे. ही अभिमानाची बाब नाही. नदीतून वाहून जाणारे पाणी अडविले तर ते पाणी उद्योगांना व शेतीसाठी देता येईल. विदर्भात पाण्याची कमतरता नसून तेथे नियोजनाची कमतरता आहे, मानसिकतेची कमतरता आहे. म्हणून शासनाकडे माझी नम्र विनंती आहे की, जलसंधारणाचा 10 हजार कोटी रुपयांचा 2025 पर्यंतचा कार्यक्रम हाती घेतला आहे तो अत्यंत चांगला आहे. पाणी अडवून ते उद्योगाला व शेतीला देण्याचा योग्य कार्यक्रम करण्यात येत आहे. अनेक वेळा आम्ही विचारणा करुन देखील मराठवाडा व विदर्भातील अडकलेले प्रकल्प पूर्ण करण्याकरिता कार्यवाही केली जात नव्हती. परंतु आता ती करण्यात येत असल्यामुळे या भागातील उद्योगासाठी व शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची कमतरता भासणार नाही. त्यामुळे राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर मी आभार व्यक्त करते.

सभापती महोदय, 450 वर्षापासून 6800 माजी मालगुजारी तलाव विदर्भात आहेत, त्या तलावांना मामा तलाव असे म्हणतात. हे तलाव त्या काळात ब्रिटीशांनी बांधले आहेत. या तलावांवर शासनाकडून अद्याप एक पैसा देखील खर्च केलेला नाही. त्या तलावांतील गाळ काढणे, त्याचा पाण्याचा येवा दुरुस्त करणे.

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत पटले : सभापती महोदय, मालगुजारी तलाव 300 ते 350 वर्षापूर्वी बांधले असतील तर त्यावेळी ब्रिटीश नव्हते. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना नक्की काय म्हणायचे आहे ते कळले पाहिजे, त्यावेळी ब्रिटीश नव्हते.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना जे विचारायचे आहे तेच मी सांगणार आहे. हे तलाव मालगुजार, गावकरी, मच्छिमार व ठल्ले यांनी बांधले आहेत. हे तलाव सरकारच्या अधिकाऱ्यांनी बांधले नाहीत, मला अभिमानाने सांगावेसे वाटते की, आमच्या इंजिनिअर लोकांनी बांधलेले तलाव मोठ्या प्रमाणात फुटतील, परंतु कोणतेही टेक्निकल नॉलेज नसताना इतक्या वर्षापासून बांधलले हे तलाव आजही सक्षम आहेत. त्या तलावांची दुरूस्ती झालेली नाही, गाळ काढण्यात आलेला नाही, फिडर कॅनॉलची दुरूस्ती करण्यात आलेली नाही. मागील काळात सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार मंत्री असताना त्यांनी या कामासाठी 20 कोटी रुपयांचा निधी देण्याची माझी मागणी मान्य केली होती. परंतु हा निधी मिळाला नाही व या तलावांची दुरूस्ती होऊ शकली नाही. आता 6800 तलावाच्या दुरूस्तीसाठी दरवर्षी 100 कोटी रुपये देण्यात येणार आहेत. ही पूरक योजना आहे, जलसंधारणाच्या कामासाठी या तलावांची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. आमच्याकडे धान पीक असल्यामुळे या तलावांची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. या भागाला आमच्याकडे झाडीपट्टी म्हणतात. त्या ठिकाणी हे सर्व तलाव आहेत. या तलावांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. ऊसासाठी जेवढे पाणी लागते तेवढेच पाणी धान पिकासाठी लागते. 100 टक्के पाण्याचा पुरवठा केल्याशिवाय धान पीक येऊ शकत नाही. त्यामुळे या तलावांना विदर्भात विशेष महत्व आहे. या तलावांच्या दुरूस्तीसाठी दरवर्षी 100 कोटी रुपये देण्याच्या योजनेचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात असल्यामुळे मी त्यांचे आभार मानते.

सभापती महोदय, शेतकरी अपघात विमा योजना ही योजना जुनी आहे हे मला मान्य आहे. या योजनेचा लाभ मिळावा म्हणून मी शेतकऱ्यांच्या बाजूने किती वेळा भांडली आहे. जो शेतकरी अपघातात मरण पावला, रस्त्यात पडून मेला, त्यावेळी अपघात विमा हा फक्त शेतकऱ्यांसाठी नव्हता. हा विमा सर्वसामान्य कामगार, मजूर यांच्यासाठी होता. मी शेतकऱ्यांच्या 18 केसेस टाकल्या तरी देखील त्याचा लाभ मिळाला नाही. आता कै.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा सुरु

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.....

करण्यात आलेला असून शेतकऱ्यांच्या विम्याच्या हप्त्याचे 1 कोटी 37 लाख रुपये शासन भरणार आहे. शेतकऱ्यांचा पूर्ण हप्ता सरकार भरणार आहे. शेतकऱ्याचा मृत्यू झाला तर त्याला दोन लाख रुपये मिळणार अशी ही योजना आहे. हात, पाय किंवा शरीर अपंग झाले तर एक लाख रुपये मदत देण्याचा निर्णय झालेला आहे. अशा प्रकारचा कोणताही विमा या अगोदर नव्हता असे मला म्हणायचे आहे.

सभापती महोदय, पंतप्रधान सडक योजनेऐवजी दुसरी योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा निधी आलेला नव्हता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात आपल्याकडील कामे अडकून पडली होती. म्हणून या ठिकाणी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अशी नवीन योजना सुरु करण्यात आलेली आहे. ग्रामीण भागातील 730 किलोमीटर रस्ते जोडण्यासाठी 13 हजार कोटी रुपयांची योजना महाराष्ट्र शासनाने तयार केलेली आहे. स्वप्न पाहू नये असे कोणी म्हटले नाही. माझे म्हणणे असे आहे की, जेव्हा मी हिंमतीने पाऊल पुढे टाकीन तेव्हाच मला आर्थिक स्थिती चांगली करता येईल. जेव्हा हिंमतीने कोणतीही गोष्ट करावयास जाईन तेव्हा मी खऱ्या अर्थाने माझे घर उभारु शकेन. जसे मी हिंमतीने घर उभारु शकेन तसेच राज्य उभारण्याचे काम देखील याच माध्यमातून केले जाणार आहे. वस्ती, वाड्या, ग्रामीण भागातील रस्ते या माध्यमातून पूर्ण करण्याची ही योजना आहे. या योजनेच्या बाबतीत मी राज्यपालांचे आभार मानते.

सभापती महोदय, महिला आणि बालकांची सुरक्षा हा अतिशय गंभीर विषय आहे, गेल्या 15 वर्षापासून या विषयावर मी बोलत आहे. आज निर्माण झालेला हा प्रश्न नाही. 3,10,14 व 18 वर्षाची मुलगी असेल यासंदर्भातील आकडेवारी आम्ही मांडत होतो. याबाबत सुधारणा झाल्याचे मला फारसे दिसून येत नाही. न्यायालयात निकाल लागण्याचे प्रकार अतिशय कमी असतात. याबाबत नेहमी आम्ही बोलत होतो. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र शासनाने मुंबईत 90 हून अधिक महिला पोलीस गस्त पथके स्थापन केली आहेत. मागील काळात मोबाईची व्यवस्था केली होती.

या नंतर श्री.सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

महिलांना संरक्षण मिळण्याच्या दृष्टीने अनेक व्यवस्था करण्यात आल्या आहेत. व्यवस्था झालेल्या नाहीत, असे मी म्हणणार नाही, मी आरोप करणार नाही. परंतु आपल्याला त्यात पाहिजे तेवढे यश मिळाले नाही. महिलांकरिता 90 पेक्षा अधिक सुरक्षा पथके आहेत, यामुळे महिलांच्या सुरक्षिततेला काही प्रमाणात मदत होईल याची मला पूर्णपणे जाणीव आहे. अपराध सिध्दीचे प्रमाण अतिशय कमी होते. हा न्यायालयाचा प्रश्न किंवा पोलीस चौकशीचा भाग असेल असे नाही. परंतु न्यायालयामध्ये या संदर्भात अतिशय कमी निकाल लागत होते. अन्यायाच्या दृष्टीकोनातून आवश्यक असलेले निकाल कमी लागत होते आणि कोर्टात मोठ्या प्रमाणात गुन्हेगार सुटायचे. सदर प्रमाण 36 टक्क्यांवरुन 52 टक्क्यांपर्यंत वाढले आहे. त्यात आणखी वाढ होईल याबद्दल माझ्या मनात संशय नाही. या गोष्टीचा मोठ्या प्रमाणात विचार करण्यात आला, याबद्दल मी माननीय राज्यपालांचे आभार मानते.

सभापती महोदय, सर्वात महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, विदर्भात नक्षलवादी चळवळ मोठ्या प्रमाणात आहे. मी हा विषय नेहमी मांडत आहे. नक्षलवाद्यांबाबत बोलत असताना आदिवासींचा मृत्यू, भरदिवसा गोळ्या घालणे तसेच कोणालाही सुरक्षा नव्हती. नक्षलवादी चळवळ कमी व्हावी याकरिता सर्वांच्या मनात मोठी चिंता होती. आज सुध्दा गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा तसेच गोंदिया येथे मोठ्या प्रमाणात नक्षलवादी भाग आहे. मी काही ठिकाणी स्वतः फिरते आणि आदिवासी लोकांमध्ये काम करते. मला त्याची तीव्रता माहीत आहे. एक-एक, दोन-दोन दिवस तीन-तीन लोकांना मारले जाते. तसेच भरचौकात आदिवासींचे खुन होतात तेव्हा मनात असे वाटते की, त्यांना खरोखर कोणीचाही आधार नसेल का ? आता नक्षलवाद्यांची चळवळ कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात विचार होऊ लागला आहे. आज नक्षलवाद्यांची स्थिती थोड्या फार प्रमाणात कमी झाली आहे. नक्षलवादी स्वतःला कमी समजू लागला आहे.

सभापती महोदय, रेल्वे, परिवहन मंडळ, आदिवासी असो तसेच कुपोषणाच्या संदर्भात सांगायचे झाल्यास आपला जिल्हा नव्हेतर संपूर्ण महाराष्ट्र कुपोषणाच्या बाबतीत पुढे आहे. कुपोषण कमी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याने योजना लागू केल्या आहेत, त्यासंबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख केला आहे. अशा प्रकारे राज्याच्या विकासाचा संपूर्ण चेहरा

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

त्यात दिसत आहे. एक वर्षानंतर आपल्याला त्या चेहऱ्याचे प्रतिबिंब दिसेल तेव्हा आपण त्यावर विश्वास ठेवू शकाल. तोपर्यंत समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्य त्यावर विश्वास ठेवणार नाहीत असा मला विश्वास आहे. मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे आभार प्रदर्शन करते आणि राज्य खऱ्या अर्थाने विकासाच्या दिशेने जात आहे, असा विश्वास व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवते.

----------

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आज सदनात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा सुरु असताना मी राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

आमच्या भगिनी आणि ज्येष्ठ सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी असे सांगितले की, सरकारवर विश्वास ठेवला पाहिजे आणि विश्वासाने पुढे गेले पाहिजे. आता सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी त्यांच्या भाषणात असे सांगितले होते की, शेतकऱ्यांच्या बाबतीत आमच्या योजना आहेत, परंतु त्यांची नावे बदलली आहेत. त्यात कृषी संजीवनी, पाणी संजीवनी किंवा जलयुक्त शिवार अशा अनेक योजना आहेत. मी या संदर्भात 10 मुद्दे देऊन खेद व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु संसदीय कार्यमंत्री मला म्हणाले की, तुम्ही हा खेद मतदानाच्या रुपाने आणू नका. हा खेद मतदान रुपाने मंजूर झाल्यास तो एक प्रकारे सरकारचा पराभव आहे. आम्ही संसदीय परंपरा पाळली, तुम्ही ती पाळावी. सभापती महोदय, आम्ही विश्वास दाखवावा असे तुम्ही म्हणतात. परंतु दुष्काळ, शेतकरी, पाणी टंचाईच्या बाबतीत आम्ही काय म्हणतो यापेक्षा तुमचा सहकारी पक्ष शिवसेना आणि तुमचे ॲडव्होकेट जनरल काय म्हणतात ते मी सदनाला सांगतो.शेतकऱ्यांबद्दल या सरकारची काय भूमिका आहे याबाबत शेतकऱ्यांचा प्रश्न हायकोर्टात आला त्यावेळी त्यांनी दिनांक 19 फेब्रुवारी, 2016 रोजी अग्रलेखात आपले म्हणणे मांडले. अग्रलेखात काय म्हणणे मांडले, मी त्याबाबत सर्व सांगणार नाही. हा अग्रलेख मोठा आहे. यामुळे तो वाचण्याची गरज नाही. त्यातील पहिले वाक्य वाचतो. सरकारी यंत्रणेला शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत काहीही पडले नाही अशा लाथा महाराष्ट्राच्या ॲडव्होकेट जनरलनेच घातल्यावर राज्यात इतर दुश्मनांची गरज ती काय ? श्रीहरी अणे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत सरकारला नालायक ठरवले. विदर्भ आणि मराठवाड्याबद्दल सरकारची भूमिका ढोंगी असल्याचा छक्का मारुन, सिक्सर, महाराष्ट्राच्या वकिलांनी त्यांच्या सरकारला माती खायला लावली. ॲडव्होकेट जनरल हायकोर्टात बोलले आहेत. हे आमचे मत नाही. शिवसेनाच्या सदर अग्रलेखाला असे हेडिंग आहे की, "अणे यांचा सरकारला बांबू." यावर आम्ही काय बोलायचे. मी आपल्याला त्यातील दुसरे वाक्य सांगतो. सभापती महोदय, मी माझ्या मनाचे काही सांगत नाही.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खंत व्यक्त करीत असताना एखाद्या वर्तमानपत्रातील अग्रलेखावरुन भाषण करावे. कोणाताही पेपर असो, वर्तमानपत्राचा आधार घेवून त्यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलणे, त्यापेक्षा ते जास्त चांगले बोलू शकतात. ते वरिष्ठ सन्माननीय सदस्य आहेत. त्यांनी राज्यपालांच्या अभिभाषणाचे वाचन केले आहे. त्यांना संपूर्ण महाराष्ट्र माहीत आहे. अशा परिस्थितीत त्यांना वर्तमानपत्राचा आधार घेवून बोलावे लागत आहे यापेक्षा दुसरे दुर्दैव नाही.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी त्यातील दोन वाक्य वाचून दाखवतो. त्यात असे नमूद केले आहे की, "सरकारच्या नालायकीबाबत जे भयंकर मत व्यक्त केले गेले, त्यास त्यांचे वैयक्तिक मत म्हणता येणार नाही. कारण उच्च न्यायालयात महाराष्ट्राची बाजू मांडताना त्यांनी सरकारवर..." मला पुढील शब्द वाचणे शक्य नाही. "कारण उच्च न्यायालयात महाराष्ट्राची बाजू मांडताना त्यांनी सरकारवर तंगडी वर केली आहे."

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मी सरकारी विरोधी सांगत नाही. यावर आपल्याला काही भाष्य करायचे असल्यास आपण ते जरुर करावे, तो आपला अधिकार आहे. परंतु छक्का काय, बांबू काय, तंगडी वर, इतक्या पातळीवर जाऊन सरकारला बोलायला लागल्यास जनतेमध्ये सरकारची इमेज काय राहणार ? जनतेमध्ये सरकारबाबत चुकीचा मेसेज जाईल.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, "सामना" ची भाषा, हे त्यांचे वैशिष्ट आहे. आपण हा विषय सोडून द्यावा. मी त्या शब्दावर जात नाही. परंतु त्यात शेवटी जे कन्क्ल्युजन आहे त्यात मेक इन इंडियात 251 रुपयांत स्मार्ट फोन मिळणार असल्याचे आमच्या वाचनात आले. पण विदर्भ, मराठवाड्यातील शेतकऱ्यांना घोटभर पाणी व पसाभर धान्य हवे आहे, गुरांना चारा हवा आहे. हे सर्व देण्यास महाराष्ट्रावर राज्य करणारे विदर्भाचे राज्यकर्ते अपयशी ठरले आहेत. असे आमचे मत नसून म्हणजे सामनाचे मत नसून मुख्यमंत्री फडणवीस यांनी नेमलेले मेक इन विदर्भ असलेले राज्याचे मुख्य वकील श्रीहरी अणे यांचे हे मत आहे.

यानंतर U-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे......

सभापती महोदय, वेळेचे भान ठेवून मी मेक इन महाराष्ट्र याबद्दल बोलणार आहे. माननीय अर्थमंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले की, 8 लाख कोटी रुपयांचे गंतवणूक करार झाले असून महाराष्ट्रातील 30 लाख लोकांना रोजगार मिळणार आहे. हे सर्व हवेतील बाण आहेत. मेक इन महाराष्ट्र कार्यक्रमाच्या निमित्ताने मी काही प्रश्न उपस्थित करीत आहे त्याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे. गुजरात राज्याच्या माननीय मुख्यमंत्री श्रीमती आनंदीबेन पटेल महाराष्ट्रात 5 ऑक्टोबर, 2014 रोजी आल्या होत्या. त्यांनी इंडियन मर्चंट चेंबरमध्ये भाषण करताना महाराष्ट्रातील उद्योगपतींना आवाहन केले की, गुजरात फार जवळ आहे, मला मुंबईची फार भीती वाटते, मुंबईतील रहदारीची भीती वाटते, तुमचे उद्योगधंदे गुजरातमध्ये न्या.

सभापती महोदय, गुजरात राज्याच्या माननीय मुख्यमंत्री श्रीमती आनंदीबेन पटेल असे म्हणाल्या की, "Why only invest in Mumbai, where people calculate the time spend in traffic rather than the distance to be covered. Gujarat is just in the neighborhood. You all should invest in Gujarat." माननीय मंत्री श्री.प्रकाश महेता हे मुंबईचे सुपुत्र आहेत. गुजरातच्या माननीय मुख्यमंत्री मुंबईमध्ये भाषण करताना सांगतात की, उद्योगपतींनो गुजरातमध्ये चला. माननीय श्री.नरेंद्र मोदी भारताचे पंतप्रधान झाले. महाराष्ट्रातील किती उद्योग राज्याबाहेर गेले पहा. श्री.नरेंद्र मोदी, श्री.अमित शहा आणि श्रीमती आनंदीबेन पटेल यांचा महाराष्ट्रातील उद्योग गुजरातमध्ये न्यायचा प्लॅन आहे. हे तुम्ही थांबविणार आहात का? हा मेक इन महाराष्ट्राच्या निमित्ताने माझा प्रश्न आहे. मुंबईतील एअर इंडियाचा कारभार दिल्लीला हलविण्यात आला. महाराष्ट्रात राहिलेला नाही. आज एअर इंडियाची नरिमन पॉईंट येथील इमारत रिकामी पडून आहे. त्या इमारतीतील अनेक मजले भाड्याने दिले आहेत. रिझर्व्ह बँकेचे कार्यालय मुंबईतून बाहेर हलविले. जेएनपीटीचा कारभार पोरबंदर येथे नेण्यात आला. पालघर हा नवीन जिल्हा निर्माण झाला. त्या जिल्हयातील कोस्टगार्डचे हब गुजरातमध्ये नेण्यात आले. भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी याचे उत्तर द्यावे. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी, भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष श्री.अमित शहा व गुजरातच्या माननीय मुख्यमंत्री श्रीमती आनंदीबेन पटेल यांचा जो उद्योग चालला आहे तो थांबविणार आहात का? या प्रश्नाचे उत्तर सभागृहाला दिले पाहिजे.

....2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.....

सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर दिले नाही तरी चालेल, परंतु शिवसेना पक्षाचे कार्यकारी प्रमुख आदरणीय श्री.उध्दवजी ठाकरे म्हणाले की, "भारतीय जनता पक्ष हा शेठजी सावकारांचा पक्ष आहे, त्यांना मुंबईचा सौदा करायचा आहे. महाराष्ट्र लुटायला दिल्लीहून अफजलखानाच्या फौजा आलेल्या आहेत." हे माझे म्हणणे नाही.

सभापती महोदय, मेक इन इंडिया कार्यक्रमामध्ये अनेक सामंजस्य करार केले. सामंजस्य करार हा एकमेकावर विश्वास असतो त्यावेळेला होतो. मेक इन महाराष्ट्र आणि मेक इन इंडिया यापेक्षा सामंजस्य करारामध्ये महत्वाचा मेक इन फेथ असतो, विश्वास असतो. आज सरकारमधील सहकारी पक्ष, माननीय सदस्य श्री.महादेव जानकर, सर्वश्री राजू शेट्टी, सदाभाऊ खोत, माननीय सदस्य श्री.विनायक मेटे, आरपीआय पक्षाचे श्री.रामदास आठवले यांची अवस्था मी सांगण्याची आवश्यकता नाही. श्री.रामदास आठवले यांनी निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पक्षाबरोबर लेखी सामंजस्य करार केला. ज्यांच्यामुळे हे सरकार मेक इन पॉवर झाले त्या सहकाऱ्यांना सत्ताधारी विसरत असतील तर मेक इन महाराष्ट्र कसे होणार हा आमच्यासमोर प्रश्न उभा राहिला आहे.

सभापती महोदय, मेक इन महाराष्ट्र सांस्कृतिक कार्यक्रमाच्या निमित्ताने गिरगाव चौपाटीवरील मंडपाला आग लागली. आम्हाला त्या घटनेबद्दल फार वाईट वाटले. माननीय मुख्यमंत्री व माननीय उद्योगमंत्री यांनी घटनास्थळी उभे राहून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल आम्ही त्यांचे कौतुक करतो. या आगीबद्दल महाराष्ट्राच्या जनतेच्या काय भावना आहेत? मी कवि श्री.शामसुंदर सोनार यांची एक कविता वाचून दाखवितो.

जगाच्या पोशिंद्याचे दु:ख आभाळाला खेटले
आणि शेतकऱ्याच्या तळतळाटाने तुमचे स्टेज पेटले.
मेक इन इंडियाचा केवढा बोलबाला
इकडे शेतकरी मात्र नुसता खर्च करुन करुन मेला
उद्योगपतींची वाढते ढेरी, शेतकऱ्यांचे रक्त आटले
आणि शेतकऱ्यांच्या तळतळाटाने तुमचे स्टेज पेटले
किती मांडू हिशोब सारा, मन फार विटले
आणि शेतकऱ्यांच्या तळतळाटाने तुमचे स्टेज पेटले.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.....

सभापती महोदय, नवीन सरकार सत्तेवर येऊन दीड वर्षाचा काळ लोटला आहे. महागाईचा निर्देशांक सतत वाढत आहे. केंद्र सरकार वेळेवर धान्य पाठवित नाही, धान्य आले तर राज्य सरकार उचलत नाही. कृत्रिम टंचाई निर्माण केली जाते. दिवाळीच्या काळात तूरडाळ घोटाळयाचा प्रश्न निर्माण झाला. केंद्र सरकारने आणि राज्य सरकारने तूरडाळीवरील निर्बंध उठविले. जवळजवळ 8 ते 9 महिने व्यापाऱ्यांना साठा करण्याची परवानगी देण्यात आली. मागील नागपूर अधिवेशनामध्ये हा प्रश्न ऐरणीवर आला होता. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे सभागृहाचे कामकाज बंद पडले आणि आम्हाला हा विषय मांडता आला नाही. 70 ते 80 रुपये प्रती किलो या दराने विकली जाणारी तूरडाळ 250 रुपये किलो या दराने बाजारात विकली जात होती. केंद्रीय मंत्री श्री.रामविलास पासवान महाराष्ट्रात आले. डाळीच्या दरवाढीला राज्य सरकार जबाबदार असल्याचे बोलले गेले.

नंतर व्ही.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे....

आणि मग त्यावर आरोप, प्रत्यारोप सुरू झाले. त्यानंतरच ही सर्व भूमिका आली. जवळ जवळ साडेचार हजार कोटी रूपयांचा घोटाळा तूरडाळ प्रकरणांमध्ये झाला होता. आम्हाला तो नागपूरला मांडता आला नाही. सभापती महोदय, या शासनाचे किती घोटाळे सांगायचे ? मी आता तूरडाळीवरील कविता वाचून दाखवितो. माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.गिरीश बापट हे पुण्यामध्ये शनिवार पेठेमध्ये राहतात. तेथे घरासमोर पाट्या लावल्या होत्या की, "पुणेरी खानावळ जेवणाच्या ताटात वरणाची वाटी शोधू नये. चुकून वरणाची वाटी आलीच तर त्यात डाळ शोधू नये." एका खानावळीने पाटी लावली की, "तूरडाळीला राष्ट्रीय सुका मेवा म्हणून घोषित करावे." अशा पाट्या माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांच्या घरा समोर लावल्या होत्या. तूरडाळ घोटाळ्याचा विषय हा फार जिव्हाळ्याचा आहे. आजही तूरडाळीचे भाव उतरलेले नाहीत. मी केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांच्या नागपूर येथील पूर्ती स्टोअर येथे गेलो. तेथे देखील 130 रूपयाच्यावर तूरडाळ होती. ती तूरडाळ मी शिजवायला सांगितली. ती तूरडाळ 3 तास शिजली नाही. ही तूरडाळ चायनावरून आणली होती. अशा प्रकारे आपण किती घोटाळा केला आहे?

सभापती महोदय, आज मी खाद्य तेलाच्या घोटाळ्याबाबत निवेदन करणार आहे. ते निवेदन गांभीर्याने ऐकून घ्यावे. भारत सरकारच्या फूड अँड सेफ्टी स्टँडर्ड ॲक्ट 2006 ची अंमलबजावणी 2011 पासून सुरू झाली. या ॲक्टमध्ये सर्व प्रकारची खाद्य तेले ही पॅकबंद पाऊच मध्ये, बंद डब्यामध्ये, बंद बाटलीमध्ये किंवा बंद प्लास्टिकच्या ग्लासमधून विकण्याची तरतूद आहे.हा केंद्र सरकारचा 2006 चा कायदा आहे. हा कायदा सन 2011 पासून लागू आहे. खाद्य तेलामध्ये भेसळ होऊ नये, क्वालिटी आणि क्वांटीटी योग्य रहावी, उत्पादक व विक्रेत्यावर जबाबदारी राहावी म्हणून हे सर्व करण्यात आले आहे. सर्वसामान्य जनतेला पॅकबंद खाद्य तेल मिळाले पाहिजे म्हणून ही तरतूद केली आहे. असे असताना सुद्धा खाद्यतेल व्यापाऱ्यांच्या मागण्या आल्या आणि मधल्या काळामध्ये त्यांना ग्रेस पीरिअड दिला. हा कालावधी 28 ऑक्टोबर 2013 ते 27 ऑक्टोबर 2014 असा होतो. मोठ्या उत्पादकांना व छोट्या विक्रेत्यांना आपली सर्व बांधणी करण्यासाठी शासनाने एक वर्षाचा ग्रेस पीरिअड दिला होता.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे....

यानंतर कोणत्याही प्रकारचे खाद्यतेल किरकोळ किंवा सुटे विकता येणार नव्हते. कारण त्यात मोठ्या प्रमाणावर भेसळ होते. तसेच वजनमापामध्ये ग्राहकांना लुबाडले जाते. गेल्या पंधरा महिन्यानंतर काय घडले ? हा कायदा 2011 पासून लागू होता. हा कायदा परवा परवा पर्यंत लागू होता. दिनांक 28जानेवारी 2016 रोजी हा कायदा सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी उठविला. याला कारण काय होते ? हे निर्बंध उठविण्याच्या दोन महिने अगोदर अन्न व औषध प्रशासनाला सांगण्यात आले की, राज्यभर सर्व खाद्यतेल व्यापाऱ्यांवर धाडी टाकाव्यात. त्याप्रमाणे् आपल्या विभागाने धाडी टाकल्या. मग माननीय मंत्र्यांना खाद्यतेल व्यापाऱ्यांची अनेक शिष्टमंडळे येऊन भेटली. या सगळ्या व्यवहारामध्ये 500 कोटी रूपयांचा घोटाळा झालेला आहे. ज्यांनी तूरडाळ घोटाळा केला, खाद्यतेल घोटाळा केला त्या माननीय मंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मी जाहीर मागणी करीत आहे.

सभापती महोदय, चिक्की घोटाळ्याचा देखील विषय आहे. हा विषय देखील उद्या परवा येईल. उत्तरात आले आहे की, जी चिक्की होती ती खाण्या लायक नाही. त्याबद्दल एफडीएने रिपोर्ट दिलेला आहे. 26 कोटी रूपयांची आपण चिक्की घेतली आहे. मी येथे सगळ्या गोष्टींचा उल्लेख करणार नाही. हा विषय येत्या एक-दोन दिवसांमध्ये आपल्या सभागृहात येणार आहे. महिला व बालकल्याण मंत्री, अन्न व नागरी पुरवठा मंत्री, शिक्षण मंत्री, आदिवासी मंत्री या सर्वांनी घोटाळा केलेला आहे. आदिवासी मंत्र्यांनी वह्यांमध्ये 20 कोटी रूपयांचा घोटाळा केलेला आहे. या सर्व माननीय मंत्र्यांनी राजीनामे दिले पाहिजेत असे मी येथे सांगू इच्छितो. आम्हाला महिला व बालकल्याण विभागाकडून परवा उत्तर आले आहे पाच कोटी रूपयांची बिस्कीटे गोवर्धन आयुर फार्मा यांच्याकडून खरेदी करण्यात आली आहेत. या गोवर्धन आयुर फार्माकडे फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड ऑथेरिटी ऑफ इंडिया यांचा परवानाच नव्हता. मग चिक्की घोटाळा झाला नाही काय, पौष्टीक आहारामध्ये घोटाळा झाला नाही काय हे सर्व घोटाळ्याचे विषय येणार आहेत. आपण लेखी उत्तरामध्ये दिले आहे की, परवाना नसताना पाच कोटी रूपयाचे काम त्यांना दिले आणि सहा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे...

महिन्यानंतर सांगितले की, सगळी विस्कीटे काढून घ्यावीत. यात पाच कोटी रूपये पाण्यात गेले. कशा प्रकारे राज्य चालले आहे. या सर्व घोटाळ्यांची उत्तरे आपल्याला द्यावी लागणार आहेत. आता सभागृहात सन्माननीय मुख्यमंत्री नाहीत. पण ज्याचा घोटाळा आम्ही काढला त्याला क्लिन चिट देण्यात आली आहे. प्रत्येक विभागाला क्लिन चिट देण्यात आली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांकडे जीएडी आहे तसे त्यांनी क्लिन चिट डिपार्टमेंट निर्माण करावे आणि रोज त्यांनी क्लिन चिट देत बसावे. किती घोटाळे आपण करीत आहात ?

सभापती महोदय, येथे सीमा प्रश्नाचा उल्लेख सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी उल्लेख केला आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. त्या ज्येष्ठ सदस्या आहेत. त्यांनी याचा जाणीवपूर्वक उल्लेख केला आहे. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये काय आहे ? आपल्याला सीमा प्रश्नासंबंधी कोणती जाणीव आहे. आपल्याला कोणतीही जाणीव नाही. आपण माननीय मंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील यांना समन्वयक म्हणून नेमले आहे. जम्मू-काश्मीरचे माजी न्यायाधीश श्री.मनमोहन सरीन यांना साक्षी पुरावे गोळा करण्यासाठी नेमले आहे. आपण सीमावासीयांसाठी काय केले आहे ? 40-50 वर्षे सीमावासीय लढत आहेत. विधिमंडळाचे सर्वपक्षीय शिष्टमंडळ दीड वर्षामध्ये माननीय पंतप्रधानांकडे घेऊन गेलेला नाहीत. हे आपले दुर्दैव आहे. आम्ही आमचे सरकार आल्या असताना हे केले होते. आता आपले सरकार असताना आपण करणार नाहीत काय ? सीमा प्रश्नाबद्दल आपल्या काहीच भावना नाहीत. हे सरकार सीमा प्रश्नाबद्दल संवेदनशील नाही. त्यामुळे राज्यपालांच्या अभिभाषणातील या मुद्यासंबंधी देखील मी जाणीवपूर्वक खेद व्यक्त करतो. आमच्या भगिनींनी सांगितले की, महात्मा गांधीजींची 150 जयंत साजरी करणार आहोत. हिंदी मध्ये एक म्हण आहे सौ चुहें खाके बिल्ली चली हज को. महात्मा गांधीजींच्या विचारांचा ज्यांनी आयुष्यभर विरोध केला, ज्यांनी नथुराम गोडसेचा उदोउदो केला ते महात्मा गांधीजींची जयंत साजरी करायला निघाले आहेत. आपण जयंती साजरी करावी. त्याचा आम्हाला आनंद आहे. आम्ही त्याला विरोध करीत नाही. महात्मा गांधीचे तत्त्वज्ञान जगाने मान्य

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे...

केलेले आहे. ब्रिटीश साम्राज्यशाही जगातून हटणार नाही पण पहिला आणि शेवटचा धक्का महात्मा गांधी यांनी 1942 साली ब्रिटीशांना दिला आणि जगातील अनेक देश स्वतंत्र झाले. महात्मा गांधीजींचा इतिहास आपण विसरू नका.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मी परत एकदा माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांना सांगू इच्छितो की, महात्मा गांधीजींची 150 जयंती साजरी करणार आहोत ते ही त्यांना पटत नाही. कारण गांधी या नावाचा ठेका त्यांनीच घेतलेला आहे. ते गोडसेच्या विचारसरणीचे लोक असा उच्चार करीत आहे. हा एकच शब्द गेली 60-70 वर्षे बोलून आपले कोणी ऐकले आहे काय ? आपल्याला कोणी प्रमाणपत्र देत आहे काय, आपल्याला काही प्रमाणपत्र पाहिजे काय, सन्माननीय सदस्य हे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत आहे. त्यामुळे त्यांनी आता केलेले वक्तव्य आपण रेकॉर्डवर ठेवणार आहात काय ?

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता......

अशाप्रकारचे वक्तव्य रेकॉर्डवर राहणार असेल... जे विषय माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाहीत त्यावर भाष्य करुन फक्त राजकीय भाषण करायचे असेल तर ...

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी काय बोलायचे ते माननीय मंत्री ठरविणार काय ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी काय बोलायचे ते मंत्री ठरवित नाही. परंतु आपणास सभागृहाचा डेकोरम पाळला पाहिजे. सभागृहात कोणते कामकाज घ्यायचे हे कामकाज सल्लागार समिती ठरविते, मंत्रिमंडळ ठरवित नाही. सभागृहात कोणत्या विषयावर काय बोलावे हे सन्माननीय सदस्यांना कळले नसेल तर त्यांनी मध्यस्थी करु नये. रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी येथे बोलत आहे. या ठिकाणी बसलेले सर्वजण नथुराम गोडसेचे वारस आहेत अशाप्रकारचे वक्तव्य सन्माननीय सदस्यांनी केलेले आहेत. त्यांचे हे शब्दप्रयोग रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे, अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, .....

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, महात्मा गांधी यांचे नाव घेऊन घेऊन राज्याला बरबाद केले, राज्याचे वाटोळे केले..

**तालिका सभापती (श्री.मुझफ्फर हुसेन )**: मंत्री महोदयांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे त्यांच्या भाषणात काही अयोग्य शब्द असतील तर ते सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी त्यांचे भाषण सुरु करावे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, महात्मा गांधी यांचे नाव घेतल्यावर सर्व सभागृह उभे राहते. आम्हाला त्यांची विचारसरणी दिसते. भारतीय जनता पक्षावर महात्मा गांधींच्या विचाराचा पगडा आला ही स्वागतार्ह बाब आहे. आपण महात्मा गांधीचे विचार मानायला लागलात याचे आम्ही अंत:करणपूर्वक स्वागत करतो. आपण वर्धा, पवनार, सेवाग्राम या भागांचा विकास करायला निघाला आहात त्याबद्दल आपले अभिनंदन करतो.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.....

सभापती महोदय, मी पुराव्याशिवाय बोलत नाही. मागील वर्षभरात दैनिक "सामना"मध्ये आलेले अग्रलेख माझ्याजवळ आहेत. ते सर्व अग्रलेख मी वाचत नाही, त्यामध्ये खूप वेळ जाईल. मी फक्त त्या अग्रलेखाचे हेडींग वाचतो... (अडथळा) मी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलत आहे. दिनांक 26 ऑक्टोबर, 2015 "स्वातीची आत्महत्या हा कसला लातून पॅटर्न" स्वाती नावाच्या मुलीला एस.टी.चा 250 रुपयांचा पास घेता आला नाही. आपल्या आईवडिलांना वेदना नको म्हणून दहावीत शिकणाऱ्या मुलीने गळफास लावून घेतला. हा विषय गांभीर्याने घेण्याचा आहे,आपण मंत्री महोदयांना समज द्यावी. दहावीतल्या एका मुलीने आत्महत्या केली याचे आपणास काही वाटते की नाही ? दिनांक 16 जानेवारी 2016 "शेषरावांच्या मातीला चला" मराठवाड्यातील जालन्यातील खरफुडी गावातील शेतकरी श्री.शेषराव शेजुळ,यांनी आत्महत्या केली. त्यांनी आत्महत्या करण्यापूर्वी चिठ्ठी लिहिली की, माझ्या अंत्ययात्रेला शासनाने यावे. किती हे क्लेशदायक आहे ? आपणास काही संवेदना आहेत की नाही ? दिनांक 3 फेब्रुवारी, 2016 "मंत्रालयातील आनंदी आनंद" श्री.आनंद कुलकर्णी निवृत्त झाले. या अग्रलेखात मंत्रालयात काय चालले आहे त्याचे वाभाडे काढलेले आहे. दिनांक 24 ऑक्टोबर, 2015 "महागाईचे तांडव", दिनांक 8 ऑक्टोबर, 2015 "भयंकर महागाई". दिनांक 20 नोव्हेंर, 2015 "वहिनीसाहेबांचे तरी ऐका" हा अग्रलेख तर आपल्या डोळ्यात अंजन घालणारा आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या सुविद्य पत्नी यांनी मुख्यमंत्र्यांना सल्ला दिला की, तुरडाळीचे भाव तरी कमी करा. माननीय मुख्यमंत्र्यांच्या घरातून ही सूचना आलेली आहे. दुसरा अग्रलेख "कर्जाचे भारनियमन" माननीय ऊर्जा मंत्री नेहमी भारनियमाबद्दल बोलतात. आपण मेक इन इंडियासाठी कोठून वीज देणार आहात, किती दराने वीज देणार आहात, त्यासाठी किती कर्ज काढणार आहात हे त्यांनी सांगावे. "मुंबईची चिंता", "ताकही फुंकून प्या राव", "महाराष्ट्र हा बंदा रुपया", हे सर्व अग्रलेख वाचण्यासारखे आहेत. "चपराशाचे मंत्रिमंडळ" या अग्रलेखामध्ये असे लिहिले आहे की, ॲड.श्रीहरी अणे हे महाराष्ट्रातील श्रीखंड खाऊन त्याच महाराष्ट्रावर शेणाच्या पिचकाऱ्या मारत आहेत. स्वतंत्र विदर्भाचा नारा देत आहेत व त्यासाठी जनतेला फूस लावत आहेत. राज्याच्या मोठ्या पदावर विराजमान झालेल्या ॲड.श्रीहरी अणे यांनी चंद्रपूर येथे भाषणात जे तारे तोडले ते पाहता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांना त्यांनी चपराशी ठरवून श्रीहरी अणे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.....

मोठे झालेले आहेत. आपण मला सभागृहात हे सर्व मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---------

यानंतर श्री.बोर्डे...

.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर हे राज्य सरकार गंभीर नाही. ज्यावेळी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या आभार प्रदर्शनावरील प्रस्तावावर चर्चा सुरु झाली होती त्यावेळी या सभागृहात एकही अधिकारी उपस्थित नव्हते. आज सुध्दा सचिव दर्जाचे एकही अधिकारी उपस्थित नाहीत.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून राज्यातील जनतेला राज्य सरकारचे पुढील वर्षाचे किंवा पुढील वर्षाच्या अर्थव्यवस्थेच्या नियोजनाचे प्रतिबिंब कळत असते. राज्याचा अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी माननीय राज्यपाल सरकारच्या वतीने सरकारची भूमिका मांडत असतात. त्यामुळे माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे महत्त्वाचे असते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून राज्य सरकारची पुढील वर्षाची वाटचाल राज्यातील जनतेला समजत असते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा कशा प्रकारे होते या विषयी राज्यामध्ये चर्चा सुरु असते. सभापती महोदय, मी या अभिभाषणावरील चर्चेवर जास्त बोलणार नाही. केवळ काही ठराविक बाबी सभागृहाच्या निदर्शनास आणून देणार आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी सन 2015 मध्ये केलेल्या अभिभाषणाची प्रत माझ्याकडे आहे. त्यांनी मागच्या वर्षी अभिभाषणाच्या माध्यमातून केलेले वक्तव्य, राज्यातील जनतेला दिलेली आश्वासने आणि त्याची करण्यात आलेली पूर्तता एवढ्यापुरतेच मर्यादित मी बोलणार आहे. या सरकारने मागच्या अर्थसंकल्पाच्या निमित्ताने गोवंश हत्याबंदीची घोषणा केली होती. आम्ही त्यावेळी यास विरोध केला होता. कोणी कोणते अन्न खावे याला सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.हेमंत टकले यांच्यासह आम्ही सदस्यांनी प्रखर विरोध केला होता.

सभापती महोदय, आज महाराष्ट्रात भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. मराठवाड्यातील जनावरांना खाण्यासाठी चारा नाही, पिण्यासाठी पाणी नाही. या बाबत राज्य सरकारच्या माध्यमातून कसल्याही प्रकारचे नियोजन केले जात नाही. त्या भागामध्ये जनावरे मृत्युमुखी पडली तर त्यांना हात लावण्यास कोणीही पुढे येत नाही. कारण गोवंश हत्याबंदी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

असल्यामुळे मृत जनावरे उचलली तर त्यांच्यावर गुन्हे दाखल होतात. गोवंश हत्याबंदी केली



श्री.जयंत प्र.पाटील....

असली तरी त्यांचे संरक्षण करण्यासाठी कोणतीही जबाबदारी निश्चित केलेली नाही. 2015 मध्ये माननीय राज्यपालांनी केलेले अभिभाषण आणि त्या निमित्ताने गोवंश हत्या बंदीबाबत जनतेला दिलेले आश्वासन पाळले गेले नाही. मी तीन-साडेतीन महिने मराठवाड्यात ठाण मांडून असून, तेथील दुष्काळी भागात फिरत आहे. माननीय राज्यपालांनी मागच्या वर्षी केलेल्या अभिभाषणातून केलेल्या आश्वासनाच्या बाबतीत कार्यवाही केलेली नाही आणि या वर्षीच्या अभिभाषणात सुध्दा त्या बाबत तरतूद किंवा उल्लेख करण्यात आलेला नाही, याचा मला खेद होतो.

सभापती महोदय, आज अधिकाऱ्यांवर राज्य सरकारचा वचक राहिलेला नाही. आज अधिकारी मोकाट सुटल्यासारखे पळतात. एवढेच नव्हे तर राज्यकर्त्यांना सुध्दा संरक्षण नाही. त्यामुळे संरक्षणाच्या बाबतीत मला चिंता वाटते. राज्य मंत्रिमंडळातील एका राज्यमंत्र्यांनाच जिल्हाधिकारी अटक करावयास लागले तर हे राज्य कोण चालवितो हा प्रश्न निर्माण होतो. सन्माननीय सदस्य कोणत्याही पक्षाचे असोत, कोणत्याचे विचाराचे असोत, त्या सन्माननीय सदस्यांचा सन्मान झाला पाहिजे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात झालेले आंदोलन आपण बघितले. सहा महिन्यापूर्वी सोलापूर येथील माननीय राज्यमंत्री श्री.विजयकुमार देशमुख यांना अटक करण्यात आली होती. या राज्याच्या इतिहासात प्रथमच एक मंत्र्यांना अटक करण्यात आली. या बाबतीत चर्चा झाली होती. शासनाने सुध्दा हे कबूल केले. स्वतः माननीय राज्यमंत्र्यांनी पोलिसांच्या पिंजऱ्यात बसून मला अटक केल्याचे सांगितल्याचे आम्ही टी.व्ही. वर बघितले होते. आम्ही हा विषय सभागृहात सुध्दा मांडला होता. महोदय, मी सभागृहात ज्यावेळी बोलतो त्यावेळी पुराव्यानिशी बोलतो. महोदय, राज्याच्या एका मंत्र्याला अटक होणे हे शोभनीय नाही, किंबहुना त्याचे समर्थन सुध्दा आपण करु शकत नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यात रेती, वाळू, खनिज ट्रक मालकांनी आंदोलन केले. त्यावेळी राज्याच्या सत्ताधारी पक्षाच्या आमदार महोदयांना मारहाण करण्यात आली. एवढेच नव्हे तर तुला गोळ्या घालू असे तेथील एस.पी. सांगतो. त्यामुळे त्या अधिकाऱ्याला निलंबित करण्याची वेळ आली. तसेच सन्माननीय सदस्य श्री.नितेश राणे यांना अटक करण्यात आली आणि त्यांना सुध्दा मारहाण करण्यात आली. महोदय, सन्माननीय सदस्यांना मोर्चा काढण्यावर बंदी नाही. आणीबाणीच्या काळात अशा प्रकारची बंदी होती. तुम्ही-आम्ही त्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

कालावधीत आंदोलन केले. आणीबाणीच्या काळात आपण तुरंगात जाऊन राहिलो. मी विचारु

..3..



श्री.जयंत प्र.पाटील....

इच्छितो की, आज तीच परिस्थिती राज्यात पुन्हा आली आहे काय ? त्यामुळेच मी मोकाट सुटलेले अधिकारी असा शब्दप्रयोग केला. त्यामुळे आपण या प्रकाराला कुठे तरी थांबविले पाहिजे. महोदय, म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावतो आहे. परंतु राज्याच्या लोकप्रतिनिधींना संरक्षण मिळत नसेल तर, त्या बाबतचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कुठेही नाही याचा मला खेद होतो. आज आमदारांना एस.पी. मारहाण करतात, उद्या हवालदार सुध्दा मारहाण करण्यास मागे-पुढे पाहणार नाही. त्यामुळे या बाबतीत चर्चा झाली पाहिजे. शासनाने या बाबत उत्तर दिले पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर आपले विचार मांडले. त्यांनी विचारले की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा सुरु असताना शिवसेना पक्षाचे सन्माननीय सदस्य कुठे आहेत ? माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा सुरु असताना शिवसेना पक्षाचे अनुमोदन देणारे सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडला. वास्तविक पाहता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडल्यानंतर सत्ताधारी बाजूतील दुसऱ्या पक्षाचे सन्माननीय सदस्य त्यास अनुमोदन देत असतात. जर एकाच पक्षाचे सरकार असेल तर त्या पक्षातील एक सदस्य आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडतात व दुसरे सन्माननीय सदस्य त्यास अनुमोदन देत असतात. त्यानंतर त्यावर चर्चा होत असते. परंतु सध्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाला अनुमोदन दिलेले नसताना सुध्दा चर्चा होत आहे, याचे मुला दु:ख होते. मला वाटते हे प्रथमच या सभागृहात होत आहे. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब हे अनुमोदक असताना सुध्दा त्यांनी भाषण केलेले नाही. ज्यावेळी अनुमोदन म्हणून भाषण करावयाचे होते त्यावेळी ते सभागृहात उपस्थित नव्हते आणि आता सुध्दा उपस्थित नाहीत. शिवसेना पक्षाचे एकही सन्माननीय मंत्री आणि सदस्य उपस्थित नाहीत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

वाय.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील ....

आपण म्हणता तसे नाही. राज्यातील सत्ताधारी पक्षाला पाठिंबा असलेला पक्ष आज सरकार बरोबर दिसत नाही. अभिभाषणावर यांच्याबरोबर साथ दिली पाहिजे, ती दिसत नाही. हे मोठे आहे. सन 2015 च्या अभिभाषण्‍ामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबद्दल बोलण्यात आले आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे साहेब, अधिवेशन आले की, स्मारक येतात. बोटीतून जातात, येतात, मग पाहणी होते. 4-5 वर्षे चालते. आमचे सन्माननीय सदस्य श्री. महादेव जानकर साहेब हसत आहेत, त्यांना ते पटले आहे. खात्याचे एक अधिकारी अजून याची पूर्तता नाही असे सांगतात. माननीय मुख्यमंत्री म्हणतात की, पूर्तता आहे, सगळ्या परवानग्या आहेत आणि एन्व्हॉयरमेंट डिपार्टमेंटचे एक अधिकारी म्हणतात की, अजून आम्ही याला पूर्ण मान्यता दिलेली नाही. आम्ही 8 दिवसांपूर्वी पेपरमध्ये वाचले की, त्यांनी सांगितले की, अजून आम्ही याची पूर्तता केलेली नाही, यात पर्यावरणामध्ये निर्माण होणाऱ्या समस्या आहेत, यावर अजून आम्हाला अभ्यास करायचा आहे. मग परिपूर्ण अहवाल देऊ.

सभापती महोदय, गेल्या वर्षीच्या अभिभाषणामध्ये रायगड किल्ल्यावर महोत्सव करण्यासाठी 40 कोटी रूपयांची तरतूद केली. 4 कोटी रूपये खर्च झाले. मी रायगड महोत्सवाला गेलो. मी सरकारी कार्यक्रमाला कमीत कमी जाणारा आमदार आहे. माझे मित्र माननीय मंत्री श्री. विनोदजी तावडे यांनी मला 4 वेळा फोन केला. ते म्हणाले की, जयंत पाटील, तुम्हाला यावे लागेल. आम्ही गेलो, माननीय मुख्यमंत्रीही होते. आम्ही पाचाडला गेलो. तेथे पाण्याची आजही व्यवस्था नाही. सन 1967 मध्ये माझे वडील बांधकाम खात्याचे सभापती झाले. तेव्हा रायगडच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीवर गवत होते, तेथे दिवा जळत नव्हता, तेव्हा माझ्या वडिलांनी सांगितले की, अफझलखानच्या कबरीवर अत्तराचे दिवे जळतात आणि महाराजांच्या समाधीवर साधा दिवासुध्दा नाही. येथे गार्डन बनविले. जिल्हा परिषदेची कुवत का नाही ? गार्डन बनविले. तेथे गाऊंड आहे. आम्ही लहान होतो, आम्ही चालत यायचो. हे काही नव्हते. महाराजांना येथे रोज सलामी देण्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत केले. मग शासनाने त्या ठिकाणी हे सुरू केले. आज ते बंद आहे. वडिलांनी हे केले. सन 1967 ची गोष्ट आहे. त्यावेळी ते बंद झाले. सन 1972 मध्ये जिल्हा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील ....

परिषद परत काँग्रेसकडे गेली. सन्माननीय सदस्य श्री. विनोयक मेटे साहेब, आपण आता रायगडमध्ये आला. मी तेथे जन्मलो आहे. मी रायगड 100 वेळा पायी चढलो आहे. आम्हालाही थोडा इतिहास माहीत आहे. मला नवीन इतिहास माहीत नाही, नवीन घडामोडी माहीत नाहीत. पण इतिहास मी सांगू शकतो. कोणीही तो पुसू शकत नाही. जिल्हा परिषदेमध्ये हे सर्व प्रोसिडिंग आहे. (अडथळा) काँग्रेसने केले असेल हे म्हणणे बस झाले. आपण सत्तेवर आल्यानंतर आपली जबाबदारी आहे. आपण सत्तेवर असलो की, आपली जबाबदारी आहे. सामुदायिक नाही. सरकार चालवितो त्यावेळी यांनी केले हे सांगायचे काम नाही. आपण मुलगी नांदवायला आणली तर ती आपली झाली, तिच्या वडिलांनी अमुक चूक केली असे अमुक बोलून उपयोगाचे नाही. आता तिला नांदवायची, जगवायची, साडी-चोळी द्यायची सगळी जबाबदारी आपल्यावर आहे हे लक्षात ठेवा, म्हणून मी सांगत आहे. आज काय आहे ? सभापती महोदय, जीजामातांची समाधी आहे, त्या समाधीवर, मला सांगायला लाज वाटते, सकाळी रोज त्या समाधीवर प्रातर्विधीला लोक जातात, माझ्याकडे त्याचे फोटो आहेत. लोक प्रातर्विधीला जातात.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना इतिहासाची अतिशय चांगली कल्पना आहे. ते रायगडमधीलच आहेत, त्याबद्दल आणि त्यांच्या इतिहासाच्या ज्ञानाबद्दल आम्हाला आदर आहे. परंतु इतिहासाच्या नावाखाली काहीपण सांगायचे असे होता कामा नये. (अडथळा) मुद्दा असा आहे की, त्यांनी काही गोष्टी केल्या, सरकार त्यांच्या वतीने उत्तर देईल म्हणून मी तेथे बोललो नाही. परंतु जेव्हा तुम्ही बाकीचे काहीही बोलत असताना जीजाऊंच्या समाधीच्या येथे लोक प्रातर्विधीसुध्दा करतात हे बोलणे अतिशय चुकीचे आहे. असे आजिबात होत नाही. तेथे संपूर्ण समाधीच्या आजुबाजूला कम्पाऊंड आहे, तेथे स्वच्छता राखली जाते, दररोज तेथे व्यवस्थिपणे सगळ्या गोष्टी केल्या जातात, साफसफाई असेल, झाडी काढणे असेल सर्व गोष्टी त्या ठिकाणी व्यवस्थितपणने होतात. अलीकडच्या काळात तर दररोज ती काळजी घेतली जाते. सन्माननीय सदस्य 100 वेळा गेले की किती वेळा गेले हे मला सांगता येत नाही. वर्षातून अनेक वेळा मी तेथे जातो, त्यांना सुध्दा माहीत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनायक मेटे ....

आहे. अनेक गोष्टी आहेत. पण किमान राजमातांबद्दल किंवा महाराजांच्याबद्दल अन्य चुकीचे रेकॉर्ड असता कामा नये म्हणून माझी विनंती आहे की, किमान जीजामाता आणि या सगळ्याच्या संबंधात अशा पध्दतीचे रेकॉर्डवर येता कामा नये. (अडथळा) ....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य पुढचे बोलणे ऐकूनच घेत नाहीत. बोलणे ऐकण्याच्या अगोदरच बोलत आहेत. आज पाचाडमध्ये शौचालयासाठी परिस्थिती नाही. सार्वजनिक शौचालय नाही, पाचाडमध्ये पाणी नाही. मी या संदर्भातील फोटो जबाबदारीने पटलावर देतो. माझ्याकडे फोटो आले आहेत.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, दुरूस्तीची गरज आहे. पाचाडमध्ये पूर्णपणे शौचालये आहेत की नाहीत हा विषय नाही. आपण समाधीचा विषय आणता, तेव्हा तो विषय वेगळा येत आहे. त्यामुळे अशा पध्दतीचे बोलणे योग्य नाही. सन्माननीय सदस्यांसारख्या ज्येष्ठ माणसाकडून रायगडचे नाव घेऊन हे बोलणे शोभत नाही. त्यामुळे माझी हरकत आहे. सन्माननीय सदस्यांचे असे बोलणे रेकॉर्डमधून काढून टाकावे असे आपण निर्देश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलत पुढे येतात.)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सांगण्याचा उद्देश वेगळा आहे. (अडथळा) 40 कोटी रूपयांचा प्रश्न होता. सन्माननीय सदस्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा ठेका दिला आहे का ? (अडथळा) मी जबाबदारीने बोलत आहे. मी गेलेलो आहे. (अडथळा) मी तेथील सरपंचांचे आणि ग्रामस्थांचे पुरावे देतो. छत्रपती यांच्या ताब्यात देऊन टाकले आहेत का ?

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलत वेलमध्ये येतात.)

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझी हकरत आहे. राजमातांबद्दल बोलण्याच्या बाबतीत माफी मागितली पाहिजे. असे बोलणे योग्य नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मला हे काही कळत नाही. (अडथळा) मी कसली माफी मागणार ? आपणच माफी मागितली पाहिजे. तेथे सोय नाही म्हणून आपणच माफी मागितली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पाहिजे. माझी मागणी काय आहे, मी कशाला माफी मागू ? तेथे सोय करा असे म्हणणे आहे. (अडथळा) हे काय चालले आहे ?

....Z

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना मी सांगू इच्छितो की, आपला हरकतीचा मुद्दा मी स्वीकारलेला नाही. तथापि, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जे वक्तव्य केले आहे ते तपासून घेण्यात येईल आणि अयोग्य असेल ते काढून टाकण्यात येईल.

आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

(सत्तारुढ पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शासनाने त्या ठिकाणी पाण्याची सोय केली पाहिजे. पाचाड हे एक छोटे गाव असून तेथे पाचाड समाधी आहे.

(सत्तारुढ पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आपले भाषण पूर्ण करावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कृपया आपण मला संरक्षण द्यावे. यांना ठेका दिला आहे का ?

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्यांच्या भाषणात काही चुकीचे असेल तर ते रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

अशा परिस्थिती सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 4.42 ते 4.52 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( स्थापतीस्थानी माननीय उप सभापती )**

( सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांनी कृपया शांत बसावे. मी काहीही ऐकलेले नाही, काहीही बघितलेले नाही. आपण मला आसनस्थ होऊ द्यावे. त्यानंतर मी निर्णय देतो. आपण सर्वांनी जागेवर बसावे. आपण जागेवर बसल्याशिवाय मला निर्णय देता येणार नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आपण निर्णय देण्यापूर्वी आमचे म्हणणे ऐकून घ्यावे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, अनुभवी सदस्य श्री.जयंत पाटील साहेब आपल्या नेहमीच्या स्टाईलमध्ये भाषण करीत होते. आमचा त्याला आक्षेप नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नेहमीची स्टाईल म्हणजे काय ? हा आक्षेप आहे. नेहमीची स्टाईल असे म्हणणे चुकीचे आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मुद्दा असा आहे की, त्यांनी बोलताना मागील किती चुकीची उदाहरणे दिली यावर मी बोलणार नाही. परंतु, राजमाता जिजाऊ हे आपले दैवत आहे. रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी पाचाड येथे त्यांची समाधी आहे. पाचाड येथील समाधीच्या तेथे नाही, समाधीवर, तेथेच असा उल्लेख करुन, मी तो शब्द वापरणे म्हणजे ते पुन्हा रेकॉर्डवर येईल. माझ्या सारख्या माणसाचे जिजाऊ मातेवर अतोनात प्रेम आहे. म्हणून मी ते शब्द उच्चारु शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांनी ते शब्द उच्चारले आणि त्यांनी जिजाऊ मातेचा अपमान केलेला आहे. त्यामुळे ते शब्द रेकॉर्डवरुन काढण्याबरोबरच त्यांनी माफी मागितली पाहिजे. त्याशिवाय आम्ही सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही. आमची विनंती आहे की, आपण ते शब्द रेकॉर्डवरुन काढण्याचा निर्णय द्यावा आणि त्यांना माफी मागण्यास सांगावे.

**उप सभापती :** आणखी कोणाला काही बोलावयाचे आहे काय ?

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, त्यांनी प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधी संदर्भात सांगितले. त्यांनी सांगितले की, त्यांच्या वडिलांनी तेथे सुशोभिकरण केले. सन 1967 ते 1972 या कालावधीत तेथे काम सुरु केले. परंतु, सन 1972 मध्ये जिल्हा परिषदेत काँग्रेस पक्षाची सत्ता आली आणि तेथील प्रथा बंद झाल्या. काँग्रेस पक्षाची सत्ता आली आणि तेथील प्रथा बंद

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर.......

झाली, हे आम्ही समजू शकतो. त्यानंतर ती प्रथा सुरु झाली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यानंतर त्यांनी जे वक्तव्य केले त्या विधानावर सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी आक्षेप घेतलेला आहे. माझे असे म्हणणे आहे की, कदाचित चुकून होत असेल. परंतु, त्यांनी जिजाऊ राजमातेबद्दल जे वक्तव्य केले ते रेकॉर्डवर आलेले आहे. म्हणून त्यांनी माफी मागावी आणि महाराष्ट्रातील जनतेमध्ये चांगला संदेश जावा, अशी माझी विनंती आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय,....

**उप सभापती :** मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य बोलत असताना आपण मध्ये बोलू नये. प्रकरण गंभीर आहे. तुम्हाला जे बोलावयाचे आहे ते ऐकण्यासाठी मी येथे बसलेलो आहे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांचे भषण मी लक्षपूर्वक ऐकत होतो. त्यांचा जिजाऊ मातेचा अपमान करण्याचा उद्देश नव्हता. तेथे जिजाऊ मातेचा अपमान होतो, तेथे अशा प्रकारे घाण केली जाते, या उद्देशाने ते बोलले. आपण त्यांच्या बोलण्याचा उद्देश लक्षात घ्यावा.

( सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मला बोलू द्यावे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांचा जिजाऊ मातेचा अपमान करण्याचा उद्देश नव्हता. त्या ठिकाणी चोख व्यवस्था नसते, सफाई नसते, या उद्देशाने ते बोलले. तुम्हाला जिजाऊ मातेबद्दल प्रेम आहे आणि इतर लोकांना प्रेम नाही काय ? सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांनी सांगितले की,.....

**उप सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देत आहे. याचा अर्थ सभागृहात गोंधळ करावा, असा नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, अशा पद्धतीने बोलणे योग्य नाही.

**उप सभापती :** मी या संदर्भात निर्णय देतो.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आपण निर्णय द्यावा. तो आपला अधिकार आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांचा जिजाऊ मातेचा अपमान करण्याचा उद्देश नव्हता. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेबांना शिवाजी महाराज, जिजामाता यांच्या बद्दल जेवढा अभिमान आहे तेवढाच अभिमान आम्हाला सुद्धा आहे. परंतु, आमचा खेद असा आहे की, (...अडथळा...) अहो, मेटे साहेब आता आम्हाला बोलू द्यावे. का तुम्हालाच बोलता येते, आम्हाला बोलता येत नाही ? आपण कृपया शांत रहावे. मला काय म्हणावयाचे आहे ते आपण ऐकून घ्यावे. प्रत्येक वेळी तुम्ही बोलणार, मग आम्ही बोलावयाचे नाही काय ? याला काही अर्थ आहे काय ? या लोकांना खोटे बोलावयाचे पण रेटून बोलावयाचे ही सवय लागलेली आहे. जिजामाता आणि शिवाजी महाराजांविषयी बोलण्याचा तुम्ही लोकांनी ठेका घेतलेला आहे काय ? जिजामाता यांना काही तरी दूषण लागावे, असा त्यांच्या बोलण्याचा बिलकुल उद्देश नव्हता. परंतु, कोणता तरी इश्यू करायचा आणि सभागृहाचा वेळ वाया घालवायचा ? आपण अजिंठा, वेरुळ येथे गेलात तर तेथे लोक घाण करुन ठेवतात असे आपल्याला दिसेल आणि अशा ठिकाणी सुद्धा जे विद्रुपीकरण सुरु आहे, तेथे घाण करण्याचे प्रकार सुरु आहेत त्याकडे शासनाने लक्ष द्यावे. तेथे युरिनल नाहीत, टॉयलेट्स नाहीत, असे सांगण्याचा त्यांचा उद्देश होता. जिजामाता यांची ज्या ठिकाणी समाधी आहे त्या ठिकाणी अशा प्रकारे घाण होऊ नये. त्यांनी चांगल्या उद्देशाने सांगितले असताना यांच्या डोक्यात घाण आहे. त्यामुळे हे असे बोलत आहेत आणि हे स्वतःला जर का असे समजत असतील तर ते चुकीचे आहे.

...2B-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : हे नळावर येऊन भांडण्यासारखे चालू आहे, यासाठी दुसरी कोणतीही उपमा देता येणार नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, शिवाजी महाराज आणि जिजामाता हे सर्वांचे आराध्य दैवत आहेत. जिजामातेला सर्व लोक प्रामाणिकपणे मनापासून मानणारे आहेत. स्त्री जातीचा आमचा तो अभिमान सुध्दा आहे. या ठिकाणी उल्लेख करीत असताना त्यांनी पाचाड मध्ये स्वच्छतागृह नाही असे म्हटले असते, लोक बाहेर जातात असेही म्हटले असते तर त्याबाबत आमचा काहीही विरोध नव्हता. परंतु जिजामातेच्या समाधीच्या भोवताल कंम्पाऊंड असताना त्या ठिकाणी जाऊन कोणी शौचालय करेल किंवा त्या ठिकाणी जातील अशी परिस्थिती नाही. अशी तेथील वस्तुस्थिती आहे, म्हणून या ठिकाणी त्यांनी असे म्हटले की, समाधीच्या आजूबाजूला लोक शौचालयास जातात हा जिजामातेच्या समाधीचाच नव्हे तर जिजामातेचाच अपमान आहे. अशी वस्तुस्थिती नाही. हे शब्द मागे घेण्यात यावेत व त्यांनी जिजामातेची माफी मागावी अशा आमची मागणी आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.जयंत पाटील यांनी रायगड महोत्सवासाठी मंजूर झालेले 40 कोटी, प्रत्यक्षात खर्च झालेले 4 कोटी आणि तेथील त्या गावातील व समाधी स्थळाजवळील वास्तव आज काय आहे यासंदर्भात त्यांच्याकडे जी माहिती होती त्या माहितीच्या आधारे ते बोलत होते. त्याबाबत त्यांनी सभागृहाला जे सांगितले त्यामागची भावना आपण समजून घेतली पाहिजे. जेथे जिजाऊ मातांची समाधी आहे त्याला कंम्पाऊंड आहे, पण फक्त कंम्पाऊंड सुरक्षित करुन चालेले काय ? कंम्पाऊंडच्या आजूबाजूचा परिसर देखील तितकाच स्वच्छ राहिला पाहिजे. त्यासाठी त्या गावात स्वच्छतेची मोहिम घ्यायला पाहिजे. त्यासाठी निधी खर्च केला पाहिजे. असा त्यांचा सांगण्याचा हेतू होता. त्यांच्या मनात जिजाऊ मातेचा अनादर करण्याचा किंवा त्या समाधीचा अपमान होईल अशा पध्दतीचे कोणतेही व्यक्तव्य करण्याचा हेतू नव्हता. याउलट त्यांचा हेतू असा होता की, अशा प्रकारची त्या परिसराची परिस्थिती असेल तर त्याकडे सरकारने तातडीने लक्ष द्यावे. त्यामुळे अनावधाने तो उल्लेख झाला असेल तेवढे शब्द मागे घेऊन हा विषय संपवावा अशी मी आपणाला विनंती करतो.

....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जिजाऊ मातेच्या संदर्भात अपमानजनक काही बोलले असे माझ्या तरी ऐकण्यात आले नाही. पाचाड येथील जिजाऊ मॉ साहेबाच्या समाधीचे पावित्र्य कायम रहावे असा त्यांचा हेतू होता. हा हेतू लक्षात न घेता आपण उगीच त्याचे भांडवल करीत आहात. गोंधळ घालत आहात, सत्ताधारी पक्षाने असे करणे योग्य नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई यांना मी सांगू इच्छितो की, जिजाऊ मॉ साहेबांबाबत महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील प्रत्येक माणसाच्या मनामध्ये आदर आहे. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, महात्मा गांधी अशा सर्व थोर पुरुषांबाबत आदर आहे. मला असे म्हणायचे आहे की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील अत्यंत अनुभवी आहेत, अत्यंत पोटतिडकीने ते विषय मांडत होते. 40 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून त्यापैकी फक्त 4 कोटी रुपये खर्च केले आहेत. तरी देखील तेथे स्वच्छतेची व्यवस्था झालेली नाही. पाचाड येथील जिजाऊ मॉ साहेबांच्या समाधीचे पावित्र्य कायम राहावे अशीत त्यांची भावना होती ही बाब कृपया लक्षात घ्यावी.

**उप सभापती** : आता जो प्रकार या ठिकाणी चर्चेला गेला आहे. त्यासंदर्भात आपण सर्वांनी आपल्या भावना मांडल्या आहेत. यासंदर्भात मी एवढे सांगेन की, आपणा सर्वांच्या भावना मी समजून घेतल्या आहेत. माझी स्वतःची धारणा अशी आहे की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना खरोखर इतिहासाची जाणीव आहे, वर्तमानाची जाणीव आहे, त्यामुळे त्यांच्याकडून अशी एखादी घटना घडणार नाही यावर मी ठाम आहे. आपण म्हणत आहात की असे झाले तर एखाद्या वेळी स्लीप ऑफ टंक झाले असेल किंवा काही चूक झाली असेल तर आपल्यापैकी बऱ्याच वेळा कोणाकडूनही अशी चूक घडू शकते. याबाबत मी फार जास्त बोलणार नाही. जे काही घडले जे काही ऐकले, प्रत्यक्षात घडले किंवा नाही याची मला माहिती नाही. मी एवढे सांगतो की, प्रत्येकाने भावना वेगवेगळ्या भावना मांडल्या आहेत. येथील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना संमिश्र आहेत, यामध्ये एक निश्चित आहे की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी आदरणीय जिजामाता यांचा अपमान व्हावा अशा प्रकारचे कोणतेही वक्तव्य मुद्दाम केलेले नाही, किंवा तसे काही झालेले नाही. मी एवढेच सांगेन की आपणातील काही सन्माननीय सदस्यांची तशी भावना असेल तर मी सभागृहात उप सभापती या नात्याने झालेल्या घटनेबाबत खेद व्यक्त करतो, जर तसे

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती...**

काही झाले असेल तर मी स्वत: त्या गोष्टींची क्षमा मागतो. या विषयावर आता निश्चितपणे पडदा पडलेला आहे. या विषयावर आता चर्चा होणार नाही.

(सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे वेलमध्ये येऊन बोलत असतात)

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, ते वक्तव्य रेकॉर्डवरुन तरी काढून टाकण्यात यावे.

**उप सभापती** : मी सांगितले आहे की, असे खरोखर घडले असेल तर मी क्षमा मागतो. परंतु जे झालेच नसेल.

श्री.विनायक मेटे : त्यांनी क्षमा मागितलेली नाही, तुम्ही क्षमा मागत आहात. ते वाक्य रेकॉर्डवरुन तरी काढून टाकण्यात यावे.

**उप सभापती** : मी क्षमा मागितली हे मी रेकॉर्डवर बोललो आहे, त्यामुळे ते काढून टाका, विषय संपला.(....अडथळा...) मी त्यांना सांगितले आहे, पहिली गोष्ट अशी आहे की, अशा प्रकारचे वक्तव्य त्यांनी केले असेल तर काढून टाकू, वक्तव्य केले नसेल तर विषय संपला. मी रुलिंग दिलेले आहे, त्यावर आता चर्चा करु नका.

-----------

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु...

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न हा गेली अनेक वर्षे प्रलंबित आहे. या शासनाने जम्म काश्मिर उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश मनमोहन सरीन यांची नेमणूक केली. त्यानंतर यापुढे कोणतीही कार्यवाही झालेली नाही. या दीड वर्षात सीमावासियांच्या नेते मंडळीशी सरकारने कधीही चर्चा केलेली नाही. यासाठी माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांना समन्वयक नेमले आहेत, त्यांनी देखील बैठक बोलविली नाही. संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या पाठीमागे आहे असा सीमावासिय जनतेला विश्वास वाटला पाहिजे. सभागृहात आपण नेहमी त्यांना पाठिंबा देण्याचे वक्तव्य करतो, ठराव करतो. परंतु सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेला खटल्याला गती देण्याचे काम शासनाकडून अजूनपर्यंत होत नाही. गेल्या वर्षी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात जो उल्लेख करण्यात आलेला होता त्याचीच पुनरावृत्ती आताच्या अभिभाषणात करण्यात आलेली आहे. यामध्ये नवीन असे काहीही नाही. वर्षभराच्या कालखंडात महाराष्ट्राचे तुकडे पाडण्याच्या गोष्टी काही लोक करीत आहेत. महाराष्ट्र वेगळा करण्याचा काही लोक प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे सीमावासिय लोकांच्या मनात संभ्रम निर्माण झालेला आहे.

या नंतर श्री.सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील ......

जो महाराष्ट्र आहे तो फुटत आहे, यामुळे आम्हाला कोण न्याय देणार ? माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या निमित्ताने राज्य शासनाकडून आम्हाला असे आश्वासन पाहिजे की, हा महाराष्ट्र अखंड राहील, या महाराष्ट्राचे तुकडे होणार नाहीत आणि उर्वरित महाराष्ट्र बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर असा संपूर्ण महाराष्ट्र एक झाल्याशिवाय खरा महाराष्ट्र होणार नाही अशी महाराष्ट्रातील जनतेची भावना आहे. 106 हुतात्म्यांनी ज्यांच्यासाठी मुंबईत रक्त सांडले, त्यांच्यासाठी ही खरोखर श्रध्दांजली होईल. राज्य शासनाच्या वतीने ज्यांना अधिकार दिले तेच आपल्याबरोबर बोलतात किंवा इतर न्यायालयीन प्रक्रियेच्या वेळी वेगळे बोलत असल्यास त्यांना समज देण्यात यावी.

सभापती महोदय, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाभोवती 30 स्मार्ट नगरे उभी राहणार आहेत. नैनाच्या देखरेखीखाली त्यांची संपूर्ण निर्मिती होणार आहे. याबाबत राज्य शासनाकडून कधी सांगितले जाते की यासंबंधी सिडकोने जबाबदारी घेतली तर कधी सांगितले जाते की, एमएसआरडीएने जबाबदारी घेतली. मी काल एमएसआरडीएचे मंत्री माननीय श्री.शिंदे यांना विचारले असता त्यांनी मला सांगितले की, याबाबत आमच्यावर संपूर्ण जबाबदारी नाही. शासनाचे यासंबंधी धोरण ठरलेले नाही. अशा परिस्थितीत तेथील जमिनी घेण्यासाठी शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांच्या बाबतीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोठेही उल्लेख असल्याचे मला दिसून आले नाही. माझ्या मनात असा संभ्रम निर्माण होत आहे की, तेथे 600 चौरस किलामीटरच्या परिसरात पेणपर्यंत व इकडून खोपोली व कर्जतपर्यंतचा संपूर्ण परिसर नैनाच्या कार्यक्षेत्रात येणार आहे. परंतु यासंबंधीचे धोरण आणि स्पष्टीकरण खऱ्या अर्थाने स्पष्ट होत नाही.

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी त्यांच्या भाषणात असा उल्लेख केला होता की, पंतप्रधान सडक योजना जावून मुख्यमंत्री सडक योजना जाहीर झाली आहे. राज्य शासनाच्या निधीतून मुख्यमंत्री सडक योजनेची अंमलबजावणी केली जाते. परंतु पंतप्रधान सडक योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या निधीतून होते. केंद्र शासनाकडून येणारा लाखो, करोडो रुपयांचा निधी थांबला आहे. केंद्र शासन आपली फसवणूक करीत आहे. तत्कालीन पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी पंतप्रधान सडक योजनेच्या निमित्ताने ग्रामीण भागात व डोंगरी भागाकरिता

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील ......

धोरण जाहीर केले होते. आमच्या कोकणात ज्या ठिकाणी रस्ते नव्हते, तेथे 10 ते 15 कि.मी. पर्यंत रस्ते नेण्यात आले. परंतु निधीअभावी सदर कामे थांबली आहेत. पंतप्रधान सडक योजनेसाठी निधी देण्याकरिता आपल्या राज्याच्या अर्थसंकल्पात आर्थिक कुवत आहे असे मला वाटत नाही. ही गोष्ट विचारात घेता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पंतप्रधान सडक योजना सुरु करण्याचा आग्रह धरला पाहिजे. निधीअभावी अनेक योजना बारगळल्या आहेत.

सभापती महोदय, केंद्र शासनाच्या पेयजल योजनेअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात 100 कोटी रुपये, 200 कोटी रुपये, 300 कोटी रुपयांची कामे होत होती. परंतु राज्यात सध्या सदर योजनेची दैनावस्था आहे. राज्यात राष्ट्रीय स्वजल योजनेमार्फत सुरु असलेली कामे बंद पडली आहेत, त्या कामांची करोडो रुपयांची बिले मिळालेली नाहीत. या संदर्भात एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची देणी शिल्लक आहेत.. राज्य शासनाच्या अर्थसंकल्पात त्यासाठी 400 ते 500 कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीची तरतूद करण्याची क्षमता आहे असे मला वाटत नाही. या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोणतेही आश्वासन दिलेले नाही. दुष्काळी भागात यापेक्षा वाईट परिस्थिती आहे. दुष्काळी भागांमध्ये पाण्याचे स्त्रोत कोठून आणायचे, हा मूळ प्रश्न आहे. मला खेद वाटतो की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये महाराष्ट्रातील जनतेला पाणी पुरवठ्याचे कोणतेही आश्वासन दिलेले नाही.

सभापती महोदय, शेतीकरिता चांगल्या पध्दतीने आणि सक्षम रितीने कर्जपुरवठा केला जाईल असा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख आहे. परंतु शेतकरी नियमित घेतलेल्या कर्जाची रक्कम फेडू शकत नाही, अशी सध्या त्यांची परिस्थिती आहे. जोपर्यंत स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्या जात नाहीत, आपल्या जाहीरनाम्यात यासंबंधी उल्लेख करण्यात आला होता. आपण शेतकऱ्यांच्या घरोघरी जाऊन सांगत होता की, आम्ही सत्तेवर आल्यानंतर स्वामीनाथन आयोगाची 100 टक्के अंमलबजावणी करु. त्यात शेतकऱ्यांना 50 टक्के नफा मिळण्याचे सूत्र आहे. त्या सुत्राची अंमलबजावणी करु. शिंदे साहेब, आपल्या मतदार संघातील काही तालुक्यांमध्ये दुष्काळी भाग आहे. मी त्या ठिकाणी आलो होतो. माननीय मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सर्व भागात इंडस्ट्री आहेत, यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या कर्जाची

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामराव वडकुते )**

श्री.जयंत प्र.पाटील ......

पुनर्गठन करण्याची गरज नाही. शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करुन पुढील वर्षी शेतकरी कशा पध्दतीने कर्ज फेडीन, या संबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोठेही उल्लेख नाही. याचा अर्थ आपण शेतकऱ्यांची फसवणूक करीत आहोत. शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करुन व त्यांना पुन्हा कर्ज देवून त्यांचे कर्ज फिटणार आहे का ? यामुळे आताच त्यांना कर्जमाफी दिली पाहिजे. मला असे वाटले होते की, या अधिवेशनाच्या निमित्ताने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कर्जमाफीची घोषणा केली जाईल, परंतु तसे घडले नाही. सभापती महोदय, मी एक बँकर आहे. मी पुढे बँकर राहीन की नाही, हे माहीत नाही. माननीय श्री.चंद्रकांतदादा पाटील, मी आणि भाऊसाहेब गेलो होतो. परंतु मी एक यशस्वी बँकर आहे असे मला वाटते. सध्या जिल्हा बँकांकडून 70 टक्के आणि राष्ट्रीयकृत बँकाकडून 30 टक्के कर्ज दिले जाते. माननीय नाथा भाऊंनी सदनात रिप्लाय दिल्यानंतर मी बँकेत फोन करुन विचारले की, आपल्या जिल्ह्यात राष्ट्रीयकृत बँकाचे किती कर्ज आहे, त्यावर मला सांगण्यात आले की, 30 टक्के कर्ज आहे. तेथे सोने तारणावर कर्ज दाखविण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी एफ.डी.वर घेतलेले कर्ज, शेती कर्ज म्हणून दाखविण्यात आले आहे. अशा प्रकारची बोगस व फसवेगिरी थांबवली पाहिजे. त्यांनी आम्हाला सांगितले की, आम्ही राज्य शासनाचे काही ऐकणार नाही, आम्ही आर.बी.आय.चे म्हणणे ऐकणार. आम्ही आर.बी.आय.च्या आदेशानुसार कार्यवाही करणार आहोत. आर.बी.आय.चे गव्हर्नर सांगतात की, राज्य शासन आम्हाला कोणतेही आदेश देवू शकत नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात यासंबंधी कोणताही उल्लेख नाही. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, या संदर्भात आर.बी.आय.चे गव्हर्नर आणि केंद्रीय अर्थमंत्र्यांसमवेत चर्चा करुन राष्ट्रीयकृत बँकांना महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीसाठी खास बाब म्हणून कार्यवाही करण्याबाबत आदेश दिले पाहिजेत.

यानंतर DD-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

त्या पध्दतीचे आदेश देऊन शेतकऱ्यांना तातडीने मदत पोहोचविली पाहिजे. कोकणाला 720 कि.मी.चा समुद्र किनारा लाभला आहे. त्या समुद्र किनाऱ्याच्या ठिकाणी सुरक्षितता आणि पर्यटन या दृष्टीने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख केलेला आहे. सन 2015 च्या अभिभाषणात देखील मच्छीमारांच्या दृष्टीने कोकणात खास बंदरे उभी केली जातील, जेट्टी बांधल्या जातील, शीतगृहे उभारली जातील असा उल्लेख केलेला होता. गेल्या वर्षभराच्या काळात कोकणात एकही शीतगृह उभारले गेले नाही किंवा एकही जेट्टी बांधली गेली नाही ही वस्तुस्थिती आहे. समुद्र किनाऱ्याच्या दृष्टीने कोणतीही सुरक्षितता नाही. सुरक्षिततेच्या दृष्टीने गस्तीसाठी खरेदी केलेल्या बोटी किनाऱ्यावर उभ्या केल्या आहेत, त्यासाठी पेट्रोलचा खर्च दाखविला जातो. अधिकारी त्या बोटी वापरत असतात. या संदर्भात कोणत्याही गोष्टीचे नियोजन केलेले नाही. बजेटच्या वेळी मी या विषयावर बोलणार आहे. खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांवर सरकारचा प्रभाव असल्याचे कुठेही दिसून येत नाही.

सभापती महोदय, गेल्या वर्षीच्या अभिभाषणामध्ये जी काही आश्वासने दिली होती, त्या करिता तरतूद करण्यात आली होती त्या आश्वासनांची पूर्तता झालेली दिसून येत नाही. प्रत्यक्ष बजेट सादर होईल तेव्हाच आम्हाला कळेल. वृत्तपत्रातून आम्हाला वाचायला मिळते की, सरकारचा बजेटमधील तरतुदींपैकी फक्त 42 टक्के खर्च झाला आहे. त्यापैकी प्रत्यक्षात किती रक्कम वेतनावर व विकास कामांवर खर्च झाली याची माहिती आम्हाला कळून येत नाही. बजेट मांडले जाईल त्यावेळी आम्ही निश्चितपणे या बाबत भूमिका मांडणार आहोत. जिल्हा परिषदेच्या बजेटबाबत आम्हाला तरतूद व खर्च याची सूची मिळते, त्याप्रमाणे गेल्या वर्षी किती तरतूद होती आणि प्रत्यक्ष खर्च किती झाला याची माहिती आमच्यासारख्या सर्वसामान्य आमदारांना मिळाली पाहिजे यासाठी मी अर्थमंत्र्यांना विनंती केली आहे. बजेटची आकडेवारी आमदारांना कळण्याच्या दृष्टीने सुटसुटीत असली पाहिजे, एवढे बोलून मी अत्यंत खेदाने व नाराजीने या अभिभाषणावरील माझ्या भाषणाचा समारोप करीत आहे.

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संदर्भात सभागृहात चर्चा सुरु आहे, त्यामध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या राज्यात मराठी भाषेचा सन्मान करायचा असे आपण सगळयांनी ठरविले आहे. राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणाच्या मराठी व इंग्रजी भाषेतील प्रती माझ्या हातामध्ये आहेत. इंग्रजी प्रतीवर लिहिले आहे की, "ADDRESS Delivered by Hon'ble Shri Ch.Vidyasagar Rao GOVERNOR OF MAHARASHTRA आणि मराठी भाषेतील प्रतीवर "महाराष्ट्राचे राज्यपाल माननीय श्री.चे.विद्यासागर राव यांचे अभिभाषण" असा उल्लेख आहे. हे भाषण तयार करणारे मराठी भाषा विभागाचे जे कोणी प्रतिनिधी असतील त्यांनी कृपया आमच्यासारख्या सामान्य मराठी बांधवांसाठी भाषण आणि अभिभाषण यातील फरक काय आहे हे स्पष्ट करुन सांगावे.

सभापती महोदय, गेली अनेक वर्षापासून परंपरा होती. त्यानुसार महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वाद आणि मराठी भाषा या दोन मुद्यांचा क्रमांक अभिभाषणामध्ये शेवटून दुसरा-तिसरा असायचा. त्यात आम्ही काहीतरी बदल करीत आहोत, नवीन करण्याचा प्रयत्न करीत आहोत असे दाखविले आहे. त्यामुळे त्या क्रमांकामध्ये बदल होऊन आता थेट हे विषय पहिल्या 5-6 मुद्यांमध्ये येतील अशी रचना केली गेली आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागाच्या संदर्भात यापूर्वी अनेक वक्त्यांनी भाष्य केले आहे. या विषयाचे महत्व काय आहे तसेच पूर्वीचे शासन काय करीत होते, आताचे शासन काय करीत आहे याकडे सगळयांचे लक्ष असते. विशेषत: सीमा भागात राहणाऱ्या मराठी माणसांचे अधिक लक्ष असते. या ठिकाणी जणू काही एखादा वृत्तांत लिहावा असे लिहिले आहे. 'महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वादाबाबत माझे शासन गंभीर व संवेदनशील आहे. भारताच्या सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाने 12 सप्टेंबर, 2014 रोजी झालेल्या न्यायालयीन प्रकरणाच्या सुनावणीअंती दाव्यातील साक्षीपुरावे नोंदविण्यासाठी न्यायालय आयुक्त म्हणून मनमोहन सरीन, माजी मुख्य न्यायाधीश, जम्मू-काश्मीर उच्च न्यायालय यांची नियुक्ती केली आहे. कर्नाटक राज्याच्या वादग्रस्त सीमा भागातील मराठी जनतेची समस्या प्रभावीपणे सोडविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम आणि सहकारमंत्री यांची समन्वयक म्हणून नेमणूक केली आहे.' हे एक इतिवृत्त झाले.

सभापती महोदय, नवीन सरकारने या राज्याची सूत्रे स्वीकारल्यानंतर अठरा महिने झाले. या प्रश्नाची सोडवणूक न्यायालयीन मार्गाने ज्या पध्दतीने व्हायची त्या प्रक्रियेतून होईल, परंतु आज

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

16-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) DD.3

SGB/ AKN/ AKN/ KTG/ AKN/ ST/ 17:20

श्री.हेमंत टकले......

या सीमा भागात राहणाऱ्या मराठी माणसांची गळचेपी होत आहे. त्यांना शिक्षणामध्ये अडचणी येत आहेत. त्यांच्यावर अन्याय केला जातो. महाराष्ट्र वारंवार ज्या बेळगावची मागणी करीत आहे, त्या बेळगाव शहराच्या महानगरपालिकेचे महापौर पद सातत्याने मराठी माणसाकडे येत आहे, हे वारंवार सिध्द झाले आहे. हाही एक पुरावा म्हणून आपल्याला घ्यावा लागेल. त्याचवेळी ज्या प्रकारची दडपशाही कर्नाटक राज्याकडून होत आहे त्या दडपशाहीचा तेथील मराठी बांधवांना जो त्रास होतो तो कमी करण्यासाठी कोणतीही उपाययोजना सरकारच्या माध्यमातून राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दृष्टीस येत नाही.

सभापती महोदय, हा सीमा भागाचा प्रश्न सोडवित असताना आज कर्नाटकाच्या सीमेवर असलेल्या सांगली आणि परिसरातील काही उद्योग कर्नाटकात स्थलांतरित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही शक्यता का निर्माण झाली? एकीकडे आपण म्हणतो की, तेथे आपल्या मराठी बांधवांवर अन्याय होतो. त्याचवेळी कर्नाटक भागातील मराठी बांधव महाराष्ट्रात येऊन सांगतात की तुम्ही येथील उद्योग तिकडे घेऊन जा. या पलीकडे जाऊन आपल्या सीमावर्ती भागातील एका गावाने चक्क मागणी केली की, आमचे गाव महाराष्ट्रातून वगळून कर्नाटकामध्ये सामील होण्यास आम्हाला परवानगी द्यावी. हे राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणाचे द्योतक आहे. आपला प्रश्न आपल्याला सोडविता येत नाही. आपल्याच लोकांना आपण काही मदत करु शकत नाही. मग सीमा भागातील मराठी बांधव तुमच्यावर विश्वास कसा ठेवणार? सीमा भागातील मराठी बांधवांची मने या मातीशी जोडली असतील तर त्यांची संस्कृती, त्यांचे शिक्षण, त्यांचे खेळ, परस्पर संबंध या सगळयांचा सामाजिक जाणिवेतून विचार करण्याची आवश्यकता आहे. केवळ कोर्टाच्या निर्णयाने माणसे एकत्र येऊ शकत नाहीत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंतर 2 इ.1....

श्री.हेमंत टकले....

आपण आंदोलनाला मोठ्या प्रमाणावर महत्व देतो पण ते चिरडून टाकण्यासाठी कर्नाटक सरकारकडून वारंवार प्रयत्न केले जातात. एवढेच कशाला आपल्याकडे विधानमंडळाचे एक सत्र नागपूरला घेतले जाते. त्याच धर्तीवर कर्नाटकातून बेळगाव जाऊ नये म्हणून बेळगाव येथे विशेष विधान भवन बांधून तेथे वर्षातून एकदा विधान मंडळाचे अधिवेशन घेण्याचे काम कर्नाटक सरकारने सुरू केलेले आहे. एका बाजूने कर्नाटक सरकार या भागावरील आपला हक्क न सोडण्यासाठी अतिशय सक्षमपणे पावले टाकत आहे. असे असताना आपल्याकडून तेथील लोकांसाठी काहीच प्रतिसाद मिळत नसेल तर हा प्रश्न सुटणार कसा ? ही एक फार महत्वाची बाब माननीय राज्यपांच्या अभिभाषणातून स्पष्ट होत नाही. आताच सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील म्हणाले त्याप्रमाणे म्हणता येईल की, आपण जेवढे काही तांत्रिक आहे त्याचा उल्लेखच माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये समाविष्ट करतो. पण प्रत्यक्षात आपल्या मनामध्ये तशी खरोखर इच्छा आहे काय, त्या निमित्ताने आपण काय पावले टाकली आहेत किंवा कोणती पावले टाकण्याचे येत्या वर्षातील नियोजन आहे यासंबंधातील कुठलेही वक्तव्य किंवा कुठलाही संबंध या भाषणातून येत नाही.

आपण मराठी भाषेचा उदोउदो अत्यंत मोठ्या प्रमाणावर करीत आहात. मागील सरकारने काहीच केले नाही, आम्ही किती करतो आहोत हे जे काही दाखविण्याचा आपला जो भाग तो आपण सोडून देऊ या. त्यावर बोलण्यात फार काही अर्थ नाही. आपण मराठी भाषा भवन हे रंगभवन येथे बांधणार होता. रंगभवनमध्ये त्यासाठीची सर्व तयारी झाली होती. मराठीसाठी निधी कमी पडू देणार नाही असे वारंवार सांगण्यात येते. पण नंतर असे लक्षात आले की, रंगभवनमध्ये ते बांधणे सोयीचे नाही. त्यामुळे ते आता बीकेसीमध्ये घेऊन जाण्याचा प्रयत्न सुरूआहे. आता ते तेथे जाणार केव्हा, मराठी भाषा भवन बांधणार कधी. या सगळ्या मागे कुठे तरी इच्छा शक्ती लागते त्याचा अभाव दिसत आहे. या सगळ्या गोष्टी समाधान करण्यासाठी बोलावयाच्या असतील तर त्याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता आलेली आहे. आपण मराठीचा राजभाषा म्हणून स्वीकार केला आहे. पण अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठीचा जो भाग आहे त्याबाबतीतही

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

आपले पाऊल पुढे पडलेले नाही ही अतिशय दुर्दैवी गोष्ट आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी आम्ही सर्व प्रकारचे प्रयत्न करू व त्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या आम्ही पुरवू असा उल्लेख असेल असे आम्हाला वाटले होते. परंतु, तसे काही घडलेले नाही. आपण फकत एक समिती नेमली. त्या समितीने अहवाल दिला आहे. मराठी भाषा किती जुनी हा इतिहास सांगितला आहे. अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त करण्यासाठी ज्या काही शर्ती आणि अटी असतात त्या आपण पूर्ण केल्या पाहिजेत. आपण नेहमी सांगतात की, एका राज्याने दुसऱ्या भाषेसाठी केलेली मागणी व त्यासाठी ते राज्य कोर्टात गेल्यामुळे आपला हा प्रश्न अडकून पडलेला आहे. जसे सीमावादाचे तसेच आपण मराठी भाषेच्या विकासाचे घोंगडे भिजत ठेवणार आहात काय अशी शंका निर्माण करणारा हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी त्यांच्या विवेचनात सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक या गोष्टींचा उल्लेख केला. कारण याच्या पुढचा सगळा भाग हा या गोष्टींशी निगडित असा आहे. आपण बघतो की, सरकार बदलले की विचार देखील बदलतात. कारण प्रत्येकाचे विचार हे वेगळे असतात. आदरणीय श्री.नरेंद्र मोदी यांचे केंद्रात सरकार आले. पूर्वी पंरपरेने चालत असलेली नियोजन मंडळाची व्यवस्था मोडित काढण्यात आली. त्या जागी नीती आयोग आणला. त्याच धर्तीवर आपल्या राज्याने आपल्या पंचवार्षिक योजना किंवा आपले नियोजन मंडळ यामध्ये काय फरक केले आहेत, आर्थिक नियोजनासाठी नवीन कोणती पद्धती आणली आहे याचा कुठेही उल्लेख नाही. त्यामुळे आपल्या नियोजनाची दिशा काय आहे, या नियोजनावर आपल्या राज्याची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक दिशा ठरणार आहे. कारण आपले राज्य हे लोककल्याणकारी राज्य म्हणून गणले जाते. सामान्य माणसांच्या रोजच्या गरजांचे प्रश्न, पाण्याचे प्रश्न, रस्त्याचे प्रश्न, शिक्षणाचा प्रश्न, आरोग्याचा प्रश्न या सगळ्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आर्थिक नियेजन करणे गरजेचे आहे. त्यासाठी आपण कोणती पद्धती स्वीकारणार आहात हा महत्वाचा प्रश्न आहे. यासाठी कुठली पद्धती असावयास पाहिजे त्यावर आपण जनमत घेतले आहे काय ? यामध्ये

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

मला आणखी गंभीर धोका दिसत असून तो सभागृहाच्या समोर आणावयाचा आहे. तो असा आहे की, सन 1991 पासून आर्थिक स्वातंत्र्याचे वारे सुरू झाले. खाजगी करणाचे वारे सुरू झाले. त्या बरोबरच आता फार परवलीचा आणि आवडीचा असा आऊस सोर्सींग हा शब्द झालेला आहे. बऱ्याच गोष्टी सरकार करीत नाही, त्या आऊट सोर्सींगद्वार करण्यात येतात. अशा प्रकारचा उपक्रम आता फार वेगाने पुढे जात आहे. जी शासन यंत्रणा वर्षानुवर्षे काम करीत आहे त्या शासन यंत्रणेतील म्हणजे मंत्रालयातील जबाबदार वरिष्ठ अधिकारी म्हणजे मुख्य सचिव, प्रधान सचिव या सगळयांचे काम सुरू असताना माननीय मुख्यमंत्र्यांच्या खात्यांसह सर्व खात्यांमध्ये सगळीकडे वेगळ्या मार्गाने तज्ज्ञ लोकांची नेमणूक करण्याचा मोठा प्रघात सुरू झालेला आहे. पूर्वी आपण काय बघत होतो ? खूप चांगल्या निवृत्त अधिकाऱ्याला मग तो पाटबंधारे, गृह खात्यातील असू द्यावा किंवा अन्य खात्यातील असू द्यावा. त्याचा अनुभव चांगला असल्यामुळे त्याला सल्लागार म्हणून नेमण्यासाठी परत आमंत्रित करण्यात येत असे. पण आता तसे राहिलेले नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या कार्यालयातील कामकाजासाठी नवीन आकृतीबंध तयार केलेला आहे. त्यामुळे राज्यातील प्रशासकीय यंत्रणेवर कोणते परिणाम झाले आहेत, तो खरोखरी उपयोगी आहे किंवा नाही याचा विचार केला पाहिजे. या राज्याला पुढे नेण्यासाठी आपण जे जे काही करणार आहोत त्याचे प्रतिबिंब पडण्यासाठी जर अशा नवीन माणसांचा उपयोग करून घेण्यात येणार असेल तर त्याचे निश्चित असे स्वरूप काय आहे हे कळले पाहिजे. यामुळे पारदर्शकतेचा प्रश्न निर्माण होतो. या सगळ्या कामांमध्ये सर्व प्रशासकीय यंत्रणेने मनापासून सहभाग घ्यायला पाहिजे. त्यांच्या मनामध्ये आपण काहीही केले तरी त्याचा उपयोग नाही अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होऊ देता कामा नये. आता संबंधित शासकीय यंत्रणेमध्ये बाहेरच्या लोकांचा प्रभाव पडणार आहे. त्यामुळे आपल्याला यामध्ये काही काम करण्याचे राहिलेले नाही. त्यामुळे कदाचित त्यांच्याकडून या विषयाशी अपेक्षित असलेली बांधिलकी कमी होण्याची फार मोठी शक्यता आहे. याची उदाहरणे

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

आपण बघत आहोत. दुष्काळाच्या प्रश्नावर सर्व मंत्रिमंडळ प्रत्येक तालुक्यामध्ये जाऊन बैठका घेते. त्यानंतर मग आढावा घेण्यात येतो. चाराच उगवला नाही तरी देखील चारा उपलब्ध आहे म्हणून चारा छावण्या बंद कराव्यात असे जेव्हा जिल्हाधिकारी सांगतो ते आपण सर्व मानतो. त्याप्रमाणे आपण निवेदन देखील करतो. हे काय दर्शविते ? यामुळे या शासनाला दुष्काळात सापडलेल्या माणसांना काही मदत करायची आहे किंवा नाही याबद्दल एक प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये याबद्दलचा उल्लेख
असण्याची अतिशय आवश्यकता होती. नव्हे या राज्यावर आलेले हे दुष्काळाचे संकट अभूतपूर्व आहे. पाणी संपलेले आहे. या संकटाचा मुकाबदला करण्यासाठी आपण काय करणार आहोत, याचे दिशादर्शन अपेक्षित होते. दुर्दैवाने ते यामध्ये कुठेही दिसत नाही. गेल्या दीड वर्षातील आपण सर्व वाटचाल बघितली तर हे सरकार काय करीत आहे हे लक्षात येईल. हे सरकार घोषणा बाज आहे असे मी म्हणणार नाही. पण प्रत्येक गोष्टीचा काही तरी एव्हेंट केला जातो. आता एव्हेंट करणे याला मराठीमध्ये नक्की काय म्हणायचे हे मला देखील शोधून काढावे लागेल. त्या एव्हेंटचा बँडबाजा मोठ्याने वाजवायचा. या सगळ्या गोष्टींचे उत्सव करायचे.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

राज्याची मूलभूत नैसर्गिक संपत्ती किती आहे त्याचे आपण ऑडीट केले आहे काय ? राज्यात किती पाणी आहे, किती जमीन आहे, किती लोक शेतीवर अवलंबून आहेत, शेतीला जोडधंदा देण्यासाठी कोणती साधने उपलब्ध आहेत, ती आपण कशाप्रकारे उपलब्ध करुन देणार आहात ? आपण एक चौकट घालून देतो की, जिल्हा बँकेने कर्ज पुरवठा करावा. राष्ट्रीयकृत बँकांनी 30 टक्के कर्जपुरवठा करावा. त्यांच्याकडे पैसे नसतील तर ते देणार नाहीत. मग रिझर्व्ह बँकेचे काही तरी म्हणणे येते अशाप्रकारचे असंख्य अडथळे आहेत. शासन चालविताना केवळ अडथळ्यांची शर्यत असते. एखाद्या ठिकाणी खूप गाड्या जमल्यानंतर वाहतुकीची कोंडी व्हावी आणि आपली गाडी काढण्यासाठी रस्ता मिळू नये तशाप्रकारचा रस्ता हरवलेली दिशा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात जाणवते.

सभापती महोदय, या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक झाले पाहिजे असा उल्लेख झाला. महात्मा गांधीची 150 वी जयंतीबाबत उल्लेख झाला त्यावरुन बरीच चर्चा झाली. माननीय पंतप्रधानांनी अनेकदा सांगितले आहे किंवा जगामध्ये सर्वजण म्हणतात की, पुढील 15-20 वर्षात जगात सर्वात तरुणांची संख्या असलेला देश भारत असणार आहे. तेव्हा आपणास सन 2020 पर्यंत अर्थसत्ता बनण्यासाठी या तरुणाईचा जास्तीत जास्त वापर करुन घ्यायचा आहे. या तरुणाईला समोर ठेवून आपण कोणत्या प्रकारचे कार्यक्रम आखले, त्यांच्यासाठी काय केले आहे ? आपण कौशल्य विकासावर फार भर देत आहोत. कौशल्य विकासासाठी 500 लोकांबरोबर करार झाले असे सांगण्यात आले. आपण नेमकी कोणती कौशल्य विकसित करणार आहोत ? मेक इन इंडिया आणि मेक इन महाराष्ट्राची घोषणा करण्यात आली. या योजनांचे छोट्या उद्योजकांना व व्यावसायिकांना काय फायदे आहेत याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कुठेही दिसत नाही. या सर्व योजनांचा लाभ जे मोठे उद्योगसमूह आहेत त्यांना मिळण्याची सोय होते.परंतु छोटा उद्योग आणि छोटा व्यापार करणाऱ्यांना यामधून काहीही हाती लागत नाही. त्यामुळे आर्थिक नियोजन करताना आपण नेमका कोणता वर्ग समोर ठेवत आहोत याबद्दलची स्पष्टता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये असंख्य योजना दिलेल्या आहेत.त्यामध्ये प्राचीन शास्त्रांच्या अध्यापनास व उपयोजनेस चालना मिळण्यास आणि त्यांचे विनियमन करण्यास मदत होणारे "महाराष्ट्र योग व निसर्गोपचार विधेयक" मांडण्याचा शासनाचा विचार आहे असे सांगितलेले आहे. योग आणि निसर्गोपचार याला प्रॉयॉरिटीची गरज आहे काय? या देशातील किंवा आपल्या राज्यातील आरोग्य व्यवस्थेला मुळात कशाची गरज आहे हे जाणून घेतले पाहिजे. आपण येथे मोठ्या अभिमानाने सांगता की, एका रुग्णालयात किडनी ट्रान्सप्लान्टची शस्त्रक्रिया यशस्वी झाली. परंतु महाराष्ट्रात किडनीच्या विकाराने किती लोक आजारी आहेत, किती लोकांना डायलेसीसची गरज आहे, याची माहिती घेणे आवश्यक आहे. आपल्याकडे एक किडनी ट्रान्सप्लान्टची केस यशस्वी झाली म्हणून स्वतःची पाठ थोपटून घेणार असाल तर ती खरोखर दुर्दैवाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" ही तर निव्वळ धूळफेक आहे. यामधून काहीही साध्य होत नाही हे आपल्या लक्षात आलेले आहे. पूर्वी केंद्र सरकारकडून हिंदी भाषा पंधरवडा साजरा करण्याचे परिपत्रक यायचे. मग आपण आठ दिवस हिंदी बोलण्याचा प्रयत्न करायचो. या सर्व गोष्टी दिखावू आहेत. या दिखावू गोष्टीतून आपणास केव्हा बाहेर पडता येईल या बाबतीतील काहीही नियोजन या अभिभाषणामध्ये दिसत नाही. आपण या सर्व गोष्टी पाहतो त्यावेळी आपल्या असे लक्षात येते की, राज्यात सुरक्षितेचे प्रश्न, महिलांचे प्रश्न, अल्पसंख्याकाचे प्रश्न, मागासलेल्यांचे प्रश्न अपंगाचे प्रश्न आहेत. आता अपंग न म्हणता दिव्यांग म्हणावे लागेल आपण त्यास एक नवीन स्वरुप दिलेले आहे. इंग्रजीमध्ये डिसेबल्ड असे म्हणत नाही त्यांना डिफेरेन्टली एबल्ड म्हणतात अशा पद्धतीच्या गोष्टी आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करणारी जी यंत्रणा आहे, ती यंत्रणा सक्षम करण्यासाठी कोणती उपाययोजना करणार आहात याचे कोणतेही चित्र अभिभाषणामध्ये दिसत नाही.

सभापती महोदय, स्मारके झाली पाहिजेत. राज्याच्या ज्या काही अभिमानाच्या गोष्टी आहेत त्यासाठी ते आवश्यक आहे. ते करु नका असे कोणी म्हणत नाही. खूप वर्षे झाली असतील तर ते

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

करायला पाहिजे याबद्दल कोणाच्याही मनात दुमत नाही. पण तेवढ्या पुरते सीमित राहू नये. कारण मघाशी मी ज्या तरुण पिढीचा उल्लेख केला त्या तरुण पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र असो वा आणखी कोणत्याही प्रकारची माहिती असो त्यांना जे पाहिजे ते सर्व यु-टयुबवर मिळू शकते. आपण प्रत्यक्षात तेथे काहीही केले नाही तरी आजच्या पिढीला हा सर्व इतिहास पाहिजे तेथे मिळू शकतो. परंतु आपल्यामध्ये ज्या काही अंगीभूत कला आणि गुण असतील त्याचा मोठ्या प्रमाणात विकास कसा होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. आपला मूळ प्रॉयॉरिटी कोणती हेच ठरविण्यामध्ये या सरकारची द्विधा अवस्था दिसते आणि त्यामुळेच याचा कोणताही उल्लेख अभिभाषणामध्ये नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात एक महत्वाचा उल्लेख असावयास पाहिजे होता तो म्हणजे राज्यात मागील तीन-चार वर्षे दुष्काळ, गारपीट होत आहे. ग्लोबल वॉर्मिंग व क्लायमेंट चेंजचा विषय आहे. आताची जी परिस्थिती आहे, त्यापेक्षा राज्याला भीषण अवस्थेमध्ये नेऊ शकेल इतका हा गंभीर प्रश्न आहे. ग्लोबल वॉर्मिंग आणि क्लायमेंट चेंज या विषया संदर्भात केंद्र आणि राज्य सरकारकडून काही गोष्टी चालू असतील. परंतु त्यामध्ये सर्वांचा सहभाग घेणे आवश्यक आहे. जुन-जुलै महिन्यात पाऊस आला नाही तर आता आहे त्यापेक्षा गंभीर परिस्थिती निर्माण होईल. अशावेळी पाणी नसलेल्या देशांमध्ये नवीन तंत्रज्ञान आणि नवीन उपाययोजना करुन तेथील लोक शेती करु शकतात, बागायती करु शकतात, पाणी वाचवू शकतात. मग आपल्याकडे या सर्व योजना करावयाच्या असतील तर त्यासाठी कोणत्या प्रकारचे नियोजन करावे लागेल याबद्दल एक साधा शब्दही माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही. राज्यासमोर भविष्यात येणारी आव्हाने स्वीकारण्यासाठी आपणास एकप्रकारची तयारी करावी लागते. त्या तयारीचा अभिभाषणामध्ये कोठेही उल्लेख नाही. आपण नको त्या गोष्टींकडे विनाकारण वेगळ्या गोष्टींचे संदर्भ घेऊन सर्व महत्वाच्या मूलभूत प्रश्नांपासून पळण्याचा प्रयत्न करीत आहोत. आपण पळण्याचा प्रयत्न करीत असताना वास्तवापासून खूप दूर जात आहात. आपण एक चित्र तयार करीत आहात, पण त्या चित्रातील रंग खरे नाहीत याची आपणास जाणीव आहे. आपणास हे दुरुस्त करायचे

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

असेल तर आपल्या हाती बेताची साधनसामुग्री आहे. त्याचे नियोजन करुन अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने पुढील काळासाठी राज्याचा आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे. भविष्य अंध:कारमय कधीच असू शकत नाही. आपणास जिद्दीने आणि प्रयत्नाने त्यावर मात करता येऊ शकते. राज्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात. आपली सर्व चर्चा किती आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे कुटुंब भरपाई देण्यासाठी पात्र ठरले, किती अपात्र ठरले त्यावर असते. विरोधी बाकावरुन आरडाओरड केल्यानंतर आता कोणत्याही चौकशी शिवाय एक लाख रुपये देणार आहोत असे मंत्री महोदयांनी सांगायचे. अशी घोषणा करुन आपले समाधान झाले काय ? ते कुटुंब उद्ध्वस्त झाले. आपण एक लाख रुपये दिल्यामुळे ते कुटुंब पुन्हा उभे राहणार नाही.

सभापती महोदय, मराठवाड्यातील दुष्काळाची पाहणी करण्यासाठी एक दिवस मंत्रिमंडळ तेथे गेले होते. माझे तर असे म्हणणे आहे की, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती पाहता माननीय मुख्यमंत्र्यांनी तेथे सलग पंधरा दिवस रहावे. लातूरला भूकंप झाला त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय श्री.शरद पवार हे सलग 21 दिवस तेथे होते आणि तेथेच त्यांनी स्वतःचे कार्यालय काढले होते.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

त्यामुळे सर्व यंत्रणा कामाला लागल्या होत्या. आताच्या परिस्थितीत आपल्याकडे नवीन नवीन यंत्रणा आहेत. ई-गव्हर्नन्स किंवा व्हिडीओ कॉन्फरन्सिगसारख्या सुविधा उपलब्ध झाल्या असल्या तरी वास्तवात या राज्यातील जनतेला राज्य सरकारबद्दल विश्वास राहिलेला नाही. संकटाच्या काळात हे राज्य सरकार आपल्याला मदत करेल अशी विश्वासार्हता राज्यातील जनतेला अजिबात राहिलेली नाही. म्हणूनच अभिनेते श्री.नाना पाटेकर आणि श्री.मकरंद अनासपुरे जेव्हा गावावात फिरतात आणि लोकांना मदत करण्याबाबत आवाहन करतात तेव्हा त्यांना भरीव स्वरुपात मदत मिळते. महोदय, त्यांच्या 'नाम' फाऊंडेशनच्या माध्यमातून दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना आणि आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना परवापर्यंत 30 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. परंतु आपण मात्र आपापसात श्रेय घेण्यासाठी भांडत बसणार. सत्तेमध्ये सहभागी झालेला मित्र पक्ष वेगळ्या पध्दतीने या भागात जातो. मी विचारु इच्छितो की, काय गरज आहे ? गावागावात जाऊन लोकांची करमणूक केली जात आहे. आज दुष्काळी भागातील विहिरींमध्ये पाणी नाही. लहान मुलगा वा मुलगी पाणी आणण्यासाठी विहिरीवर गेले तर ते विहिरीत पडल्याच्या बातम्या येतात. माझे मत आहे की, या गोष्टी आपल्याला कदापि भूषणावह नाहीत.

सभापती महोदय, स्थलांतरितांचा प्रश्न सुध्दा अतिशय महत्त्वाचा आहे. आम्ही आकडेवारी सादर केली तर, राज्य सरकारकडून सांगितले जाते की, तुम्ही म्हणता त्यानुसार स्थलांतरण होत नाही. सभापती महोदय, आज अंबाजोगाई आणि लातूर या भागामध्ये पाण्याअभावी शस्त्रक्रिया थांबलेल्या आहेत. राज्य सरकारकडून सांगितले जाते की, जर पाणीच नसेल तर आम्ही काय करायचे ? मी राज्य सरकारला विचारु इच्छितो की, या परिस्थितीत राज्य सरकार हातावर हात देऊन हताशपणे बसले तर गोरगरिबांनी काय करावे, त्यांनी कुठे जावे ? त्यामुळे स्थलांतरितांचा प्रश्न आपल्याला गांभीर्याने सोडवावा लागणार आहे. कोणत्या जिल्ह्यातील, कोणत्या तालुक्यातील किती लोकांनी अन्यत्र स्थलांतर केले याचा मागोवा आपण घेणार आहात की नाही ? आजच्या परिस्थितीत केवळ पाणी आणि कामाच्या अभावी लोक स्थलांतर करीत आहेत. राज्य सरकारने त्या भागामध्ये अन्नधान्य पोहचविण्याचे ठरविले आहे. परंतु विदारक परिस्थिती अशी आहे की, ज्या दुकानातून लोकांना अन्नधान्य मिळणार आहे त्या ठिकाणी अन्नधान्याचा साठाच उपलब्ध नाही.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

त्यामुळे केवळ आकडेवारीमध्ये जाता कामा नये. नेहमी म्हटले जाते की, शासनाला मानवी चेहरा असावा आणि तो चेहरा लोकांची सुख-दु:खे समजून घेणारा असावा. त्यामुळे दुष्काळी भागातील शाळांची काय परिस्थिती आहे, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची काय परिस्थिती आहे किंवा वसतिगृहातील विद्यार्थ्यांची काय परिस्थिती आहे, याकडे राज्य सरकारने जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. अनेकदा दुष्काळी परिस्थितीमुळे त्या भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ केले जाते. वास्तविक पाहता त्यांना कायमस्वरुपी चांगले शिक्षण देण्याची व्यवस्था निर्माण केली पाहिजे. मराठवाड्यातून बाहेर शिकायला आलेली मुले सबंध राज्यभर आहेत. लातूर पॅटर्न खूप यशस्वी झाला आहे. त्यामुळे बाहेरुन लातूर येथे शिकण्यासाठी आलेले 50 हजार पेक्षा जास्त विद्यार्थी आहेत. परंतु त्यांचे शिक्षण मात्र दुष्काळामुळे थांबणार आहे. त्यांचे शिक्षण थांबू नये यासाठी निश्चित स्वरुपाची उपाययोजना करण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. परंतु राज्य शासनाला याचा विसर पडला आहे की काय असे वाटते.

सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत वेगवेगळ्या माध्यमातून चर्चा झाली. राज्यामध्ये गुन्हे सिध्दीच्या प्रमाणात वाढ झाल्याचे सांगितले जाते. परंतु मी विचारु इच्छितो की, राज्यातील गुन्हे कमी झाले आहेत काय ? आज नागपूर मध्ये काय परिस्थिती आहे, त्या ठिकाणी दिवसाढवळ्या काय सुरु आहे ? आपण काहीही गुंडगिरी केली तरी आपल्याला काहीच होणार नाही, अशी भावना विशिष्ट लोकांमध्ये निर्माण होऊ लागली आहे. कोण्या एका पक्षाचा कार्यकर्ता उठतो आणि रस्त्यावर वाहतुकीचे नियंत्रण करणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्याला मारतो. अशी आज राज्याची परिस्थिती आहे. महोदय, नागपूरमध्ये दिवसा काढण्यात आलेल्या मिरवणुकीत पोलिसांना हवे असलेले, दमदाटी करणारे सर्व गुंड होते. राज्यामध्ये असलेल्या अपप्रवृत्तींना असे वाटायला लागले आहे काय की, हे राज्य आपले आहे आणि आपण काहीही केले तरी चालेल. मी तर म्हणेन की, आज पोलीस यंत्रणेचा काहीच धाक राहिलेला नाही. जर राज्यात असेच वातावरण राहिले तर राज्याचा कारभार कशाप्रकारे चालणार ? जर राज्यात कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत अशी परिस्थिती असेल तर आपण कोणत्या कारणामुळे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदन करावे ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

सभापती महोदय, विशिष्ट अपेक्षेने राज्यात सत्ताबदल झाला आणि नवीन सरकार सत्तेवर आले. नवीन सरकार काही तरी वेगळे करुन दाखविणार अशी जनतेची अपेक्षा होती. परंतु त्यामध्ये हे राज्य सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. परंतु हे राज्य सरकार नको त्या गोष्टीचे भांडवल करुन राज्यातील जनतेचे लक्ष दुष्काळ, रोजगार, शेतकऱ्यांची कर्जमाफी या महत्त्वाच्या मुद्यावरुन विचलित करण्यासाठी अशा कार्यक्रमांचा ध्यास धरायला लागले तर यापेक्षा महाराष्ट्राचे दुसरे दुर्दैव नाही.

सभापती महोदय, दरवर्षी राज्याच्या उत्पन्नात आपण काय भर घालू शकलो, राज्याच्या योजनांमध्ये आपले काय नाविन्य आहे हे राज्य सरकारने पाहिले पाहिजे. एक काळ असा होता की, महाराष्ट्राने सुरु केलेल्या योजना केंद्र सरकार स्वीकारत होते. उदाहरणार्थ राज्य सरकारने सुरु केलेली रोजगार हमी योजना केंद्र सरकारने स्वीकारली. परंतु या सरकारच्या माध्यमातून घडणारे असे कोणते काम केंद्र सरकार स्वीकारणार आहे या बाबतची वाच्यता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नाही. त्यामुळे गेल्या वर्षीचा लेखाजोखा आणि या वर्षी करु इच्छित असलेल्या गोष्टीच माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून मांडण्याचा प्रयत्न झालेला आहे. परंतु यातून हाती काहीच लागत नाही. या अभिभाषणात नुसतेच शब्द आहेत. जे वाऱ्यावर उडून जाऊ शकतील. परंतु स्थायी स्वरुपाचे, महाराष्ट्राला उपयोगी पडेल, राज्यातील जनतेला दिलासा मिळेल आणि राज्यातील शेतकऱ्यांचे कष्ट आणि दु:ख कुठे तरी कमी करण्याची शक्यता निर्माण होईल अशा प्रकारचे कोणतेही आशादायी चित्र माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून प्रतिबिंबीत होत नाही. त्यामुळे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल अतिशय जड अंत:करणाने शासन आणि माननीय राज्यपाल यांच्याबद्दल खेद व्यक्त करण्याशिवाय गत्यंतर नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेच्या अनुषंगाने मी मांडलेल्या मुद्यांची राज्य सरकारने दखल घ्यावी. राज्य सरकारला जर या बाबींमध्ये बदल करणे शक्य असेल तर तशा प्रकारचा बदल करावा आणि पुढील वर्षी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे स्वागत करण्याची आम्हाला संधी द्यावी, एवढेच या निमित्ताने सांगतो व माझे भाषण संपवितो.

-------

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सभागृहाचे कामकाज सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत चालणार आहे. त्यामुळे सर्वांनी वेळेचे भान राखून विचार मांडावेत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा दोन दिवस होती. परंतु त्यावर प्रत्यक्षात एक दिवसच चर्चा होत आहे. आता आपण सांगत आहात की, सभागृहाचे कामकाज सायंकाळी 7.00 वाजता संपवायचे आहे. महोदय, मी विचारु इच्छितो की, 7.00 वाजायला आता वेळ तरी किती उरला आहे ?

**तालिका सभापती** : जर सभागृहाची मान्यता असेल तर उद्या सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक घेता येईल. त्यामुळे आज सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज चालेल.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी बोलण्याची आवश्यकता नाही. कारण सरकारच्या वतीने लेखी स्वरुपात माननीय राज्यपालांचे अभिनंदन करण्यात आलेले आहे. सरकारची बाजू रेकॉर्डवर आलेली आहे. परंतु आम्हा विरोधी पक्षाचा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलचा खेद रेकॉर्डवर आलेला नाही. त्यामुळे सत्ताधारी पक्षाने न बोलता, आपण विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी. मला वाटते माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी या बाबतची नोंद घेऊन आमचा मान-सन्मान ठेवावा.

2 एच.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करण्यासाठी अजून किती सन्माननीय सदस्य बाकी आहेत ? कृपया त्यांची नावे वाचून दाखवावीत.

**तालिका सभापती** : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी सन्माननीय सदस्य आर्कि. अनंत गाडगीळ, प्रा. अनिल सोले, सर्वश्री. विक्रम काळे, रामहरी रूपनवर, रामनाथ मोते, प्रा. जोगेंद्र कवाडे, श्री. महादेव जानकर, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्य सर्वश्री. मुझफ्फर हुसेन, नागो गाणार, प्रकाश गजभिये, सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी, सन्माननीय सदस्य ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. हरिसिंग राठोड, विनायक मेटे, आनंद ठाकूर, प्रा. जनार्दन चांदूरकर, सर्वश्री. भाई गिरकर, सतीश चव्हाण, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, जगन्नाथ शिंदे, सुभाष झांबड, ॲड. निरंजन डावखरे, सन्माननीय सदस्या ॲड. हुस्नबानू खलिफे, सन्माननीय सदस्य सर्वश्री. नरेंद्र पाटील, किरण पावसकर, ख्वाजा बेग, जयवंतराव जाधव, ॲड. जयदेव गायकवाड बाकी आहेत.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे साहेबांनी सूचना केली आहे. माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना देखील माझी विनंती आहे की, आपण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे स्वागत केलेलेच आहे. वेगळे बोलण्याची काही गरज नाही. तुमच्या वतीने माननीय राज्यपाल बोलले आहेत. आपण अभिभाषणाचे स्वागत केले आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात ज्या मुद्द्यांचा उल्लेख नाही, त्या मुद्द्यांचा उल्लेख करणे गरजेचे आहे.

**तालिका सभापती** : सत्तधारी पक्षातील 2-3 सन्माननीय सदस्यांची नावे आहेत, ते थोडक्यात बोलतील.

----

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आर्कि. अनंत गाडगीळ (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, आपल्या संविधानानुसार माननीय राज्यपालांचे अभिभाषण मंत्रिमंडळ लिहून देते, त्यांचे भाषण म्हणजे विद्यमान सरकारच्या कार्याचे, धोरणांचे प्रतिबिंब असते. आवडो वा ना आवडो पण राज्यपाल महोदयांना ते भाषण वाचावे लागते. अशा उच्च पातळीवरच्या व्यक्तीच्या तोंडी असत्य, अव्यवहारिक असे शब्द घालणे, अशी वाक्ये घालणे म्हणजे एक प्रकारे ही खेदजनक बाब आहे हे मी या ठिकाणी सुरूवातीला स्पष्ट करू इच्छितो. मी आता काही वेगळे बोललो का ? सध्याचे माननीय मुख्यमंत्री ज्यावेळी या बाजूला बसत होते, ते भाषणाची सुरूवात अशीच करीत होते. कोण काय बोलले हे बघण्यासाठी मी ग्रंथालयात वेगवेगळी भाषणे काढून वाचत होतो. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे आता सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांचे एक भाषण मला आवडले. आपले सरकार असताना आणि त्यावेळी विरोधी पक्षात असताना ते असे म्हणाले होते की, तुमच्या गैरकृत्याचा पाढा वाचला. तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराजजी चव्हाण यांनी चौकशी केली, स्थगिती दिली आणि म्हणून माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांनी तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराजजी चव्हाण यांचे अभिनंदन केले. माननीय मंत्री श्री. गिरीश बापट साहेब, आम्हालाही आवडेल तुमच्या माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करायला. आम्ही डिग्री घोटाळा काढला, कारवाई नाही, चिक्की घोटाळा काढला, कारवाई नाही, कितीतरी घोटाळे सभागृहात मांडले, कारवाई नाही. मग अभिनंदन करणार तरी कसे ? क्लिन चिट दिली. आम्ही अभिनंदन करणार तरी कसे ? माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब असते तर मी सांगितले असते की, घ्या पुढाकार आणि तुम्ही जाहीर करा म्हणजे त्यांचे तरी अभिनंदन आम्ही केले असते. कदाचित त्यांना नको असेल या सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन झालेले.

सभापती महोदय, मी या सरकारची एक गोष्ट मात्र मान्य करतो. इंग्रजीमध्ये म्हणतात की, टेकसॅव्ही सरकार. सरकार टेकसॅव्ही झाले आहे. कॉम्प्युटरमध्ये मायक्रोसॉफ्टचा एमएस-वर्ड प्रोग्रॅम आहे. त्यामध्ये एक ऑप्शन आहे. तुम्हाला जर एखादा मजकुर सारखा टाईप करायचा नसेल तर कॉपी आणि पेस्ट असते. डावीकडे कॉपीला क्लिक करायचे आणि उजवीकडे पेस्ट करायचे. माननीय राज्यपालांचे आताचे जे भाषण आहे त्यातील बहुतांश मुद्दे सन 2015 चे कॉपी-पेस्ट

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आर्कि. अनंत गाडगीळ ....

केलेले आहेत. सन 2015 चा मुद्दा क्रमांक 77 बघावा. त्यामध्ये म्हटले आहे की, सीमावादाबद्दल सरकार संवेदनशील आहे, गंभीर आहे. आता सन 2016 ला देखील तेच म्हटले आहे की, सरकार संवेदनश्‌ील आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण बनविताना शिवसेनेला सांगितले नव्हते का ? आता सांगितले. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा मुद्दा आहे. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा मुद्दा स्व. विलासरावजी देशमुख असताना आला. काल फोटो आले आहेत की, विद्यमान मुख्यमंत्री बोटीतून गेले. आता सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे नाहीत. ते त्यांना घेऊन गेले. पण सर्वात पहिली व्हिजीट कै. विलासराव देशमुख यांनी बोटीतून केली होती. कारण त्याच्या आदल्या दिवशी रात्रीच विलासरावांनी काही टेक्निकल गोष्टी आर्किटेक्ट म्हणून माझ्याकडून त्यावेळी विचारून घेतल्या होत्या की, तेथे खडकाळ आहे, कसे बांधकाम करायचे ? आज असा आव आणला जात आहे की, आम्हीच शिवाजी महाराजांचे स्मारक बांधत आहोत.

सभापती महोदय, इंदू मिलच्या स्मारकासंबंधी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराजजी चव्हाण आणि तक्‌ालीन पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग यांची अंतिम करणारी बैठक त्यावेळी झाली होती, आनंद शर्माही तेथे होते. केवळ त्यावेळी निवडणुका जाहीर झाल्या, आचारसंहिता लागली म्हणून नाहीतर तो सुध्दा निर्णय आम्ही जाहीर केला असता. मात्र आता दाखवितात काय की, आंबेडकरांचे स्मारक आम्हीच केले. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात एलिफंटाचा सोलारचा उल्लेख आहे. सोलर काय करणार आहे ? अगोदर आमच्या सरकारमधून सोलरचे ट्रायल घेऊन तेथे बसले होते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील 22 नंबरचा मुद्दा मनरेगाचा आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सोलरच्या, विजेच्या प्रश्नाबद्दल म्हटले आहे. आपण एलिफंटाला वीज नेत आहोत, सोलर नाही.

आर्कि. अनंत गाडगीळ : आपण नीट पहा, त्यामध्ये उल्लेख आहे. विजेचा उल्लेख केला आहे. पण सोलरही आहे. मुद्दा क्रमांक 22 पहावा. मनरेगा किंवा कोणतीही घ्या, आमच्याच योजना आहेत, फक्त नावे बदलली आहेत, म्हणजे पूर्वी आपल्यावेळी टिनोपॉल होते आणि नंतर त्याचे राणीपाल केले, तशातील हा प्रकार आहे. माननीय राज्यपालांच्या सन 2015 च्या अभिभाषणातील क्रमांक 35 चा मुद्दा पहावा. अनेक ठिकाणी राज्यात स्मार्ट सिटी उभारणार. अनेक ठिकाणी असे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आर्कि. अनंत गाडगीळ ....

शब्द आहेत. आता फक्त यावेळी नागपूर, पुणे, सोलापूर येथे स्मार्ट सिटी उभारणार आहेत. नागपूरला 400 कोटी रूपये दिले आहेत आणि पुण्याला 10 कोटी रूपये दिले आहेत. मी आर्किटेक्ट आहे. 10 कोटी रूपयांत कधी स्मार्ट सिटी झाली आहे का ? तुम्हाला जर पुण्याचा विकास करायचाच होता तर माननीय पालकमंत्र्यांच्या मतदारसंघात सुधारण्याची जास्त आवश्यकता आहे, त्यांना का फंड दिला नाही ? कारण तुम्हाला माहीत आहे की, माननीय पालकमंत्र्यांनी पुण्यात पुढाकार घेतला की तेथील खासदार नाराज होतात. आमचे माननीय पालकमंत्री दिल्लीला बैठक बोलावितात, तेथे पुण्याचे खासदारच उपस्थित राहत नाहीत. माननीय पालकमंत्र्यांच्या मतदारसंघात मदत नाही, खासदार उपस्थित नाहीत, कशा तऱ्हेने हे सरकार चालले आहे ? भाजपचे 1 खासदार व 8 आमदार निवडून देणाऱ्या आमच्या पुण्यावर हा अन्याय करीत आहात ? स्मार्ट सिटीमध्ये कोणता एरिया डेव्हलप करीत आहात तर तो औंध आणि बानेर की, जो ऑलरेडी डेव्हलप झालेला आहे. आता परत फेयर ॲण्ड लव्हलीसारखे, मी म्हटले की, लिप-स्टिक, लाली, पावडर लावायचे काम आहे तर उद्या परत त्यावर कॉंट्राव्हर्सी करतील. त्यांचे अशा तऱ्हेचे हे काम चालले आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात मेक इन इंडिया, मेक इन महाराष्ट्र असे मुद्दे आहेत.

सभापती महोदय, मी एका गंभीर बाबीकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. मी आगीची घटना घडली, त्याबद्दल राजकारण करू इच्छित नाही. वाईट घटना होती. पण आग लागल्यानंतर 10 दिवस एफआयआर करायला लागले. घटना घडल्यानंतर एफआयआर ताबडतोब करावा लागतो. एफआयआर म्हणजे फर्स्ट इन्फर्मेशन रिपोर्ट. आग लागल्यानंतर त्या दिवशी ताबडतोब किंवा दुसऱ्या दिवशी एफआयआर दाखल केला पाहिजे होता. मात्र तो 9-10 दिवसांनंतर दाखल करण्यात आला आहे. 9-10 दिवसांत कोणाकोणाला वाचविण्याचे प्रयत्न झाले आहेत याचा सरकारने सर्वप्रथम खुलासा करावा. आज मंत्रालयात फेरी मारली तरी विविध विभागांचे अधिकारी सांगत आहेत की, उद्योग विभागातील 1-2 अधिकाऱ्यांनी मनमानी करून, दडपशाही करून,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सगळ्यांचा आग्रह धरून, दुसऱ्या कोणालाही विश्वासात न घेता मेक इन इंडियाचा गिरगावातील कार्यक्रम केला आहे आणि त्यामुळे हा सगळा बट्ट्याबोळ झालेला आहे. ..5



आर्कि. अनंत गाडगीळ ....

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या यंदाच्या अभिभाषणात म्हटले आहे की, 30 लाख रोजगार उपलब्ध होतील. सरकार त्या दृष्टीने प्रयत्न करणार आहे. सन 1995 ते सन 1999 यांचेच सरकार होते. 27 लाख युवकांना नोकऱ्या देणार होते, त्याचे काय झाले ? मला सरकारचे एका गोष्टीबाबत कबूल करावे लागेल की, आता त्यांनी एका विशिष्ट व्यवसायातील लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. कारण आरएसएसने घोषणा केली आहे की, फुल पँट गॅरेंटी स्किम. त्यामुळे त्या फुल पँट गॅरेंटी स्किममध्ये आता या व्यवसायतील लोकांना दररोज काम मिळणार आहे. आता हाफ पँटमध्ये त्यांना काय गॅरेंटी मिळत होती आणि आता फुल पँटमध्ये काय मिळणार आहे याच्या अधिक तपशीलात मी जात नाही.

....2I

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्यांशी आर.एस.एस.चा काही संबंध नसल्यामुळे सन्माननीय सदस्यांचे त्या संदर्भातील वक्तव्य कामकाजातून काढून टाकावे, अशी माझी विनंती आहे.

आर्कि.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, आणखी एक धक्कादायक घोषणा या सरकारने केलेली आहे. या सरकारने अनधिकृत बांधकामांना संरक्षण दिले आहे. वास्तविक पाहता, या संदर्भात लोकांनी आवाज उठविला पाहिजे. आता यापुढे हे राज्य नियमांचे, रूल्स ॲण्ड रेग्युलेशनचे राहणार नाही. आम्हा आर्किटेक्ट लोकांना एखाद्या इमारत बांधकामासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, नगररचना कार्यालय, महानगरपालिकेचा इमारत बांधकाम परवानगी विभाग या कार्यालयांमध्ये वारंवार चकरा माराव्या लागतात व त्यासाठी सहा-आठ महिने लागतात. मुंबईमध्ये 7 मजल्यांच्या वरील इमारत बांधावयाची असेल तर किमान 9 ते 10 महिन्यांचा काळ लागतो. म्हणजे, ज्यांनी अनधिकृत बांधकामे केली आहेत त्यांची बांधकामे लिगल झाली व जे लोक लिगली बांधकामे करु पहात आहेत, त्यांची प्रकरणे प्रलंबित आहेत, त्यांच्यावर अन्याय होत आहे. या संदर्भात शासनाकडून स्पष्टीकरण आले पाहिजे.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 45 अन्वये राज्यातील न्यायालयीन प्रक्रिया वेगवान करण्यात येईल, असे म्हटले आहे. यापूर्वी पुण्यातील वकिलांनी महिनाभर संप केला होता. पुणे येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे, अशी त्यांची मागणी आहे. आज पुणे येथे 13000 प्रकरणे प्रलंबित आहेत. उच्च न्यायालयाचे असे आदेश होते की, सन 2005 पूर्वीची प्रकरणे जिल्हा न्यायालयाने निकाली काढावीत. उच्च न्यायालयातही अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. एखाद्या आजोबाने केस दाखल केली तर नातवाला ती लढावी लागते, असे म्हटले जाते. म्हणून न्यायालयीन प्रक्रिया वेगवान करणार आहात म्हणजे नेमके काय करणार आहात, याचा कोणताही उल्लेख अभिभाषणात नाही.

सभापती महोदय, अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 60 मध्ये काही वीज प्रकल्पांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु, त्यामध्ये जैतापूर वीज प्रकल्पाचा समावेश केलेला नाही. या प्रकल्पाला शिवसेनेचा विरोध आहे म्हणून शासनाने उल्लेख टाळला आहे का, याबाबतचे स्पष्टीकरण आम्हाला मिळाले पाहिजे. ...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. जैतापूर प्रकल्प हा केंद्र सरकारचा आहे. त्यामुळे त्या संदर्भातील उल्लेख केंद्र सरकारच्या भाषणात येईल.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, ऊर्जा मंत्री महोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. जैतापूर प्रकल्प केंद्र सरकारचा असला तरी जमीन संपादन करण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी लागणारी जमीन राज्य सरकार संपादित करणार आहे का ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, जैतापूर प्रकल्प हा केंद्र सरकारचा असून आपल्याला फक्त जमीन संपादित करावयाची आहे. या प्रकल्पाचे पुढे काय होणार आहे, हा भाग केंद्र सरकारशी संबंधित आहे.

आर्कि.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, आपण राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 65 वर येऊ. नवी मुंबईमध्ये आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधण्यात येणार आहे व हे विमानतळ येत्या तीन वर्षात बांधण्यात येईल, अशा प्रकारचा उल्लेख येथे करण्यात आला आहे. सांताक्रुझ येथील विमातळाची इमारत बांधण्यासाठी 4 वर्षांचा कालावधी लागला होता आणि नवी मुंबई येथील संपूर्ण नवीन विमानतळ सरकार 3 वर्षात कसे पूर्ण करणार आहे ? खरोखरच जर एवढ्या कमी कालावधीत तो प्रकल्प पूर्ण झाला तर मी सरकारचे अभिनंदन करीन. कारण, तोपर्यंत माझी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत आहे.

सभापती महोदय, मी दुष्काळावर जास्त काही बोलणार नाही. यापूर्वी अनेक वक्त्यांनी त्याबाबतचा उल्लेख आपल्या भाषणात केला आहे. आज साधारणपणे 150 ते 250 रूपयांपर्यंत रोजगार मिळतो आणि त्यामधील 30 ते 50 रूपये पाण्याच्या घागरीसाठी जातात. खरोखरच सरकार या विषयाबाबत संवेदनशील आहे का ?

सभापती महोदय, गांधीजींच्या 150 व्या जयंतीनिमित्त पवनार येथे विकास करण्यात येणार आहे, असा उल्लेख या अभिभाषणात करण्यात आला आहे. याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. आपल्या विचारांमध्ये परिवर्तन होत असेल आणि गांधीजींचे विचार आपण मान्य करणार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

असाल तर आपल्याला हॅटस् ऑफ. आम्हालाही पवनारचा विकास हवा आहे. मघाशी त्याच

...3....



आर्कि.अनंत गाडगीळ........

विषयावर गोंधळ झाला. त्यावेळी मी बोलणार होतो. आता आपल्याला गांधीजींचे प्रेम आले आहे. पण त्यावेळच्या आर.एस.एस.च्या सरसंघचालकांनी, त्यावेळच्या संघाच्या प्रमुखांनी सन 1998 च्या 'आऊटलुक' या मासिकात नथुरामने केलेल्या हत्येचे एक प्रकारे समर्थन केले आहे.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य पहिल्यांदाच अभिभाषणावरील चर्चेत भाग घेत आहेत. त्यांचे अभिभाषणावरील अभ्यासपूर्ण भाषण आम्ही ऐकतो आहोत. पण मी आपल्या माध्यमातून त्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी दिलेल्या जुन्या संदर्भाचा आणि या अभिभाषणाचा काही संबंध नाही. त्यांनी माननीय सरसंघचालकांचा उल्लेख केला आहे. पण कोर्टात निर्णय होऊन ते निर्दोष सुटले आहेत. रेकॉर्डवर काही चुकीचे येऊ नये. महाराष्ट्राचा विकास आणि राज्यपाल महोदयांचे अभिभाषण, यावर त्यांनी बोलावे. इतिहास सर्वांना माहीत आहे. त्यांच्या साक्षी आणि नोंदीही आहेत. आपल्या भाषणात मी व्यत्यय आणू इच्छित नाही. पण संपूर्ण माहिती नसताना कोणते तरी ते जुने रेफरन्स ते देत आहेत, ते रेकॉर्डवरुन काढून टाकावेत. कोणत्याही सरसंघचालकांनी याबाबत काही केले नव्हते. या संदर्भात न्यायालयीन निकाल आहेत. मी त्यांच्या भाषणात व्यत्यय आणू इच्छित नाही. ते भाषण करीत आहेत. परंतु काही चुकीचे बोलून रेकॉर्डवर आणणे बरोबर नाही. त्यामुळे संघाबाबतची त्यांची वक्तव्ये पटलावरुन काढून टाकावित, अशी माझी विनंती आहे.

आर्कि.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, सन्माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.गिरीश बापट यांचा आदर ठेऊन मी सांगू इच्छितो की, सन 1998 च्या 'आऊटलुक' या मासिकाला तत्कालीन सरसंघचालकांनी मुलाखत दिलेली आहे. ती मुलाखत त्यांनी काढून बघावी. त्यामध्ये तसे नसेल तर माझे शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकावेत. त्यांनी त्यावेळी म्हटले आहे की, "नथुरामचा गांधी हत्येचा उद्देश हा चांगला होता." अशा प्रकारे त्यांनी गांधी हत्येचे समर्थन केले आहे. या विषयाच्या अधिक खोलात मी जाणार नाही. परंतु, माझे चुकले असेल तर जरुर ते शब्द मागे घ्यावेत. सन 1998 च्या 'आऊटलुक' या मासिकात हे छापून आलेले आहे. आता आपण मगरीचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अश्रु ढाळीत आहात. अगोदर गांधीजींचे विचार मान्य करा, मग ती गांधीजींची हत्याच होती, हेही मान्य करा आणि मग पवनारचा विकास करा. गांधीजींचे विचार स्वीकारल्याचे पहिल्यांदा जाहीर करा.

...4....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आर्कि.अनंत गाडगीळ.........

सभापती महोदय, आजच्या 'लोकसत्ता' या वर्तमानपत्रात एक जाहिरात प्रसिध्द झाली आहे. त्यामध्ये असे दाखविले आहे की, वडील पेपर वाचत आहेत आणि मुलगी त्या ठिकाणी बसली आहे. समजा आपण त्या मुलीला "देशाची आर्थिक प्रगती कधी होणार आहे, व्याजदर कधी कमी होणार आहेत", असे प्रश्न विचारले तर ती मुलगी असे उत्तर देते की, "बाबांना विचारा." दुसरा एखादा बॉर्डरसंबंधी प्रश्न विचारला तर ती मुलगी म्हणते "माझ्या बाबांना विचारा." आज मंत्रालयामध्ये गेल्यानंतर "शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार का", असा प्रश्न विचारल्यास "भागवतांना विचारा", असे उत्तर मिळते. त्यामुळे हे सरकार मंत्रालयातून चालविले जात नसून नागपूर येथील रेशीमबाग येथून चालविले जाते, हे लोकांना एकदा कळू द्या. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातून जे रिफ्लेक्ट होत आहे तो या सगळ्याचा सारांश आहे.

सभापती महोदय, पूर्वीचे "आओ बच्चो तुम्हे सिकाये धरती हिंदुस्थान की", हे गीत आपणा सर्वांना माहीत आहे. याच चालीवर या सरकारबद्दल लोकांच्या मनात कोणते विचार आहेत, याबद्दलच्या चार ओळी मी आपल्याला वाचून दाखवितो.

"आओ बच्चों तुम्हें दिखाए सैतानी सैतान की,
बीजेपी से हैरान है जनता हिंदुस्थान की,
आओ बच्चों तुम्हें दिखाए सैतानी सैतान की,
आओ बच्चों तुम्हें दिखाए हत्या भूमि किसानों की,
बीजेपी से हैरान है जनता हिंदुस्थान की,
आओ बच्चों तुम्हें दिखाए चिक्की पेट बर्बादी की,
बीजेपी से हैरान है जनता हिंदुस्थान की,
आओ बच्चों तुम्हें दिखाए बोगस डिग्री सरकार की,
बीजेपी से हैरान है जनता हिंदुस्थान की,
बीजेपी से हैरान है जनता हिंदुस्थान की."

सभापती महोदय, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-----------

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील जनतेच्या न्याय मागण्यांची पूर्तता करणे, त्यांचे जीवनमान उंचावणे या अनुषंगाने महाराष्ट्रातील सामान्य जनतेला चांगले राज्य आणि चांगले शासन प्रदान करण्याच्या दृष्टीकोनातून सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांमध्ये कल्याणकारी योजना राबविण्याचा प्रयत्न आणि मानस माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणातून व्यक्त केलेला आहे, याबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी अधिक मुद्यांवर बोलणार नाही. कारण, सन्माननीय सदस्यांनी त्यावर चर्चा केलेली आहे. महाराष्ट्रातील 11.5 कोटी जनतेच्या समस्यांचा ऊहापोह माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात केलेला आहे. त्याच बरोबर, महाराष्ट्र राज्याला पुढे घेऊन जायचे आहे आणि कोणत्या स्थितीत पुढे न्यायचे आहे या दृष्टीकोनातून असलेली शासनाची कटिबद्धता देखील माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणातून आपल्या समोर ठेवलेली आहे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक, रायगड महोत्सव, वर्धा, सेवाग्राम, पवनार या परिसराचा विकास, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 125 व्या जयंती निमित्त समता व सामाजिक न्याय वर्ष साजरे करणे अशा अनेक सामाजिक योजनांचा ऊहापोह आणि त्या दृष्टीकोनातून सुरु केलेल्या योजनांची चर्चा माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणातून केलेली आहे. एकीकडे महाराष्ट्रामध्ये भीषण पाणी संकट आहे, पाणी टंचाई आहे. त्यावर उपाययोजना करण्याचा ऊहापोह माननीय राज्यपालांच्या अभिभाषातून करण्यात आलेला आहे. त्याच बरोबर, शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या यावर देखील उपाययोजना करण्याचे संकेत आणि मनोदय माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणातून व्यक्त केलेला आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी या विषयावर आपले विचार मांडलेले आहेत. आपण मेक इन इंडियाच्या अंतर्गत मेक इन महाराष्ट्राचा जो विचार करीत आहोत त्या दृष्टीकोनातून शासनाने केलेली भरीव कामगिरी आणि त्या कामगिरीच्या माध्यमातून घेतलेले निर्णय, मग मागील वर्षी घेतलेले निर्णय आणि येणाऱ्या काळात जे निर्णय घेण्यात येणार आहेत त्या दृष्टीकोनातून देखील माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणातून विचार व्यक्त केलेले आहेत. आपण मेक इन इंडिया अंतर्गत मेक इन महाराष्ट्राचा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले......

विचार करतो. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेबांनी महाराष्ट्र राज्याला अग्रक्रम दिला आणि मेक इन इंडियाची सुरुवात राज्याच्या आर्थिक राजधानी मुंबईतून झाली, ही महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून अभिनंदनाची आणि आनंदाची बाब आहे. या कार्यक्रमात सामंजस्य करारांवर चर्चा करण्यात आली. हे शासन 8 लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात यशस्वी झालेले आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उद्योगपती उपस्थित होते आणि आपण महाराष्ट्रात उद्योग उभारण्याच्या दृष्टीकोनातून योजना, वातावरण निर्माण केलेले आहे, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केलेली आहे. 8 लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले आणि पहिल्यांदा त्यातील 1.5 लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार विदर्भासारख्या मागास भागामध्ये झाले, ही वैदर्भीय जनतेच्या दृष्टीकोनातून अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. यापूर्वी देखील सामंजस्य करार करण्यात आले. आघाडी शासनाने सन 2012-13 मध्ये ॲडव्हान्टेज विदर्भ कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमात अनेक एमओयू साईन करण्यात आले. परंतु, नंतर ते एमओयू मट्रेलाईजच झाले नाहीत आणि दुसऱ्या वर्षी ते सरकार ॲडव्हान्टेज विदर्भाचा कार्यक्रम घेऊच शकले नाही. मुख्यमंत्री महोदयांनी या ठिकाणी आपला मनोदय व्यक्त केलेला आहे. तो मनोदय व्यक्त करताना त्यांनी सांगितले की, आम्ही या दृष्टीकोनातून समिती नियुक्त करु आणि ती समिती ज्या उद्योगांचे एमओयू साईन झालेले आहेत त्यांना आवश्यक असलेल्या गोष्टींची पूर्तता करण्यासाठी मदत करुन हे एमओयू मट्रेलाईज करण्याचा प्रयत्न करेल, अशा प्रकारचा गंभीर विचार शासनाने केलेला आहे. आपण उत्सवी म्हणता. परंतु, फक्त उत्सवाकरिता नाही. आज पर्यंत अनेक उत्सव झाले आणि ते उत्सव राज्याने बघितलेले देखील आहेत. मग ॲडव्हान्टेज विदर्भ असेल किंवा विविध ठिकाणी इतर कार्यक्रम झाले असतील. परंतु त्यामागे शासनाची जी भूमिका होती ती व्यवस्थित नसल्यामुळे आणि इन्टेन्शन योग्य नसल्यामुळे त्याला मट्रेलाईज करण्याच्या दृष्टीकोनातून कोणतेही प्रयत्न झाले नाहीत. मात्र या शासनाने ते मट्रेलाईज करण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न सुरु केलेले आहेत. राज्यात उद्योग आले पाहिजेत यासाठी शासनाने अनेक भूमिका घेतलेल्या आहेत. दिनांक 08.01.2015 रोजी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागात मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले......

आयोजित करण्यात आली होती. मेक इन महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून वातावरण निर्मिती होईल या दृष्टीने त्या बैठकीत अनेक निर्णय घेतले गेले. शासनाने या दृष्टीकोनातून जवळपास 12 निर्णय घेतलेले आहेत. शासनाने अनेक एनओसी कमी केलेल्या आहेत. एनओसी घेण्याकरिता दिवसांची अट होती. त्यासाठी 90 दिवस लागत होते. आता ती कार्यवाही 45 दिवसात पूर्ण करण्यास सागितले. आता शासनाने 56 एनओसीऐवजी 27 एनओसी आवश्यक केलेल्या आहेत. उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने निर्णय घेतलेले आहेत.

सभापती महोदय, आपण मिहानमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट केले, ही गोष्ट खरी आहे. परंतु, मिहानमध्ये ज्या 79 उद्योगांना जमिनी देण्यात आल्या होत्या त्यापैकी फक्त 17 उद्योग उभे राहिले आणि तेही थातुरमातूर स्वरुपात उभे राहिले. माननीय ऊर्जा मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. युती शासन सत्तेवर आल्यानंतर विजेचे दर कमी केल्यामुळे तेथे उद्योग स्थिर झाले. अन्यथा ते उद्योग तेथून बाहेर जाण्याच्या मार्गावर होते, अशा प्रकारची स्थिती होती. अशा प्रकारे औद्योगिकीकरण आणि बेरोजगारीचे निर्मूलन करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने आपले इन्टेन्शन जाहीर केलेले आहे आणि त्या दृष्टीकोनातून इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्याचा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून होत आहे. उद्योगांसाठी पाणी, वीज आणि मनुष्यबळ आवश्यक असते. म्हणून कौशल्य विकासावर देखील भर देण्यात आलेला आहे. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात कौशल्य विकासावर अधिक भर दिलेला आहे. स्व.प्रमोद महाजन कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून जवळपास 500 सेवाभावी संस्थांनी रजिस्ट्रेशन केलेले आहे. त्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर अभियान राबवून महाराष्ट्रातील युवक कौशल्य पूर्ण व्हावेत, कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्माण व्हावे, उद्योगांना आवश्यक असणारे कोशल्ययुक्त मनुष्यबळ यातून निर्माण होईल याची चिंता शासनाने व्यक्त केलेली आहे. शासनाने या दृष्टीकोनातून दिनांक 15 जानेवारी, 2015 रोजी कौशल्य व उद्योजकता विकास विभागाची स्थापना केलेली आहे. आघाडी सरकारने किंवा युपीए शासनाने यापूर्वी कौशल्य विकास, स्किल इंडिया आणि स्किल डेव्हलपमेंटच्या दृष्टीकोनातून निर्णय घेतले होते. परंतु, त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून वातावरण निर्मिती झाली नाही.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले......

त्यावेळी देखील हा विभाग अस्तित्वात होता. परंतु, त्या विभागासाठी तरतूदच करण्यात आली नव्हती. फक्त शिबीरे व्हायची आणि त्यानंतर विषय संपत होते. आता जवळपास 13 ते 15 मोठ्या संस्थांनी कौशल्य विकासाच्या दृष्टीकोनातून, मनुष्यबळ तयार करण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र सरकारबरोबर एमओयू साईन केलेले आहेत. युएनडीपी, टाटा ट्रस्ट, जेएसडब्ल्यू, भारत फोर्ज, बॉश अशा जवळपास 21 संस्थांनी कौशल्य निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून, स्किल डेव्हलपमेंटच्या दृष्टीकोनातून, मनुष्यबळ निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून पुढाकार घेतलेला आहे आणि तशा पद्धतीचे सामंजस्य करार त्यांनी महाराष्ट्र शासनाबरोबर केलेले आहेत. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात याचा ऊहापोह केलेला आहे. या फक्त घोषणा नाहीत. याला निव्वळ नावे देण्यात आलेली नाहीत. या घोषणांची पूर्तता करण्याच्या दृष्टीकोनातून वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न.....

...K-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कौशल्य विकास या विषयावर बोलत आहेत, त्यांनी असे सांगितले की, शासनाने यासाठी वेगळा विभाग केलेला आहे. वेगळ्या विभागाचे संबंधित मंत्री व राज्य मंत्री कोण आहेत, हे आम्हाला कळले तर त्यांच्याकडे पाठपुरावा करायला आम्हाला सोपे जाईल.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, कौशल्य विकास विभागाचे काम माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांच्याकडे आहे, आयटीआय विभाग त्यांच्याकडे हस्तांतरित करण्याचा विचार आहे, कौशल्य विकासाच्या दृष्टीने ते तांत्रिक एज्युकेशन आहे, हा भाग देखील त्यांच्याकडे देण्यात येत आहे. यामध्ये एमसीव्हीसी हे कोर्स येतात. कौशल्य विकासासाठी निर्माण झालेले हे विभाग आहेत. या दोन वर्षाच्या कोर्सनंतर त्यांचा रिझल्ट येत नव्हता. कौशल्य विकासाच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाने जो पुढाकार घेतला तसा पुढकार मागील सरकारने घेतलेला नाही. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात जे मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत त्या निव्वळ घोषणा नाहीत. त्यांची पूर्तता करण्याचा प्रयत्न राज्य सरकारकडून होताना दिसत आहेत. पुढील काळात मार्गक्रमण कसे होईल, या वर्षात कोणत्या भूमिका घेण्यात येणार आहेत, याचा उल्लेख देखील अभिभाषणात करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, गुन्हे सिध्द होण्याच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. मागील काळात हे प्रमाण 36 टक्के होते ते आता 54 टक्के झालेले आहे. गुन्हे सिध्द होण्याचे प्रमाण म्हणजे रेट ऑफ कन्व्हेक्शन नेहमी वाढला पाहिजे त्या दृष्टीकोनातून मुख्यमंत्री महोदय प्रयत्नशील आहेत, त्याचे प्रत्यंतर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात दिसून येते. गुन्डांच्या अनेक गृपवर मोक्का लावण्याचा कार्यक्रम राज्य शासनाकडून राबविण्यात येत आहे. त्याचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात आलेला आहे. महाराष्ट्राची दिशा पुढील काळात कशी राहणार हे अभिभाषणात नमूद करण्यात आले आहे म्हणून मी राज्यपाल महोदयांचे आभार व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-------

....2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, अभिभाषणाच्या 21 पानी पुस्तिकेत एकूण 125 मुद्दे नमूद केले आहेत. मुद्दा क्रमांक 39 मध्ये महिला आणि बालकांसाठी फक्त दोन ओळी नमूद केल्या आहेत. मला याचे इतके आश्चर्य वाटते की, महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे. महिलांवरच नाही तर तीन, चार वर्षाच्या कोवळ्या मुलींवर अत्याचार होत आहेत. त्यांचे खून केले जात आहेत. महिलांवर अत्याचार होत असताना त्याबाबत समाजात भयंकर चीड आहे. महिला व लहान मुलींच्या सुरक्षितते विषयी या अभिभाषणात काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही. महिला व लहान मुले सरकारच्या खिसगणतीत नाही. अभिभाषणाची पुस्तिका मी चार वेळा चाळली आहे, मुद्दा क्रमांक 39 मध्ये असे नमूद केले आहे की," महिला व बालकांची सुरक्षा हा महत्वाचा मुद्दा असून त्यासाठी मुंबईमध्ये 90 हून अधिक महिला पोलीस गस्त पथके कार्यरत आहेत." वाहतूक पोलीस हवालदार महिलेच्या थोबाडीत मारुन तिला मारहाण केली जाते. त्याची कसलीही दखल घेतली जात नाही. मारहाण करणारी व्यक्ती एका राजकीय पक्षाची प्रमुख आहे. इतका भयंकर मोठा प्रकार चालू असताना 21 पानाच्या पुस्तिकेत फक्त दोन ओळी महिला व लहान मुलांच्या बाबतीत नमूद केलेल्या आहेत.

सभापती महोदय, महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कुपोषण होत आहे. या सर्व बातम्या टी.व्ही चॅनेलवर व वर्तमानपत्रात येत आहेत. त्या बातम्या वाचून डोके सुन्न होते. कुपोषणाच्या गर्तेतून ही मुले कधी बाहेर येणार आहेत. आज हे सरकार मेक इन इंडिया, अच्छे दिन आयेंगे, मन की बात अशा मोठमोठ्या गोष्टी करीत आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, या सरकारचे मोठे उत्सव चालू आहेत. लहान मुले व महिलांना हे सरकार घटक मानत नाहीत काय ? शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत, महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेचे अनेक प्रश्न महत्वाचे आहेत, परंतु हे सरकार कोणत्या प्रश्नांना प्राधान्य देणार आहे. एखाद्या व्यक्तीचे महिन्याचे उत्पन्न 50 हजार असेल, 10 हजार असेल तर तो अगोदर मुलांचे शिक्षण व त्यांचे खानेपिणे यांना जास्त महत्व देईल. 10 हजार रुपयात आई-वडील नटून थटून फाईव्ह स्ट्रार हॉटेलमध्ये जेवायला जाणार नाहीत. ते अगोदर लहान मुलांना जेऊ घालतील. महिलांच्या सुरक्षिततेसाठी या अभिभाषणात काहीही नमूद केलेले नाही. मुलांच्या कुपोषणाबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यांना देण्यात येणाऱ्या सकस आहाराचा कोठेही उल्लेख करण्यात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण....

आलेला नाही. खेदाने सांगावेसे वाटते की, चिक्की किंवा सकस आहारामध्ये इतके मोठे घोटाळे असताना त्यांना सहजपणे सोडून देण्यात येते. त्यांच्यावर काहीही कारवाई करण्यात येणार नाही असे निर्लज्जपणे सांगितले जाते, याबाबत आम्ही काय बोलावे.

सभापती महोदय, आज शेतीचे प्रश्न अत्यंत भयंकर झाले आहेत, कोणतेही टी.व्ही.चॅनेल लावा, वर्तमानपत्र पाहा, शेतकऱ्यांची अत्यंत वाईट परिस्थिती झालेली आहे. या परिस्थितीला कोण जबाबदार आहे. अनेक ठिकाणी चारा छावण्या नाहीत. आम्हाला आता सत्ताधारी बाकावरुन सांगण्यात येते की, 15 वर्षे तुम्ही काय केले आहे. आम्ही त्या काळात किती चारा छावण्या दिल्या होत्या त्या आपण बघा. आज जनावरे व पक्षी पाण्यासाठी तडफडत आहेत, लातूर शहराला पाणी मिळत नाही. अनेक ठिकाणी पाणी आणताना शाळेतील मुले दिसत आहेत. त्यांचे आता परीक्षेचे दिवस आहेत, त्यांनी आता अभ्यास केला पाहिजे. ते अभ्यास न करता त्यांना पाणी आणण्यासाठी जावे लागते. कोणी विहीरीत पडून मरण पावत आहेत, पाण्याच्या शोधात बिबट्या विहीरीत पडत आहे. इतकी भयंकर परिस्थिती असताना याचा अभिभाषणात कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. जी आकडेवारी देण्यात आलेली आहे तिचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे. हा पैसा नेमका कोठे जातो.

सभापती महोदय, मंत्री महोदय श्री.एकनाथराव खडसे लातूर येथे गेले होते तेव्हा त्यांनी सांगितले होते की, आम्ही रेल्वेने या शहरासाठी पाणी आणू व तेथील पाण्याचा प्रश्न सोडवू. परंतु तशा प्रकारे काहीही झालेले नाही. या अभिभाषणाच्या पुस्तिकेत शेतकऱ्यांचा प्रश्न महत्वाचा आहे, शेतकरी आत्महत्या करीत आहेत, पाण्यासाठी मरण पावत आहेत, त्यासाठी शेतकऱ्यांना पहिल्यांदा कर्जमाफी दिली पाहिजे. अशा शेतकऱ्यांना सरकार कर्जमाफी देत नाही. वारंवार मागणी करुन शेतकऱ्यांची कर्जमाफी का करण्यात येत नाही असा प्रश्न मला मंत्री महोदयांना विचारावयाचा आहे.

सभापती महोदय, रिझर्व्ह बँक व त्यांच्या नियंत्रणाखालील 29 राष्ट्रीय बँकांनी मोठ्या कर्जदारांना 1.14 लक्ष कोटी रुपयांची कर्जमाफी गुपचूप केली आहे. याचा कोणालाही पत्ता लागला नाही, परंतु एका इंग्रजी वर्तमानपत्राने राईट टू इन्फर्मेशन खाली विचारणा केली की, इतकी मोठी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण....

कर्जमाफी तुम्ही कशी काय दिली. तेव्हा हे आकडे बाहेर आले आहेत. बड्या उद्योगपतींना सरकार खूप मोठ्या रकमेची कर्जमाफी देते. त्यांचेकडून कर्ज वसूल करायचे असेल तर त्यांच्याकडील जमिनी, प्रापर्टी, मशीनरी, गाड्या व शेअर्स विकून कर्ज वसूल करता येते. परंतु अशी कार्यवाही होत नाही. एखाद्या छोटा रिक्षावाल्याने बँकेकडून कर्ज घेतले व ते थकित झाले असेल तर त्याच्या घरी जाऊन त्याची रिक्षा जप्त केली जाते. परंतु मोठ्या उद्योगपतींची कर्जमाफी अत्यंत सहजपणे करण्यात येते. शेतकऱ्यांची कर्जमाफी करतांना सरकार आढेवेढे घेते. सरकारला अजूनही वाटत नाही की, शेतकरी मरत आहे, परवाच्या दिवशी 200 ते 250 शेतकरी महिलांनी आत्महत्या केल्या आहेत. ही इतकी भयंकर गोष्ट असताना याचे गांभीर्य सरकारला का वाटत नाही. शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले पाहिजे असे सरकारला का वाटत नाही ? मी यवतमाळ व आसपासच्या शहरात गेले होते. तत्कालीन मंत्री कै.आर.आर.पाटील यांनी सावकारी अधिनियम 2010 हा कायदा आणलेला आहे. यवतमाळ भागातील अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनी सावकारांना स्टॅम्पपेपरवर लिहून दिल्या आहेत व त्यांच्याकडून 15, 50 व 80 हजार रुपयांचे कर्ज घेतलेले आहे.

या नंतर श्री.सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण.......

शेतकऱ्यांनी 15 हजार, 50 हजार, 80 हजार रुपयांचे कर्ज घेऊन आपल्या जमिनी सावकारांकडे दिल्या होत्या. एक-एक सावकाराने 15-15, 20-20 शेतकऱ्यांच्या जमिनी ठेवून घेतल्या आहेत. शेतकऱ्यांनी नापिकीमुळे सावकारांचे कर्ज न दिल्यामुळे त्या जमिनी सावकारांच्या नावावर झालेल्या आहेत. त्या संदर्भात डी.डी.आर. आणि ए.आर. यांच्याकडे तक्रारी करुन शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत मिळवून देण्याचा कायदा असताना शेतकऱ्यांना जमिनी मिळाल्या नाहीत.शेतकऱ्यांना जमिनी मिळवून देण्याच्या संदर्भात दखल घेतली नाही तर सदर कायद्यान्वये डी.डी.आर. आणि ए.आर. यांना सहा महिन्यांची शिक्षा होऊ शकते. परंतु अद्याप कोणत्याही डी.डी.आर. आणि ए.आर. यांच्याविरुध्द कारवाई करण्यात आली नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी यासंबंधी कोणतीही दखल घेतलेली नाही. यामुळे सदर कायदा करुन उपयोग काय ? ज्या शेतकऱ्यांनी सावकारांकडे आपल्या जमिनी गहाण ठेवलेल्या आहेत, त्यांना त्यांच्या जमिनी परत मिळवून देण्याचे काम शासनाने केले पाहिजे. शासनाने प्रथम शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले पाहिजे. त्यानंतर शेती करण्यासाठी आवश्यक असलेले पाणी, बी-बियाणे, खते, फवारणी करण्यासाठी औषधे शेतकऱ्यांना उपलब्ध करुन द्यावीत. तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत त्यांना मजूर देवून 3 ते 4 वर्षांच्या काळात शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभे केले पाहिजे. त्यानंतर शेतकऱ्यांना मिळणाऱ्या नफ्यातून येणारी 20 ते 25 टक्के रक्कम सरकारने वळती करुन घेतली पाहिजे. अशी कार्यवाही केल्यास शेतकरी जगू शकेल. अन्यथा शेतकऱ्यांनी सांगितले की, आम्ही आत्महत्या करतो व आता आम्ही अन्नही पिकवणार नाही. यामुळे आपण सर्व उपाशी मरु. यामुळे शासनाने सर्व प्रथम शेतकऱ्यांची कर्जमाफी केली पाहिजे. परंतु हा मुद्दा राज्यपालांच्या अभिभाषणात मांडण्यात आला नाही, ही बाब मला खेदाने सांगावी लागत आहे.

सभापती महोदय, शेतकरी, स्त्रिया व लहान मुलांचा मुद्दा महत्त्वाचा आहे. त्याप्रमाणे मुंबईच्या लोकल ट्रेन प्रवाशांनी भरलेल्या असतात. लोकल ट्रेनच्या अपघातांमध्ये रोज मरणाऱ्या प्रवाशांचे प्रमाण खूप जास्त आहे. मुंबई लोकल ट्रेनच्या अपघातात रोज 15 माणसे अपघातग्रस्त होवून मरत आहेत. परंतु यासंबंधी कोणीही दखल घेतलेली नाही. रेल्वेचा प्रश्न म्हटला की, ही केंद्र शासनाची जबाबदारी असल्याचे सांगितले जाते. केंद्र शासनाकडे विचारणा केल्यास ही राज्य

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण.......

सरकारची जबाबदारी असल्याची टोलवाटोलवी करण्याचे राजकारण आम्ही अनेक वर्षांपासून बघत आहोत. आम्ही या ठिकाणी विनाकारण बोलत नाहीत. आम्ही केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडे जावून आलो आहोत. शेतकरी, पाणी किंवा मुंबईच्या लोकल ट्रेनने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रश्न असो, त्यांच्यासाठी शासनाकडून काही तरी मिळाले पाहिजे. मुंबई ही आर्थिक राजधानी आहे. मुंबईकडून केंद्र शासनाला 40 टक्के महसूल दिला जातो. त्यात दिल्लीची अवस्था चांगली होऊ शकते. परंतु मुंबई शहरात लोकल ट्रेनच्या अपघातांमध्ये अनेक प्रवाशी मरत असताना त्याकडे लक्ष देण्यासाठी कोणालाही वेळ नाही. यामुळे 12 डब्बे किंवा 15 डब्ब्यांची ट्रेन करावी असे म्हणण्यात काही अर्थ नाही. या संदर्भात चांगला प्लॅन तयार करण्यात आला होता. तो मंजूर केल्यास ट्रेनची क्षमता निश्चितपणे 300 टक्के वाढू शकते. परंतु तसे काही घडले नाही. यासंबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोणताही उल्लेख करण्यात आला नाही. हे अर्थसंकल्पीय अधिवेशन असल्यामुळे या अधिवेशनात मुंबईच्या लोकल ट्रेनसाठी शासनाने काही तरी तरतूद केली पाहिजे. लोकल ट्रेनच्या अपघातात जे प्रवाशी मरण पावतात, त्यांच्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोणताही उल्लेख दिसून येत नाही.

श्री.भाई गिरकर : तो प्लॅन कोणता आहे ?

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी चांगला प्रश्न विचारला आहे. आपल्या सारखा रेल्वे प्रवाशी असलेल्या एका इंजिनियरने सदर प्लॅन तयार केला आहे. त्या इंजिनियरने ट्रेनमधून एक प्रवाशी खाली पडल्यानंतर त्या प्रवाशाच्या शरीराचे अनेक तुकडे झाले होते. स्ट्रेचरवर त्या प्रवाशाची बॉडी, हात, पाय आणि मुंडके ठेवल्यानंतर त्या इंजिनियरला वाटले की, मी या संदर्भात काही तरी केले पाहिजे. त्याने कोणाचीही मदत न घेता स्वतःची दोन वर्षे यात घालविली. त्याने संबंध देश आणि परदेशातील ट्रेनचा अभ्यास करुन एक प्लॅन तयार केला. आम्ही तो प्लॅन घेवून आम्ही माननीय केंद्रीय रेल्वे मंत्री श्री.सुरेश प्रभू यांना तसेच त्यांच्यापूर्वी असलेल्या केंद्रीय रेल्वे मंत्री यांना दाखविला होता. तसेच आपल्या माननीय मुख्यमंत्र्यांना दाखविला होता. त्यांनी सदर प्लॅन ॲप्रिसिएट सुध्दा केला. परंतु त्यांचे सेक्रेटरी आहेत, माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला त्यांच्याकडे पाठविले होते. त्यांनी असे सांगितले की, या प्लॅनसाठी 50 हजार कोटी

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण.......

रुपयांचा खर्च येईल. परंतु ज्या व्यक्तीने हा प्लॅन तयार केला होता, त्याचे असे म्हणणे आहे की, या प्लॅनसाठी फक्त 8 हजार कोटी रुपये खर्च येईल. या प्लॅनसाठी 50 हजार कोटी रुपये खर्च येत असला तरी, तुम्ही बुलेट ट्रेनसाठी 98 हजार कोटी रुपये म्हणजे जवळपास एक लाख कोटी रुपये देवू शकतात. त्यातून फक्त मुंबई ते अहमदाबाद असे 500 कि.मी. अंतर प्रवास करता येऊ शकतो. परंतु संपूर्ण बुलेट ट्रेनच्या पैशांमध्ये संबंध कॉरीडॉर म्हणजे मुंबई-दिल्ली, दिल्ली-कोलकत्ता, कोलकत्ता-मद्रास आणि चेन्नई-मुंबई अशा प्रकारे 9,999 कि.मी. अंतर 60 हजार कोटी रुपयांच्या खर्चामध्ये पूर्ण होऊ शकते. तुम्ही एका बुलेट ट्रेनचा हट्टहास केला आहे. तुम्ही बुलेट ट्रेन जरुर सुरु करा. परंतु त्यापूर्वी मुंबई लोकल ट्रेनची सध्याची अवस्था लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. सदर इंजिनियरने दिलेल्या 8 हजार कोटी रुपयांच्या प्लॅनचे रेल्वेच्या जी.एम. पासून सर्वांनी कौतुक केले आहे. ते असे म्हणतात की, आमचे रेल्वे अधिकारी इतक्या चांगल्या पध्दतीने प्लॅन तयार करु शकत नाही. ब्रिटिशांच्या काळातील असलेली सिग्नल सिस्टिम ॲटोमॅटिक करावी असे अनेक उपाय करण्यासंबंधी प्लॅन तयार केला आहे. माझ्याकडे सदर प्लॅनची प्रत उपलब्ध आहे. मी ती आपल्याकडे देते. मी सदर इंजिनियरसमवेत संपूर्ण खासदार, आमदार व पत्रकारांची बैठक घेतली होती. परंतु त्या बैठकीला येण्याचे कोणीही औदार्ह दाखविले नाही. लोकांच्या प्रश्नांवर कसे काम करायचे, हे आपल्या मंत्र्यांपासून पंतप्रधानापासून सर्वांना माहीत नाही. यामुळे त्यासंबंधी सर्व माहिती तरी करुन घेतली पाहिजे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, हा रेल्वेचा अर्थसंकल्प नाही. सन्माननीय सदस्यांनी विषयावर बोलले पाहिजे. सन्माननीय सदस्या पंतप्रधानांना काही माहिती नसल्यासंबंधी सांगत आहेत.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, त्यांना यासंबंधी माहिती असती तर त्यांनी बुलेट ट्रेनचा अट्टहास धरला नसता. हा रेल्वेचा अर्थसंकल्प नाही, हे मला माहीत आहे. परंतु सन्माननीय सदस्यांना एवढे का वाईट वाटत आहे ? रेल्वेच्या अर्थसंकल्पात मुंबईच्या लोकल ट्रेनसाठी काही केले नाही. तसेच मुंबईच्या तोंडाला पाने पुसल्यामुळे मला येथे बोलावे लागत आहे.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, आम्ही विरोधकांची भाषणे करायचो, त्यावेळी आम्हाला हेच सांगण्यात येत होते. या गोष्टीची मी त्यांना आठवण करुन दिली.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, आपण मला यासंबंधी आठवण करुन दिल्याबद्दल मी आपली आभारी आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात पृष्ठ क्रमांक 12 वर असे नमूद केले आहे की, "रेल्वे मंत्रालयाबरोबर संयुक्त उपक्रम म्हणून "महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत सुविधा विकास कंपनी" ची स्थापना करुन राज्यातील रेल्वे प्रकल्प त्वरेने कार्यान्वित करण्यात येतील. जयगड बंदर दिघी बंद यासाठीच्या बंदर-रेल्वे जोडमार्ग प्रकल्पांमध्ये, शासनाने समभागाच्या माध्यमातून... " मी या संदर्भात बोलत आहे. मला शेतकरी, पाणी आणि मुंबई लोकल ट्रेन इत्यादी प्रश्न महत्त्वाचे वाटले. त्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात काही तरी उल्लेख होणे अत्यावश्यक होते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात महिला, लहान मुले, आरोग्य विषयक फारसे काही नाही. म्हणून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोणकोणत्या त्रुटी आहेत, हे मी सांगत आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सभोवताली 30 नगरांचा समावेश असणाऱ्या स्मार्ट सिटी "नयना" चा विकास करण्याची जबाबदारी शासनाने सिडकोवर सोपविली आहे. त्यात शैक्षणिक, वैद्यकीय, करमणूक, यंत्रणा व्यवस्थापनासंदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख आहे. मी माननीय राज्यपालांचे अभिभाषण अनेक वेळा वाचले आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये जे विषय यावयास पाहिजे होते, ते आलेले नाहीत. पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना असो, माननीय पंतप्रधानांनी संपूर्ण देशातील 22 लाख लोकांना घरे देऊ असे सांगितले. मागील 2 वर्षांमध्ये किती लोकांना घरे दिली, याचा त्यांनी आढावा घेतल्यास पुढील 3 वर्षांमध्ये आणखी किती लोकांना घरे देणार आहात, हे आपल्याला समजू शकेल. अनेक सन्माननीय सदस्यांना या संदर्भात बोलायचे आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या अनुषंगाने मी जे मुद्दे मांडले, त्या संदर्भात गांभीर्याने विचार केलेला दिसत नाही, म्हणून मला या विषयी खंत व्यक्त करावीशी वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपवते. धन्यवाद.

-------------

यानंतर MM-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयाच्या अभिभाषणामध्ये ज्या बाबींचा उल्लेख नाही त्या संदर्भात मी बोलणार आहे. धनगर समाजाच्या आरक्षणाबद्दल अभिभाषणात कुठेही उल्लेख केलेला नाही. घटनेने ज्यांना आरक्षण दिले आहे त्यांना कोणतेही आरक्षण दिलेले नाही. मात्र ज्यांना आरक्षण दिलेले नाही त्यांना कायदा करुन आरक्षण दिले जात आहे. ही सरकारकडून मोठी चूक झालेली आहे. ज्यांना घटनेने आरक्षण दिले आहे त्यांना आरक्षण मिळू नये म्हणून सरकार प्रयत्नशील आहे. घटनेच्या विरोधात शासन चालले आहे. ज्यांना घटनेने आरक्षण दिले त्यापैकी धनगर समाज वगळता सर्व समाजांना सवलती लागू झाल्या. मात्र धनगर समाजाला आरक्षण देण्यासाठी चौकशी समिती नेमली गेली. घटनेने दिलेल्या आरक्षणाबाबत हे सरकार पहिल्यांदा असे वागत आहे. घटनेच्या अनुसूची 2 मध्ये जी यादी दिलेली आहे त्या यादीच्या अनुषंगाने सर्व निकष पूर्ण झाल्यानंतर सवलती लागू केल्या जातात. त्या यादीमध्ये धनगर समाजाचा उल्लेख आहे. एसटी प्रवर्गाला व एससी प्रवर्गाला सवलती लागू करण्यात आलेल्या आहेत. फक्त धनगर समाज आरक्षणाबाबत मागे लोटला जात आहे. या सदंर्भात राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये कुठेही उल्लेख केलेला नाही.

सरकारने ज्यांना आरक्षण लागू केले त्यांना आरक्षणाचा फायदा मिळणार नाही हे सरकारला माहिती आहे. परंतु शेड्युल 2 मध्ये धनगर समाजाचा उल्लेख आहे, त्या धनगर समाजाला सोडून इतर सर्व समाजाला आरक्षण दिले गेले. शेड्युल 2 मधील बिबलोग्राफी सूचीमध्ये धनगर समाजाचा उल्लेख 36 व्या क्रमांकावर आहे. त्या बिबलोग्राफी सूचीमधील ज्या समाजाने 100 टक्के निकष पूर्ण केले त्या समाजाला सवलती लागू झालेल्या आहेत. 100 टक्के निकष पूर्ण करणाऱ्या धनगर समाजाला सवलती द्यायच्या आहेत. त्यात एकच त्रुटी आहे, ती म्हणजे यादीमध्ये उल्लेख केलेला समाज ज्या राज्यामध्ये राहतो तेथील राज्यकर्त्यांनी त्या समाजाला सवलती देण्याबाबत कॅबिनेटची मंजुरी घेऊन केंद्र सरकारकडे शिफारस केल्याशिवाय सवलती लागू होत नाहीत. राज्य सरकारकडून तशी शिफारस केंद्र सरकारकडे पाठविण्याचे काम शिल्लक राहिले आहे. नव्याने काही करावयाचे आहे असे नाही. सरकारने या गोष्टीमध्ये लक्ष घालावे आणि धनगर समाजाला आरक्षणाचा फायदा द्यावा अशी मी सरकारला विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

16-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) MM.2

SGB/ AKN/ KTG/ AKN/ ST/ AKN/ 18:50

ॲड.रामहरी रुपनवर......

सभापती महोदय, ज्या मातोश्रीने 5000 महादेवाची मंदिरे बांधली, आदर्श राज्यकर्ती म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो त्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकाबद्दल कोणतीही तरतूद केलेली नाही. त्यांची पुण्यतिथी व जयंती साजरी करण्यासाठी सरकारने आर्थिक तरतूद केलेली नाही. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या पुण्यतिथी व जयंती साजरी करण्यासाठी आतापर्यंत विशेष आर्थिक तरतूद केली जात होती, आता या सरकारने ती आर्थिक तरतूद बंद केली आहे. यापूर्वी त्यांच्या नावाने जो पुरस्कार दिला जात होता तो देखील बंद केला आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्याबद्दल हे सरकार उदासीन का आहे?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यातील डान्सबार बंद करण्यासंदर्भात
प्रारूप विधेयक प्रस्तावित करणे

**मु.शी.:** राज्यातील डान्सबार बंद करण्यासंदर्भात
प्रारूप विधेयक प्रस्तावित करणे यासंबंधी
मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे)

-----

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.......

लवकरच या संदर्भातील प्रारूप विधेयक याच अधिवेशनात मंजुरीकरिता सादर केले जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी समिती घोषित केली. अशी समिती घोषित करण्यापूर्वी असे सांगितले की, सर्व पक्षीय गटनेते यामध्ये आहेत. प्रत्यक्षात समितीमध्ये राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या गटनेत्यांचा समावेश नाही. त्याबद्दल फेरविचार करावा अशी मी विनंती करतो.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, समावेश करण्यास हरकत नाही. विधानसभेतील विरोधी पक्षनेत्यांचा समावेश केल्यामुळे त्या सभागृहातील राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या गटनेत्यांचा समावेश केला आहे. विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेत्यांचा समावेश समितीमध्ये असल्यामुळे कॉँग्रेस पक्षाच्या गटनेत्यांचा समावेश केला आहे. या समितीमध्ये आणखी काही नावांची ॲडिशन करायला आमची हरकत नाही.

------------

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु....

ॲड.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, या सरकारने कौशल्य विकासाचा कार्यक्रम सुरु केला असून मंत्रालयामध्ये कौशल्य विकास विभागाची स्थापना केली आहे. राज्यातील आय.टी.आय. कौशल्य विकास विभागाकडे वर्ग केले आहेत. कौशल्य विकासाबाबत जाचक अटी घातल्या आहेत. आय.टी.आय.मध्ये कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेबद्दल कोणतीही तरतूद केलेली नाही. पूर्वी आय.टी.आय. तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली होते. आता नवीन विभाग स्थापन झाल्यामुळे त्या विभागाकडे अंगुलीनिर्देश करण्यात येत आहे. नव्याने स्थापन केलेल्या कौशल्य विकास विभागासाठी कोणतीही आर्थिक तरतूद केलेली नाही. पुरेसा अधिकारी वर्ग सुध्दा उपलब्ध करुन दिलेला नाही.

**तालिका सभापती (श्री.रामराव वडकुते)** : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आता थांबविण्यात येत आहे. माननीय सदस्य ॲड.रामहरी रुपनवर ऑन लेग राहतील.

नंतर 2एन.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती .....**

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 17 मार्च 2016 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.00 ते 12.00 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. या विशेष बैठकीमध्ये माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा व माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर होईल. त्यानंतर दुपारी 12.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 7.00 वाजता, गुरुवार, दिनांक 17 मार्च 2016 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION